REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला, रविवार ता० ६ माहे फेब्रुवारी सन १८७६ इ० अंक ६

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ५ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आली ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

### सिद्धपदार्थदर्पण.

हे पुस्तक खालीं सही करणाराकडेस विकत मिळेल हें पुस्तक सहाव्या यत्तेक रितां सहाव्या पुस्तकाचे साह्यासाठीं शास्त्रीय विषय संबंधी-प्रश्नोत्तर रूपानें केलें. जे विषय नेहमीं ध्यानांत राहिले पाहिजेत त्यांकरितां कविता करून घातल्या आहेत, पुस्तक टाइपावर छापिलें आहे. याची पूर्वी किंमत ०८ आणे ठेविली होती परंतु हल्लीं ती कमी करून १० प्रति घेणारास ०५ आणे प्रमाणें व त्या संख्येचे आंत घेणारास ०६ आणे प्रमाणें ठेविली आहे पुस्तक शाळांतून चालविण्यास फार उपयोगी आहे.

सह्या.

वासुदेव रामचंद्र मोहोनी हेड मास्तर चाळीसगाव.

जनार्दन गंगाधर प्रभूणे डे.पो. मास्तर पिंपळनेर.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

फत्तेखेलडें ता. १८ । १ । ७६

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस

वि. वि. येथें सालाबादप्रमाणें पौष शुध्ध १५ पासून खंडोबा देवाची यात्रा भरली. त्रयोदशीपासून व्यापारी लोक येण्याची सुरुवात झाली. एकंदर उदमी व्यापारी मिळून १२०० पावेतों दुकानें होतीं. पौर्णिमेच्या रात्रीं व प्रतिपदेस दोन प्रहर पावेतों एकंदर २००० लोकांचा समाज होता. नंतर दर्शन करणारे सर्व लोक गेले. द्वितीयेचे दिवशीं संक्रांत आल्यामुळें फारशी विक्री झाली नाहीं. परंतु त्रितीयेचे दिवसापासुन गिऱ्हाईक लोक बरेच येऊं लागले. एकंदर माल यात्रेंत पुष्कळ आला होता व खपही पुष्कळ झाला आणि तारीख २२ शनवार रोजीं सर्व यात्रा खलास झाली. सालमजकूरचे यात्रेंत एथील मि० लोचन सुकुल चीफ कान्स्टेबल यार्णी व कान्हूजी हेड कान्स्टेबल यार्णी फार मेहेनत करून बिलकूल गुन्हा होऊं दिला नाहीं ही आनंदाची गोष्ट समजून त्यांचे श्रमाची तारीफ केली पाहिजे. ही यात्रा पूर्वी थोडी भरत असे परंतु पांच चार वर्षांपासून पुष्कळ मोठी भरूं लागली व दिवसेंदिवस अधिक वाढेल असें दिसतें. या यात्रेंत पौर्णिमेचे दिवशीं बरेच चमत्कार होतात. यात्रेची जागा गांवचे वस्तीपासून पूर्वेस एक मैलाचे अंतरावर आहे. जागा विस्तीर्ण असून टेकड्यावर असल्यानें हवेचें वगैरे चांगलें सौख्य लोकांस मिळतें. मात्र पाण्याची कमताई आहे. फक्त एक विहीर आहे तिलाही पाणी यात्रेच्या दिवसांत फार थोडें राहतें सबब यात्रेकरू लोकांस व उदमी लोकांस लांबून पाणी आणण्याचे श्रम करावे लागतात. एवढी मोठी यात्रा आणि व्यापारही चांगले रीतीचा असून माळाची खडकळ जागा उंच सखल व अव्यवस्थित यामुळें लोकांस मोठा त्रास होतो याकडे तालुक्याचे वगैरे अधिकारी जर नजर पुरवितील आणि जाग्याची व्यवस्था करितील तर उदमी लोकांस व इतर यात्रेकरू लोकांस मोठा फायदा होईल आणि देखावाही चांगले प्रकारचा होईल यांत संशय नाहीं. कळावें.

यात्रा पहाणारा.

क्ष.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

मी कधीं कधीं आपल्या सेवेस हजर असतों. सध्या आमच्या इकडे थंडीचें मान अधिकाधिक होऊं लागलें आहे हें एक दुश्चिन्ह आहे. दिवा जाऊं लागला ह्मणजे मोठा होतो, किंवा मनुष्य मरूं लागला ह्मणजे पुष्कळ खातो त्यांतलीच ही एक थंडीची तऱ्हा आहे. बाजारभाव बरा आहे. मात्र बाजरीला काल पासून दर आला आहे. दर पल्ला गहू रुपये १०, तूर आणि हरभऱ्याची डाळ ७, तांदूळ जुने १५ व नवे १२।१४.

मु० पुणे तारीख ३० जानेवारी -१८७६

एक बडबड्या

## वऱ्हाडसमाचार

मिती माघ शुद्ध ११ शके १७९७.

## वणी येथें कमिशनर साहेबांचे आगमनाचा थाट.

वणी हा गाव वऱ्हाडांत जीं नामांकित शहरें आहेत त्या तोडीचाच आहे परंतु हा वऱ्हाडांतील अगदी एका कोपऱ्यांत पडल्यामुळें याचें महत्व लोकांचे नजरेस कधीं येत नाहीं. पूर्वी येथें मोगलाई रिवाजा प्रमाणें जिकडे तिकडें मैला व झाडी वगैरे असल्यामुळें एथील हवा बाहेरील लोकांस मानत नसे. त्यामुळें या गावचें नाव एकवेळ जें वाईट पडलें आहे तें अद्याप तसेंच चाललें आहे. परंतु हल्लीं हा गाव जो पाहतो तो खुष झाल्या शिवाय रहात नाहीं. एथील तहशिलदार रा. रा. अंबादास संतो यानीं अति मेहनत घेऊन एथील झाडी वगैरे तोडून अतिशय सफाई केली आहे व जिकडे तिकडे उत्तम सडकांची रचना फारच कल्पनेची केली आहे. शहराच्या मध्यभागीं सुमार २५० फूट लांब व १५० फूट रुंद असा चौक करून त्याचे चौफेर दुकानें बांधविलीं आहेत त्यामुळें सर्व व्यापार व रहदारी त्या चौकांत हल्लीं असून त्याच्या योगानें शहरास विलक्षण शोभा आली आहे. गावाबाहेर सुंदर सरकारी बगीच्या केला आहे तोही पहाण्यालायक आहे. नवीन कचेरी, दवाखाना, चावडी, पोलिस स्टेशन, स्कूल बिल्डिंग वगैरे अनेक सरकारी इमारती फार होऊन अतिशय उत्तम स्थितींत आहेत.

असो येथें कर्नल नेंभार्ड साहेब कमिशनर यांची स्वारी येणार याकरितां अगाऊ १५ दिवस येथील सर्व लोकांनीं त्यांच्या सन्मानार्थ दीपोत्साहें वगैरे करण्याची तयारी चालविली होती. तारीख २६ जानेवारी रोजीं साहेब बहादुरांची स्वारी प्रातःकाळीं येथें आली. त्या वेळेस गावांतील सर्व मोठे मोठे लोक सामोरे गेले होते. त्या दिवशीं डायरेक्टर आफ पब्लिक इनस्ट्रकशन हे व क्या. स्प्यानस्की डे. क. हे येथें होते. त्या दिवशीं ४ वाजतां सर्वांच्या भेटीकरितां नवीन तहशील कचेरींत मोठा दरबार झाला, व रात्रीं दीपोत्साह व दारू काम झालें त्याची हकीकत अशीः—

दरबारांत येणारे लोकांकरितां टिकिटें काढिलीं होतीं त्याकरितां उत्तम प्रकारचा बंदोबस्त डे. कमिशनर व तहशिलदार यांनीं ठेविला होता. ४ वाजतां सर्व लोक जमल्यावर कमिशनर सा. व डे. कमिशनर सा- हे आले. डायरेक्टर साहेब यांर्णी साहेब बहादुराची भेट त्या पूर्वीच घतली होती सबब ते त्या समयास आले नहींत. ज्यास सरकारांतून खुर्चीचेमान आहेत असे गावांतील बडे लोक व संभावित गृहस्थ आणि सरकारी नोकर वगैरे जे लोक दरबाराकरितां आले होते त्यांचा तपशीलः—

गावांतील बडे लोक—बाबा साहेब सरमोकदम, बाळाजी दादा सर मुकदम, कृष्णराव भाऊराव देशमुख, दादा साहेब देशपांडे, काजी साहेब, रामराव सखाराम देशपांडे, राम शास्त्री वणीकर, हरबाजी पाटील वरूडकर, व्यंकोबा नाईक भेदी, रामजी सर मोकद्दम, गणू भाऊ सर मोकद्दम, अन्याजी देशपांडे, रावसाहेब देशपांडे, आबाजी देशपांडे, नऱ्होबा देशपांडे, बुटीचे गुमास्ते, व बाबासा रंगारी.

सरकारी नोकर— बजाबा रामचंद्र डे. इ. इन्स्पेक्टर, केशव जयकृष्ण क.चे शिर. परशराम गणेश रेवि. शिरस्तेदार, आत्माराम अनंत जुडि. शिर. गंगाधर वासुदेव डा. प.इ.चे क्लार्क, खुदाबक्ष नेटिव डाक्तर, केशव लक्ष्मण हेड मास्तर, उध्धव व्यंकटेश अ. मास्तर, त्रिंबक राव पोस्ट मास्तर, हेड मास्तर हिं. स्कूल, हेड मास्तर ग्यर्ल स्कूल व रामचंद्र यशवंत शास्त्री सेकंड अ. मास्तर.

याशिवाय पेशकार, शहानवीस वगैरे कारकून व इतर गावांतील ठळक मंडळी मिळून सुमार १०० लोक होते. कमिशनर साहेब जागेवर बसल्यावर तहशिलदार यांनीं सर्वांची पृथक पृथक भेट करविली. साहेब बहादुरांनीं कोणाकोणास प्रश्न करून सर्व लोकांच्या भेटी झाल्यावर जंगल माफ केला व पोलिसपट्टी माफ केली आहे वगैरे बद्दल समज दिली. नंतर एथील लोकांनीं वनचराई माफ व्हावी व हत्याराबद्दल लायसेन्स देण्याचा हुकूम व्हावा ह्मणून साहेब बहादुराची विनंती केली. त्यावर तुह्मी अर्ज पाठवा ह्मणजे विच्यार करूं असे साहेब बोलल्यावर हार तुरे, पान सुपारी वगैरे झाली, आणि दरबार बरखास्त झाला. रात्रीं रोषनाई करण्याकरितां चौकापासून तहशील कचेरीपर्यंत दुतर्फा खांब गाडून त्यावर आडवे वेळू बांधून त्यावर पणत्या लाविल्या होत्या अशा प्रकारचे २ रस्ते तयार केले होते. एक येण्याकरितां व दुसरा पुन्हा तंबूत जाण्याकरितां. चौकाच्या २ रस्यावर मोठमोठे वेळूचे दरवाजे कमानदार करून त्यांवर हजारो दिवे लावण्याची योजना केली होती व त्यां पैकी उत्तरेच्या दरवाज्यावर' Well-come' अशीं अक्षरें फार सुरेख व मोठ्या अक्षरांनीं लिहिलीं होतीं. चौकाच्या चोहो बाजूस ६ फूट उंचीच्या ताट्या एकसारख्या बांधून त्यावर हजारो दिवे लाविले होते त्यामुळें चौकांत विलक्षण शोभा दिसत होती. चौकाच्या एका अंगास १२ फूट उंचीचा विस्तीर्ण मंडप घातला होता त्यांत मध्यभागीं सिंव्हासनासारखी उंच जागा करून त्यावर ३ खुर्च्या मांडल्या होत्या. त्याच्या दोहों बाजूस सरकारी नोकर व गावांतील संभावित लोक बसण्याकरितां खुर्च्या मांडल्या होत्या. ९ वाजतां सर्व तयारी झाल्यावर वाजत गाजत व नळे, चंद्रजोती सोडीत कमिशनर सा. व डे. कमिशनर सा. व रा. सा. नारायण भाई डायरेक्टर यांस चौकांत आणून तिघ जणास सिंव्हासनावरील ३ खुर्च्यांवर बसवि-

ई. कमिशनर सा. मधील खुर्चीवर बसले. डायरेक्टर सा. डावे बाजूस व डे. क. उजवे बाजूस बसले. नतर गावकरी लोकांसव साहेब लोकांसही समजावे याकरितां एक मान पत्र हिंदुस्थानी भाषेंत वाचलें तें असें:—

मानपत्र

खुदावंत न्यामत जनाब कर्नल
नेंभार्ड साहेब बहादूर.

हम सब जमीदार, साहुकार व बेपारी वगैरे रयत साकिनान् बुनहुजूरके तशरीफ लानेसे बहोत खुष हुये, और हम सबको इसतऱ्हे खुषी हासल हुई. जैसी जनाब मलका मोअजमा साहबा व शाहजादे प्रिन्स आफ वेल्स बुलंद यकबाल प्रिन्स आफ वेल्ससे मुलाकात हासल हुई हय. हम लोक इलाके बराड गोषे जंगलके रहनेवाले है. हम तऱ्हे तऱ्हेकी सफाई वगैरा इंतजाम सरकारसे ज्यों अब होता हय बेखबरथे बलके आजतक ऐसे इंतजामकी आवाजभी हमारे कानमे न पडीथी. हमारे बडे नसीब ज्यो हुजुर इस जगा तशरीफ लाये वरना ऐसे जगेखराबमे हुजूरके कदम नजर आनेदुशवार था. हम सब छोटे बडोंके तबियतको हुजूरके कदम मुबारक देखनेसे बहोत तरो ताजगी हासल हुई के जिसका बयान नही कर सकते. येह इलाक्ये बराड जबसे मलके मोजमाके ताबेमे हुवा हय तबसे हम लोगोंको दवाखाना, मदरसे, सडकों वगैरेके बनेसे और पोलिसपट्टी, बनचराई व फारिस्ट वगैरेके माफ होनेसे बहोत फायदे हुये हम सब एहसानमंदहैं, हम सब रातदीन दरगाह इलाहीमे दुआ करते हैं के अल्लाहुताला इस सरकारको हमेशा अमनअमानमे रखे, उनके तरफसे आप जैसे व जनाब स्पान्स्कीन साहेब बहादूर जैसे हाकिम आदिल व मुनसिफ रवनक अफरोज होते रहें. फकत्.

याप्रमाणें मानपत्र वाचल्यावर साहेब बहादुरांनीं आह्मी फारच खुष झालों आहो व तुह्मालोकांसारखी अशी राजनिष्टा आमचे पहाण्यांत क्वचित आली असें मोठ्या आनंदानें दर्शविलें. आह्मी मागें आलों होतों त्यामध्यें आणि आतांमध्यें अतिशय अंतर पडलें आहे व ही सर्व सुधारणा क्या. स्प्यान्स्की साहेब डिपुटी न तहशिलदार यांनीं केली आहे असें बोलले. याप्रमाणें कांहीं संभाषणें होऊन नंतर दारू उडविण्यास आरंभ झाला. दारू चंद्रपुराहून मुद्दाम करवून अति उत्तम प्रतीची आणिली होती. नळे तऱ्हे तऱ्हेचे होते व चंद्रजोती लाल रंगाच्या व पांढऱ्या शुभ्र अशा होत्या. झाडें बाणाचीं व दुसऱ्या तऱ्हेचीं अशाप्रकारची दारू धूर न होतां फार उत्तम सुटली व साहेब बहादुर फारच खुष झाले. दुसरे पांच गुबारे आणिले होते त्यांत दिवा पेटवावा ह्मणजे ते विमानाप्रमाणें आकाशांत अति उंच जात असत तो एक नवीन प्रकार केलाहोता व तो पाहून साहेबानीं आनंदानें टाळ्या वाजविल्या.

याप्रमाणें एक तास दारू सुटल्यावर साहेबबहादुरांनीं अतिआनंद प्रदर्शित केला त्यावेळेस पानसुपारी अत्तरगुलाब झाल्यावर पुन्हा वाजंत्री वाजवित व नळे चंद्रजोती सोडित सर्व सरदारास आपआपले ठिकाणीं नेऊन पोचविलें.

डायरेक्टर साहेबही येथील शाळा, लोकस्थिति, सर्वांचा एकमेळ, व राजनिष्ठा पाहून फार खुष झाले. ते दुसरे दिवशीं ह्मणजे तारीख २८ जानेवारीरोजीं येथून निघून तळेगाव दशसहस्त्र इकडे गेले.

कमिशनरसाहेब यांनीं दुसरे दिवशीं मुक्काम करून सर्व गाव पाहिला व खुष होऊन तारीख २९ रोजीं डे. क. सुध्धां पांदरकवड्याकडे निघून गेले.

## पुरुषाच्या मुखवटयाचा रुपया.

अकोल्यास अलीकडे थोडे दिवस अशी गडबड झाली आहे कीं पुरुषाच्या मुखवट्याचे सुर्ती रुपये सरकारी खजिन्यांत, पेपरकरेन्सी आफिसांत घेत नाहींत व घेत नाहींत एवढेंच नाहीं पण त्यांच्या हातीं सदहू प्रकारचा रुपया लागल्यास त्याचे २ तुकडे करून मालकास परत देतात.व असे आजवर पांच सातशे रुपये तोडले गेले आहेत. एथील खजिनदार रा. रा. सखाराम मोरेश्वर हे खजीना घेऊन मुंबईस गेले होते तेव्हां तेथें पांच पन्नास रुपये तुटून त्यांचे अंगावर पडले. अकोला तालुक्याचे तहशिलदाराचे २९ रुपये अलीकडे तुटले गेले असें समजतें. यावरून सरकारांत भरणा होण्याचे रुपयाचे बाबतींत हल्लीं मोठी विचक्षणा निघाली आहे. चुकून पुरुषाचे मुखवट्याचा रुपया कोणाच्या निघाला कीं अंगावर पडलाच. या कामीं आमची सरकारी अधिकाऱ्यांस शिफारस आहे कीं त्यांनीं असा रुपया तोडून रयतेचें नुकसान करण्यापेक्षां एक जाहिरनामा करावा कीं ज्यापाशीं अमुक सालचे पुरुषाच्या मुखवट्याचे रुपये असतील त्यांनीं ते अमुक दिवसांत सरकारी खजिन्यांत आणून देऊन दुसरे नवे रुपये घेऊन जावे ह्मणजे लोकांची गैरसोय व नुकसान होणार नाहीं. लोकांनीं तो रुपया फुकट किंवा गैर मार्गानें मिळविला आहे अथवा कुरतुडून त्याचा कांहीं भाग काढून घेतला आहे असें नाहीं. व्यवहारांत वापरून वापरून दीर्घकालमर्यादेनें तो थोडा झिजला असला तथापि तो सरकारचा कायदेशीर शिक्का आहे सबब याची झीज सरकारानेंच सोसून लोकांची अडचण काढून टाकावयाची होती. गरीब अडाणी लोकांचा तोडलेला रुपया बारा चादा आण्याला देखील जाणार नाहीं, आणि सरकार तोच रुपया टांकशाळेंत पाठवील तर त्यास ह्मणण्यासारखा तोटा न येतां त्याचा नवा रुपया तयार होईल, व तेणेंकरून लोकांची अडचण दूर होईल.

एक दोन गरीब शेतकरी व पांच चार व्यापारी लोकांची व आमची गाठ पडली होती तेव्हां त्यांच्या ह्मणण्यांत असें आलें कीं, या पुरुषाच्या मुखवट्याच्या रुपयांत सरकारचें अगदीं थोडें नुकसान असतांना ही जर सरकार तें सोशित नाहीं व लोकांवर घालतें तर मग सरकारास एकादे दिवशीं कागदांच्या कोट्यावधि रुपयांच्या फैलवलेल्या नोटा परत घेणें तोटयाचें आहे असें वाटलें तर रयतेची काय अवस्था होईल ? नोटा तर आम्ही सरकारी शिक्का ह्मणून वापरतो आणि आज पुरुषाच्या मुखवटयाचा रुपया कमी किंमतीचा ह्मणून जसा तोडून देतात तसाच प्रसंगानुरूप नोटीचा कागद फाडून चिंधड्या करून परत दिला तर पुढें वाट काय ? या त्यांच्या प्रश्नावर आम्ही इतकेंच उत्तर दिलें कीं, नोटीच्या बाबदींत सरकार असें करणार नाहीं; कारण ती लोकांच्या मोठ्या नुकसानीची गोष्ट आहे. पण या उत्तरानें ते समाधान पावले किंवा त्यांस कांहीं भरवसा आला असें आह्मास दिसलें नाहीं. व आम्ही तरी याहून अधिक काय सांगावें ? कारण रुपया हें नाणें जसें सरकारच्या हुकुमानें व पतीनें चाललें आहे तशाच नोटा सरकारचे हुकुमानें व पतीनें चालल्या आहेत. अस्तु. सरकारास आमची एवढीच शिफारस आहे कीं, असे सरकारी शिक्क्याचे खरेरुपये तोडण्यानें जर लोकांचा भरवसा उडत असेल तर ते रुपये तोडण्याचें काम सरकारानें मना करावें. व रयतेची चांगली समजूत घालावी हें फार अवश्य आहे.

याच बाबदींत अधिक शोध करतांनां आह्मास असें समजलें कीं सन १८७० चे २३ वे आक्टचे १६वे कलमाप्रमाणें हे वजनांत हलके भरणारे रुपये तोडण्याची वहिवाट २ वर्षांपासून वऱ्हाडांत सुरू झाली आहे. हल्लींचा चालू रुपया १८० ग्रेन वजनाचा आहे व सन १८३५ सालचे पुरुषाच्या मुखवट्याचे रुपये झिजून कमी झाले आहेत तरी तो रुपया जर १७६ ग्रेन वजन असेल तर पास करावा व त्याहून कमी भरेल तर तो तोडून आणणाराचे हातीं द्यावा असा ठराव झालेला आहे व गुदस्त सालींच डिपुटी कमिशनर आफिसाकडून तहशिलदार लोकांना त्याबद्दल सर्क्युलर झालें आहे पण त्याचा अंमल आजवर चांगला झाला नव्हता तो हल्लीं जारी झाला आहे असें समजतें.

आतां असें जरी आहे तरी सरकारास आमची जी सूचना आहे ती इतक्याकरितांच आहे कीं तोडल्या रुपयाचें नुकसानीचा बोजा गरीब रयतेवर त्यांनीं घालूं नये. आज सुमार ४२ वर्षें लक्षावधि लोकांनीं वापरल्यानें जे रुपये अंशतः हलके झाले आहेत त्याबदलचें नुकसान एखाद्याच व्यक्तीवर पाडण्यापेक्षां तें खुद्द सरकारचें राजरोस नाणें आहे ह्मणून सरकारानेंच सोसावें व रयतेची अडचण दूर करावी ह्मणून आह्मी पुन्हा सरकारास विनंती करितों.

## संवयी.

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

दुसरी संवयी

दृढ उद्योग करण्याची संवयी करा

किती जरी कोणी बुद्धिवान असला तथापि मोठीं कामें जीं होणें तीं दृढ परिश्रमावांचून होणें नाहींत. साधारण गोष्टींपासून दृढउद्योग करण्याची संवयी केली ह्मणजे मोठमोठीं कामें करण्यास तो पाया होतो. पूर्वींच्या लोकांनीं लिहिलेले ग्रंथ पाहिले ह्मणजे आपणास विलक्षण अचंबा वाटतो व यांणीं हे कसे लिहिले असतील यांचे गूढ पडतें परंतु या सर्वांस कारण भूत दृढउद्योग होय असें समजावें. एन सायक्लोपीडियाचीं मोठमोठीं पुस्तकें, स्काटचीं नावलें अथवा कादंबऱ्या त्याचप्रमाणें इतर पद्यात्मक ग्रंथ, वुल्हर लिटनचीं नाव्हलें, सर्व विख्यात जो रेनाल्ड त्याचीं बारीक लिपीचीं अशीं मोठमोठालीं अनेक पुस्तकें हीं पाहून व ऐकून कोणास अचंबा वाटणार नाहीं! असो. 'जो कोणी दररोज ३ तासपर्यंत सपाट्यानें चाललेलें तो सात वर्षांमध्यें पृथ्वीच्या परिघा इतक्या अंतराचें क्रमण करील' ही जी गोष्ट ह्मटलेली आहे ती लक्षांत ठेवण्याजोगी आहे. नाहीं तर मग आळशी मनुष्याच्या स्थितीप्रमाणें एक आळशी मनुष्य ह्मणतो "धावण्यापेक्षां चालणें बरें, चालण्यापेक्षां स्वस्थ उभें रहाणें बरें, अथवा उभें रहाण्यापेक्षां बसणें बरें, किंवा बसण्यापेक्षां पडून रहाणें बरें" उद्योगी मनुष्यास आपली कामें आटपण्यास जितका वेळ सांपडतो तितका आळशास सांपडत नाहीं. कारण एकाची कामें बांधलेलीं असून क्रमाक्रमानें होत असतात व दुसऱ्याला सगळेंच करायाचें. ल्युथराचें गावोंगाव पर्यटन चाललेंच होतें, त्याचीं कीर्तनें व व्याख्यानें हींही चाललींच होतीं तरी अशा सपाट्यांत त्यानें बायबल ह्मणजे ख्रिस्तीधर्म पुस्तक याचें जेव्हां संपूर्ण भाषांतर तयार केलें तेव्हां सर्व युरोपभर आश्चर्य वाटलें! तसेंच सर्वांस ठाऊक आहेच. कीं थुसिडिडीसचा इतिहास, डिमास्थिनीस यानें त्याच्या भाषेची शैली आपणास साधावी ह्मणून ८ वेळ स्वतः आपल्या हातानें लिहून काढला. तेव्हां हें सर्व केवळ संवयीचें फळ होय. उद्योग करण्याची संवयी लागल्यापासून दुसरा असा फायदा आहे कीं वाईट लोकांचा अनायासें संग तुटतो वाईट गोष्टी करण्याविषयीं होणारे नाना प्रकारचे मोह दूर रहातात, व तेणेंकरून आपल्या वर्तणुकीस धोका बसत नाहीं, इत्यादि अनेक फायदे होतात.

## कित्येक नेटिव लोकांची इंग्लिशांविषयीं खोटी द्वेषबुद्धि.

[ लिहून आलेला मजकूर ]

रक्षापौरजनस्यदेशनगरग्रामेषुगुप्तिस्तथा
योधानामपिसंग्रहोपितुलयामानव्यवस्थापनं
सार्म्यालिंगिषुदानवृत्तिकरणंमार्गःसमानेर्चनं
कार्याण्येवमहीभुजांप्रशमनान्यंतानिराज्येनवै
॥ १ ॥

अलीकडे ज्यास थोडे बहुत लिहितां वाचतां येतें, ज्यानें यत्किंचित् इंग्रजी भाषेचा अभ्यास केला आहे,व थोडावेळ जो कोणी एकादा सभेंत गेला आहे, त्याच्या अंगांत स्वदेशहिताचें, देश कल्याणाचें, व सरकारचे अपराध शोधून काढण्याचें वारें शिरून, जो तो मुखानें इतराशीं तंटा करून पक्ष प्रतिपादन करण्यांत व वर्तमान पत्रांतून व मासिक पुस्तकांतून, कांहीं सम

जो न समजो. आपल्यामतें मोठ्या आद्यतेचीं, गूढविचाराचीं, आणि वाचून लोक मान डोलवितील अशीं आर्टिकलें लिहिण्याची खटपट करीत असतो. परंतु अशा पोकळ पांडित्य करणाऱ्या लोकांच्या वेड्या वाकड्या असंबद्ध लिहिण्यानें लोकांचें कल्याण तर कांहीं होत नाहीं, सरकारास खरी हकीकत समजत नाहीं; पण अविचाराचीं आणि मूर्खपणांचीं आर्टिकलें रिपोर्टराच्या द्वारानें सरकारच्या कानांवर पडत असल्या कारणानें तें दिवसेंदिवस दुराग्रही मात्र होत चाललें आहे, आणि नेटिव ओपिनिअनासारख्या वजनदार व समंजस पत्राला हलकट पत्रांत लेखूं लागलें आहे, येवढाच काय तो या अरुणोदयासारख्या, हिंदुपंचासारख्या, अमृतबझारासारख्या व आणखी अशा किंत्येक पत्रासारख्यांच्या लिहिण्यावरून फायदा होऊं लागला आहे. आतां सरकार दूषणास पात्र आहे कीं काय? व असेल तर कोठपर्यंत, नसेल तर का नाहीं वगैरे गोष्टींचा विचार करण्याचें आह्मी आपल्या मनावर घेतलें आहे. ज्या पत्रकर्त्यांस आमचे विच्यार खोटे दिसतील त्यांनीं चांगल्या भाषेंत सभ्यतेनें, आमची चुकी असेल तर ती आह्मांस समजून देण्याच्या हेतूनें, किंवा आपली असल्यास ती शुध्ध करण्याच्या हेतूनें आपल्या पत्रीं आह्मांस प्रश्न करावेत, किंवा पत्ररूपानें आह्माकडे लिहून पाठवावे, शक्यनुसार त्यांचीं चांगल्या रीतीनें उत्तरें देण्यास आह्मी हयगय करणार नाहीं.

पहिला विचार हा कीं, सरकारच्या हातून कांहीं चुक्या होतात कीं नाहीं हें पाहायाचें. आमच्यामतें थोड्या बहुत होतात पण त्याबद्दल तें दोषार्ह नाहीं.

वादाकरितां घटकाभर असें मनांत आणूं कीं युरोपांतील एखादा राष्ट्रावर आह्मी हिंदु लोक राज्य करितों आहों. आतां आमच्या हातून तिकडे वर्तन कसें झालें असतें याचा विच्यार करूं. मनुष्याच्या ममतेचा प्रकार असा आहे, प्रथम आप्ता विषयीं प्रीति त्याला फार असते, त्याहून कमी शेजाऱ्या विषयीं, त्याहून कमी गांवकऱ्याविषयीं, त्याहून देशबांधवाविषयीं, आणि त्याहून कमी परदेशस्थाविषयीं. पहा आतां या सर्वसिद्ध अनुभवशीर त्रिराशिकाप्रमाणें परदेशस्थाकडे आमच्या प्रीतीचा मोठ्या मारामारीनें एक कण काय तो आला. व त्यांतही पुन्हा जातींच्या भेदाभेदाविषयीं आह्मी विचार केलाच नाहीं, नाहीं तर त्यांच्याकडे एक कण देखील येण्याची मुष्किल पडली असती. उदाहरणार्थ असें घेऊं कीं आमचे लोक राज्य करिताहेत त्या देशांत आमच्या एका जिवलग मित्राला नोकरी मिळाली; आतां मनुष्याच्या स्वाभाविक मनोधर्माप्रमाणें पहिल्या प्रथम आपलें, मग आपल्या आप्त वर्गांचें आणि आमचें, व त्याच्या पाठीमागून इतरांचें सोई सोईनें बरें करण्याचा किंवा कल्याण करण्याचा विच्यार तो करील, आणि हेंच उचित आहे. त्याला जर त्या देशांत अधिकार आहे, तर तो आपलें व आपल्या लोकांचें कल्याण करण्यास कधींही मागें पुढें पहाणार नाहीं, व त्यानें तसें केल्याबद्दल आह्मी त्यास काडीभर तरी दोष लाऊं कां? नाहीं, अर्थात नाहीं. दूर कशाला रुध्या आहे त्यास्थितींतच एखाद्या मामलेदारीची किंवा शिरस्तेदारीची जागा मिळाली ह्मणजे असें वाटूं लागतें कीं, आज आपल्या लोकांचें कल्याण करून दुवा घेण्याचा अधिकार माझ्या हातीं आला आहे", व त्याणें तसें केलें ह्मणून त्याच्यावर कोणी क्रुद्ध होत नाहींत, पण उलट त्याची पाठ थोपटून वाहवा करितात. असा स्वभाव मनुष्याचा असणें फार साहजिक आहे असें आम्ही आणखी एक वार सांगतों. एक गृहस्थ शेतांतून खांद्यावर टाकून एक ऊस घरीं आणतो, त्याचे मुलगे व पुतणे त्याला पाहिल्याबरोबर "बाबा मला ऊस, काका मला ऊस" असें ह्मणत त्याच्या पुढें जातात; आतां तो गृहस्थ साहजिक रीतीनें उसाचीं कांडीं करून आपल्या मुलांना मधकांडीं देतो आणि पुतण्यांना वाढेकांडीं देतो, हा त्याचा अपराध काय ?. कोणाच्या मतें असेल तर तो पितृप्रीतीचा ह्मटला पाहिजे. व अशी गोष्ट घडत नाहीं असें संसार करणारे व सत्यास स्मरणारे कोणी ह्मणतील काय ? हे सर्व अनुभवाचे खेळ आहेत. पोकळ पांडित्याच्या गप्पा मारणारे, समदृष्टि असावी असें ह्मणणारे, विच्यारशून्य अरण्यपण्डित पुष्कळ सापडतील, पण त्यांचें ह्मणणें मोजबाबतींत धरतां नये; पण मोठ्या दुर्दैवाची गोष्ट हीच कीं, अशाच लोकांच्या विच्यारशून्य पोरकट तर्कामुळें सरकारचें मन आह्माविषयीं विरस व खट्टू होऊं लागलें आहे.

(पुढें चालू)

## वऱ्हाड.

हैदराबादेस पठाण लोकांच्या संबधानें जी गडबड झाली आहे ती अजून मिटली नाहीं. मोहरमाच्या ९वे तारखेस लंगराची स्वारी फार बंदोबस्तानें निघाली होती व तिजबरोबर एकही पठाण नव्हता. हैदराबादेहून ज्ञानप्रकाशास एक पत्र गेलें आहे त्यांत लिहिलें आहे कीं तेथें १०००० पठाण आहेत त्या सर्वांस काढून द्यावें असा विच्यार चालला आहे. तसें झाल्यास सरकारचा १० लक्ष रुपयांचा फायदा होईल. मोहरमांत अधिक गडबड होऊ नये ह्मणून निजाम सरकारानें चांगला बंदोबस्त केला आहे व इंग्लिश सरकारानेंही सिकंदराबादेस वगैरे ग्याटावर अधिक लोक ठेवून आफिसर वगैरेचा स्पेशियल नेमणूक केली आहे. ईश्वर करो आणि कांहीं गडबड न होवो. अविच्यारी मुसलमान लोक कांहीं दंगा करितील आणि आमच्या देशाला व संस्थानाला दुःख व संकट हा त्याचा परिणाम होईल सबब असा प्रसंग न येवो.

सर रिचर्ड मीड साहेब हैदराबादचे रेसिडेंट कलकत्यास गेले होते ते तिकडून परतले असें समजतें.

कलकत्याहून दुसरे तारखेच्या तारायंत्रांतून बातमी आली आहे कीं मेजर ई. स्मिथ यांस हैदराबादेस फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट नेमिलें. ही एकाएकी नेमणूक कशी झाली व मे० टवुइडी साहेब हल्लींचे फर्स्ट असिस्टंट कोठें जाणार हें कांहींच समजलें नाहीं. व त्याविषयीं कांहीं कल्पना करितां येत नाहीं. रेसिडेंट नवे, फर्स्ट असिस्टंट नवे इत्यादि प्रकारावरून सर्व घाट कांहीं नवा जुना होणार कीं काय समजत नाहीं.

बुलढाण्याचे डिपुटी कमिशनर क्यापटन हडलस्टन साहेब लष्करी खात्यांत शरीक झाल्यास २० वर्षें झालीं त्यावरून डिसेंबरच्या ७वे तारखेपासून त्यांस मेजरची पदवी मिळाली.

मे० मोफेट साहेब पोलिस सुपरइंटेंडेंट यांस तारीख २३ जानेवारीपासून १ महिन्याची रजा मिळाली. उ. अ.

रा. सा. नारायण भाई विद्याखात्याचे डायरेकटर यांची स्वारी तळेगाव दशासर येथें आहे. पुढील आठवड्यांत उमरावतीस येईल.

कर्नेल नेंभार्ड साहेब कमिशनर वणीहून पांढरकवड्याकडे गेले.

गेल्या २२ वे तारखेस उमरावतीस गणेशदास बुलाकीदास यांचे येथें सुमार ६ हजार रुपयांची चोरी झाली.

खानबहादुर नवाब शाबुदिन साहेब अस्याची यांजपुढें एक दिवाणी मुकदमा चालत असतां प्रतिवादी गोविंदराम यानें मुकदम्यांतील एके मारवाडी दस्तऐवजाची नक्कल मागितली व त्या नकलेचें काम चालू असतां त्यानें आपल्या फायद्याचे कांहीं शद्ब त्या दस्तऐवजांत मागाहून घातले अशा संशयावरून त्यावर डिपुटी कमिशनर साहेब यांपुढें मुकदमा चालू आहे. त्याचा अजून निकाल झाला नाहीं. नबाब साहेब प्रतिज्ञेवर सांगतात कीं आपले समोर दस्तऐवज आल्यावेळीं तो आपण वाचून घेतला तेव्हां त्यांत ते शद्ब नव्हते व दुसरेही असेच येक दोन साक्षीदार झाले आहेत.

उमरावतीचे नाजर रा. मथुरादास तात्या यानीं ६ महिन्यांची रजा घेतली. त्यांचे जागेवर रा. बळवंत बापुजी डिपुटि क्लार्क आफ धी कोर्ट यांस नेमिलें व डि. क्लाo चे जाग्यावर रा. आबाजी नारायण इंग्लिश आफिसांतील क्लार्क यांस नेमिलें.

मि० फौलर साहेब हैदराबादेस एकस्ट्रा आसिस्टंट कमिशनर होते ते मरण पावले. त्यांनीं आजारी पणाची रजा घेतली तेव्हां मि० प्रिपारो हेड क्लार्क यांस त्यांचे जागेवर नेमिलें आहे. आतां कायमची जागा कोणास मिळते पहावें.

उदईक ताबुद थंड होणार याकरितां एथील सर्व सरकारी आफिसांमला[illegible] दिली आहे. शाळांसही त्य[illegible]टी आहे.

नारायण माहिपत नाजरचे मालाचा लिलाव चालू आहे. अजून १।२ आठवडे चालेल. काल सायंकाळीं कांचेचें सामान, सोन्या रुप्याचे दागिने, घड्याळें, तिजोरीची पेटी इत्यादि सात आठशें रुपयांची विक्री झाली. एका नाझराकडे जें संग्रहाचे किरकोळ सामान आहे तितकें दहा कुटुंबाच्या एकत्र संग्रहांत देखील सापडणें कठीण.

मि. अबदुल हक्क साहेब असिस्टंट कमिशनर यांस अकोल्यास नेमणार असें उ. अ. पत्रांत लिहिलें आहे.

जुडिशियल कमिशनर मे. अलार्डाइस साहेब यांची स्वारी मेहकराकडे आहे. व १४ वे तारखेस वाशिमास शेसन आहे व २९ वे तारखेस उमरावतीस सेशन आहे.

## वर्तमानसार

प्रिन्स बरोबरचे पाहूणे ड्यूक आफ सदरलंड व मि० अल्बर्ट ग्रे आग्रा एथून निघून मुंबईस आलें व गुरुवारीं ते विलायतेस गेले.

प्रिन्स आफ वेल्स आग्रा एथून ग्वालेरीस गेले. शिंद्यानीं फुलबागेंत १६ लक्ष रुपये खर्चून नवीन महाल बांधिला आहे तेथें त्यांस रहावयास जागा दिली. हत्तीबरून सरगस्त निघाली होती. एका उत्तम व शोभायमान हत्तीवर शिंदे व प्रिन्स बसले होते. बरोबर ३२ हत्ती शिवाय होते. दोहो बाजूनें सुमार १४००० फौज उभी केली होती व रोशनाई, दारू काम फार चांगले केलें होतें. शिंद्याच्या फौजेची प्रिन्स यानीं कवाईत पाहिली व फार संतोष दाखविला. पायदळ फौज तर केवळ इंग्रजी फौजे प्रमाणेंच आहे असें ते ह्मणाले. शिंदे सरकार सर्व फौजेच्या मध्यें सेनाधिपति होते व हुकूम करीत होते.

बंगाल इलाख्यांत बंगाली भाषेंत २० पत्रें उत्तम निघतात व मध्यम ३६ निघतात.

मद्रासची हिंदु जातीची एका सभ्य स्त्री जानकंमा विलायतेस गेली होती, तिनें इंग्लंडांतील चित्रें या विषयावर एक ग्रंथ लिहिला आहे. मद्रास इलाख्यांत स्त्रियांनीं लिहिलेला हा पहिलाच ग्रंथ होय.

कलकत्यास गेल्या महिन्याचे ११वे तारखेस ब्रह्मसमाजाची ११ वी वार्षिक सभा भरली होती. त्या प्रसंगी मोठा उत्साह झाला. सर रिचर्ड टेंपल साहेब, कलकत्याचे लार्ड बिशप साहेब व दुसरे ही कित्येक युरोपियन आणि नेटिव मिळून २००० मंडळी जमली होती. त्या प्रसंगीं बाबू केशव चंद्रसेन यानीं 'आपला विश्वास व अनुभव' यावर उत्तम व्याख्यान दिलें.

नाशिक व पंचवटी यांचे दरम्यान गोदावरीस पूल बांधण्यास लोकांनीं धमार्थ वर्गणी द्यावी अशाविषयीं तेथील मामलेदार रा. सा. काशिनाथ महादेव थत्ते यांनीं कलेक्टराचे अनुमतानें जाहिरात प्रसिद्ध केली आहे.

सिंध प्रांतांत एका पाटाचें पाणी पिऊन ४१९ मनुष्यें ठार मेलीं. बंधारा बांधून आणिल्याचा तो पाट होता. त्यांतील

पाणी कशानें विषारी झालें तें समजलें नाहीं.

नवीन गवरनर जनरल लार्ड लैटन साहेब एप्रिल महिन्याचे दुसरे तारखेस कलकत्यास येऊन दाखल होतील असें ह्मणतात. ते मुंबईकडून येणार व लार्ड नार्थब्रूक साहेबही मुंबईमार्गें परत जाणार.

मे० काजी शाबुदीन बडोद्याचे रिविन्यु कमिशनर कोकणांत वेंगुरल्यास गेले आहेत.

रा. रा. यशवंत वासुदेव आठल्ये एम ए. एल एल बी, रा. रा. रामचंद्र विष्णू गोखले बी ए, एल एल बी, आणि रा. रा. कृष्णाजी नारायण खेर बी ए, एल एल बी यांस हायकोर्टांत वकीली करण्याची परवानगी मिळाली.

मिस. लुसली. एच. ग्रीन नांवाची एक एम. डी ची परीक्षा उतरलेली युरोपियन बाई हिंदुस्थानांत डाक्तरीचा धंदा करण्याकारितां यावयाची असून ती अमेरिकेंतून या महिन्यांत निघणार आहे.

---

### रावणाच्या लंकेचें वर्णन

या बेटाची हवा समशीतोष्ण असून त्याची लांबी २७१ मैल व रुंदी १३७ मैल आणि क्षेत्रफळ २५,००० मैल आहे. या बेटास ९ नावें आहेत, सिंहलद्वीप, टाब्लोंटिनिया, असुरेंद्रद्वीप, लंका व ताम्रवर्णी देश. या बेटाचा राजा सिंहल या नावचा होता व त्यांत सिंहाची उत्पत्ती होते ह्मणून ह्यास सिंहलद्वीप हें नाव पडलें आहे. या बेटास रावणाची लंका ही ह्मणतात, येथें रावणानें राज्य पुष्कळ दिवस केलें ह्मणून त्यास असुरेंद्रद्वीप असेंही ह्मणतात. येथील लोक बौध्धधर्मी आहेत. बेटाच्या मध्यभागीं एक मोठा पर्वत असून त्यांतून नद्या निघाल्या आहेत. ह्यांत दोन वंशाचे राजे झाले त्यांत एकाचें नाव महावंश व दुसऱ्याचें नाव सुलूवंश. महावंशांत ८४४ व सुलूवंशांत ८१२ राजे झाले. महावंशांत बायकाही राज्य करीत असत. या वंशाचा मूळ पुरुष वलगबाहू नामें होता. सालूवंशाचा मूळ पुरुष विजयबाहू व शेवटला प्रकमबाहू. हा शेवटील राजा शास्त्रांत निपुण अहे. या वंशांतील राजे कोरीव काम व चित्रें काढणें यांत कुशळ होते अशी कीर्ति आहे. सन १६५८ त डच लोकांनीं ह्या बेटांतील ज्यापना प्रांत प्रथम हस्तगत केला, व इंग्रज लोकांनीं सन १७८२ त ट्रिंकोमाली हा किल्ला घेतला. या बेटांत जी मोठी नदी आहे तिला महानेली गंगा ह्मणतात; तिची लांबी १३४ मैल आहे ह्या बेटाच्या उत्तरभागांत वेदास लोक रहातात त्यांस कोणताही धर्म नसून देव मुळींच ठाऊक नाहीं, व त्यांस दुखणें आलें असतां औषध कांहींच घेत नाहींत. ह्या लोकांत बहीण भावंडांचीं लग्नें होतात. आपल्या देशांत बापाच्या पाठीमागें जसा पुत्र वारस होतो तसें येथें नाहीं. तीजिनगी कन्येच्या मुलास मिळते. एथें एका उपसागरांत मासे रात्रीं सुस्वर गातात. एथें एक विहीर आहे ती रामानें सितेला पाणी पिण्याकरतां बाण मारून उत्पन्न केली आहे असें ह्मणतात व तिचें पाणी कितीही उपसलें तरी कमी होत नाहीं. येथें ५ बंधूस एक बायको करण्याची चाल आहे. याचें कारण असें सांगतात कीं एक दोन भाऊ देशांतरीं गेले तरी पाठीमागें घरची सर्व व्यवस्था नीट रहावी. ह्या बेटांत एक वाडा आहे त्यांत ४,००० खोल्या व १,६०० खांब आहेत. एथें एक २,००० वर्षांच्या पूर्वीचें जुनें पिंपळाचें झाड आहे. रामेश्वर व हें बेट यामध्यें रामानीं जो सेतू बांधला आहे त्याची लांबी ८०० मैल असून रुंदी ८० मैल सुमारें आहे. व तेथें मोती पुष्कळ सापडतात. रत्नपुर नामें एक शहर आहे तेथें हिरे, माणकें वगैरे किंमतवान खडे उत्पन्न होतात. पण सोनें उत्पन्न होत नाहीं. येथें स्वर्गारोहणाचा डोंगर ७०० फूट उंचीचा असून त्याचे शिखरावर एक देऊळ आहे त्यांत सांभाच्या दोन पादुका आहेत. देवळाच्या पाठीमागें एक विहीर व झाड आहे त्याचीं फुलें पादुकांस वहातात व विहिरींतील पाणी तीर्थ असें मानतात. पूर्वीं एथें पांढरे हत्ती असत पण आतां मुळींच नाहींत. येथें दालचिनी, नारळ, तंबाखु वगैरे होत असून बुंद (काफी) पुष्कळ पिकतो.

अ. द.

---

## नोटिसा.

अनंदा वलद हनवंता पाटील कटोरे वस्ती मौजे सावरगाव प्रगणें सिंदखेड तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून देण्यांत येते कीं, अजमासे २ वर्षें झालीं तुह्मी आह्मापासून रुपये २२ कर्ज घेऊन रबीचे खळ्यावर देण्याचा करार केला होता त्याप्रमाणें १० रुपये वसूल दिले बाकी १२ रुपये राहिले आहेत. ते रुपये व्याजासुद्धां व नोटिशीचे खर्चासुद्धां ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसांचे आंत आणून द्यावे. असें न केल्यास रीतीप्रम[illegible]णें दिवाणींत फिर्याद करून सर्व खर्चासुद्धां रुपये घेण्यांत येतील कळावें. तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) हरजी वलद काशीबा पाटील
कुयरे रहाणार सिंदखेड
दस्तुर खुद्द.

---

नोटिस.

इमाम मुसलमान कडबीवाला वस्ती कसबे सिंदखेड तालुके मेहेकर यास खालीं सही करणार याजकडून कळावें कीं आजमासे २॥। तीन वर्षें झाली तुह्मी आमची कडबी १८ रुपयांस विकत घेऊन पैकी ८ रुपये वसूल दिला बाकी रुपये १० व्याजासुध्धां आजवर दिले नाहींत ते ही नोटिस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत नोटिसखर्चासुध्धां अणून द्यावें तसें न केल्यास दिवाणींत फिर्याद करून सर्व खर्चासुध्धां रुपये घेण्यात येतील कळावें तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) हरजी वलद कासीबा कुयरे वस्ती सिंदखेड दस्तुर खुद्द

---

नोटित

[illegible] द नागोजी मसणे रहणार [illegible] जानू वल[illegible]

आगीखेडे परगणें पातुर तालुके बाळापुर यास सिताराम राजाराम शिंपी दुकान पातुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे आमची बाकी वहीखात्यावरून रुपये ५० व शिवाय व्याज घेणें असून दोन तीन वेळा मागावयास पाठविलें असून देतों देतों ह्मणता परंतु उलगडा करीत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत आमची बाकी चुकती करावी. नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां रकम घेतली जाईल. व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) सिताराम राजाराम शिंपी
रहाणार पातुर
दस्तुर खुद्द

---

नोटिस

खानाजी वलद फकीरजी शेटेरहाणार आगीखेडें परगणें पातुर शेखबाबु तालुके बाळापुर यांस सिताराम राजाराम शिंपी दुकान पातुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे आमची बाकी वहीखात्यावरून २५ रुपये व शिवाय व्याज घेणें असून २।३ वेळा मागावयास पाठविलें असून देतों देतों ह्मणता परंतु उलगडा करीत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत आमची बाकी चुकती करावी. नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां रकम घेतली जाईल व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) सिताराम राजाराम शिंपी
दुकान पातुर शेखबाबू
दस्तुर खुद्द

---

नोटिस

बहिणाबाई मर्द श्रावण मिसाळ पाटलीण रहाणार आगीखेडें परगणें पातुर शेखबाबू तालुके बाळापुर इला सिताराम राजाराम शिंपी दुकान पातुर याजकडून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे आमची बाकी वही खात्यावरून व्याजासुद्धा रुपये १५ घेणें असून २।३ वेळा मागावयास पाठविलें असून देतों देतों ह्मणता परंतु उलगडा करीत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत आमची बाकी चुकती करावी. नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुद्धां रकम घेतली जाईल. व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) सिताराम राजाराम शिंपी
पातुरकर
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

उकिर्डा भामटी रहाणार आगीखेडें परगणें पातुर तालुके बाळापुर यास सिताराम राजाराम शिंपी दुकान पातुर याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्माकडे आमची बाकी वहीखात्यावरून रुपये ६० व शिवाय व्याज घेणें असून दोन तीन वेळा मागावयास पाठविलें. असून देतों देतों ह्मणता परंतु उलगडा करीत नाहीं ह्मणून ही मुदाम नोटिस दिली आहे. तर नोटिस पावल्यापासून १५ दिवसांत आमची बाकी चुकती करावी. नाहींपेक्षां तुह्मावर दिवाणी कोर्टांत दावा करून खर्चासुध्धा रकम घेतली जाईल. व ह्या नोटिसीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी

[सही] सिताराम राजाराम शिंपी
पातुरकर दस्तुर खुद्द.

---

नोटिस

रामराव जयकृष्ण वकील परतवाडेकर निसबत देशपांडे यांस सखारामजी व बुटाजी देशमुख झैसांगकर तालुके अकोलें याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मी नोटिस दिली ती पाऊन लिहिला मजकूर लक्षांत आला त्याचें उत्तर येणेंप्रमाणें — सदर्हू शेताविषयीं नुकसानीचा दावा करीन ह्मणून लिहिलें त्यास तुह्मास शेत लावणीस मुळींच मी दिलें नाहीं; ज्यांनें तुह्मास लावणीस दिलें त्याजवर तुह्मी दावा करावा. आणि याबद्दल पूर्वीं तें शेत वहितीस बापू भगवंत वकील रामतीर्थकर यांणीं मागितलें होतें ते वेळेस दर्यापुरचे तहशिलदार यांस त्यांनींकळविलें कीं हे दरखास्तीबद्दल प्रतिवादीनें सदर्हू शेताचे राजीनामे देऊन नंवर निकून वादीची आदाई केली. व तुह्मासही हा मजकूर माहित असावा कारण तुह्मी त्या गावचे पटवारी तेव्हां राजीनामा झाला तो तुमचे हातानीं झाला असावा असें असून सरकाराशीं दगाबाजी करून काय कारणानें शेत घेऊन आह्माव र कोणते आधारानें फिर्यादी करिता हें कळत नाहीं. सबब आह्मास तुमचें कांहीं देणें नाहीं. सात वर्षाचे करारानें सरकारांनून तुह्माला शेतें मिळालीं हें आह्मास मुळींच ठाऊक नाहीं. आमचा प्रतिवादी काशीबा यानें आमची जप्ती लागली ह्मणून शेतें रंभा माळी मामनेकर यास विकलीं व त्यानें आमचे फेडीकरितां रुपये दिले तेव्हां तुह्मीच त्या गावचे पांडे असल्यामुळें त्याचा राजीनामा कबुलायती लिहून घेतल्या. व त्याच खरेदीदाराचे हातांत सदर्हू शेतें आहेत. सबब लिलाव बोलण्याची किंवा घेण्याची तुह्मास मुळींच गरज नव्हती सबब तुह्मी कोणतेही प्रकारानें या कामात हक्कदार नाहीं. आह्मास तुह्मी विनाकारण नोटिस दिल्यामुळें हा जबाब पाठवावा लागला याचा खर्च आठ दिवसांत पाठवून द्यावा नाहीं तर फिर्याद करून वसूल केला जाईल. कळावें तारीख १ माहे फेब्रुवारी सन १८•६ इसवी.

(सही) सखाराम व बुटाजी
देशमुख झैसांगकर
दस्तुर खुद्द.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० अकोला, रविवार ता० १३ माहे फेब्रुवारी सन १८७६ इ० अंक ७

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे आगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे आगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणार लो कांकडून आगाऊ वर्गणी आली ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

पुंजाजी वेरकर रहाणार नायेगाव प्र गणें घाटबोरी तालुके मेहकर जिल्हे बुल- ढाणें यास रघुनाथदास लछमनदास मार- वाडी दुकान मौजे नायेगाव प्रगणे मजकूर तालुके मजकूर याजकडून देण्यांत येते कीं, तुह्मांकडे दस्तैवजावरून व वहीखात्या वरून व्याजासुद्धां १५० एक शें पन्नास रुपये येणें आहेत ते रुपये आम्ही तुह्मास दोन चार वेळां मागितले आपण देतों देतों ह्मणतां पण देत नाहीं ह्मणून या मुद्दाम नोटिशीनें असें कळवितों कीं, हो नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत सर्व रकम आदा करावी. याप्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणींत फिर्याद क रून कोर्टखर्चासुद्धां सर्व रकम वसूल कर- ण्यांत येईल व या नोटिशीचा खर्चही तुह्मापासून घेतला जाईल. कळावें. तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) रघुनाथदास लछमनदास

दस्तुर लछमनदास.

नोटिस.

राजश्री गणेशदास छोटमल आणि पातीदार शिवलाल लिटशीदास दुकान खरबडी तालुके मलकापुर यांस नोटिस देणार भिवसेन वलद महादू माळी रहा णार माटरगाव, महादू वलद शामा माळी आणि चहादू वलद शामा माळी रहाणार जयपुर तालुके मजकूर यांजकडून नोटिस देण्यांत येते कीं, भिवसेन मजकूर याचा मागील दस्तैवज ह्मणजे २०० रुपयांचा दस्तैवज छोटमल कायम असतांना झाले ला आहे आणि ज्यांत आह्मा दोघांची (महादू व चहादू) जामिनकी आहे तो या दस्तैवजापैकीं ९५ रुपये पोच वजा जातां २५० रुपये बाकी येणें राहिले ह्मणोन तुह्मापैकीं शिवलाल याणें तिघांस खामगाव मुक्कामीं एप्रिल सन १८७५ महिन्यांत खात्री देऊन सांगितलें. आह्मा सही पक्के ठाऊक आहे कीं, भिवसेन याणें एकवेळ रुपये ४५ व दुसऱ्या वेळीं ५० रुपये याप्रमाणें दोन वेळमिळून ९५ रुप ये आमचे मार्फत तुमचे येथें पटविले पण व्याजामुळें इतकी २५० रुपयाची रकम वाढली असावी असा संशय आह्मास आ ला यामुळें आणि शिवलाल याणें यावेळेस खामगावीं आह्मास असा भरवसा दिलाकीं तुह्मी तिघेही दुकानावर या ह्मणजे तुह्मास याप्रमाणें २५० रुपयांचा हिशेब दाखवीन जर अडीच शें रुपये निघाले नाहींत तर हल्लीं जो नवा दस्तैवज आम्ही तुह्मास करून मागतों तो रद्द करून तुह्मास परत देऊ. याप्रमाणें विश्वास दिल्यामुळें आ ह्मी शिवलालचे लायकीवर विश्वास ठेवून खामगावीं एप्रिल महिन्यांत दस्तैवज २५० रुपयांचा मागील रोख्याऐवजी भिवसेन याजकडून करवून दिला आणि त्यावर आह्मी दोघांनीं (महादू व चहादू) जामिनी घातली. हल्लीं सुमारें २ महिने झाले आह्मी तिघही दुकानावर आलों हो तों त्या वेळेस तुमच्या शिवलालच्या दिले ल्या विश्वासाप्रमाणें २५० रुपयांचा हि शेब तुह्मी आह्मास दाखविला नाहीं व न वा दस्तैवज रद्द करून दिला नाहीं आ- णि आह्मास सांगितलें कीं खामगावीं नवा केलेला दस्तैवज २५० रुपयाचा नसून ३५० रुपयाचा आहे या तुमच्या बोल ण्याचा आह्मास फार अचंबा वाटला आ णि ही तुमची खरोखर दगाबाजी आहे अ सें आह्मी पक्कें समजतों तर आह्मी लिहि- णार नसून तुह्मी पुढ्यांत काय लिहिलें हें ही जाणूं शकत नाहीं याकरितां तुह्मास या नोटिशीनें साफ कळविण्यांत येतें कीं खामगावचा नवा झालेला दस्तैवज आम च्या खऱ्या समजुतीप्रमाणें झाला नाहीं या करितां तो आह्मी या लेखावरून रद्द के ला आहे. तथापि प्रथमचा २०० रुपयां चा दस्तैवजावरून ९५ रुपये पोच वजा जातां बाकी आजपर्यंत चार लोकांसमक्ष हिशेब व्याजा मुदलासुद्धां जो आकार हो ईल तो मात्र आह्मी तुह्मास देवाल आहों जरी हा रोखा पुष्कळ दिवस झाल्यामुळें कायद्याबाहेर गेला असेल तरी अशा वि षयीं आह्मी तकार घेणार नाहीं परंतु तुम ची आदाई याच रोख्यावरून होईल मागू न झालेल्या दस्तैवजाशीं कांहींच संबंध नाहीं आणि तो आह्मास कबूल नसल्या वरून आह्मी रद्द केला आहे असें या नो टिशीवरून आह्मी तुह्मास उघडपणें जा हिर करितों कळावें तारीख ४ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) भिवसन वलद महादू माळी

माटरगाव

महादु वलद शामा माळी

जयपूर

चहादु वलद शामा माळी

जयपुर

निशाणी हातची रेघ

नोटिस-

रेनी मर्द सखाराम गुरव वाघ वस्ती कारंजें तालुके मूर्तिजापूर इला खालीं सही करणाराकडून नोटिस देण्यांत येतें कीं, तूं माझी गंधर्वाची बायको असून तुझ्या- शीं माझें गंधर्व झाल्यास सुमारें २५ वर्षे झालीं. पूर्वीं तुझें रीतीप्रमाणें येणें जाणें होतें. अलीकडे १०।१२ वर्षांत तूं मुळींच आली नाहींस. वेळोवेळीं आह्मी जातीनें तु ला नेण्याकरितां येत होतों व गाडी बैल माणसें पाठवीत होतों परंतु आली नाहींस मागाहून येते व माझा बाप अमक्या दिव शीं मला पोचवितो अशा अनेक प्रकार- च्या थापा दिल्या. बापाचे घरीं रहाणें हें फार अयोग्य आहे. माझा संसार व्हावा व तुझी इज्जत रहावी याकरितां ही नोटिस मुद्दाम देऊन असें कळवितों कीं नोटिस पावल्यापासून २० दिवसाचे आंत तूं मा झे घरीं निघून [illegible] न आली तर रीती प्रमाणें तुजला ताब्यांत घेण्याची कायदे शीर तजवीज केली जाईल. लोकांचे सां गण्यांत व माझे ऐकण्यांत असें आलें कीं तू पुन्हा गंधर्व करणार अथवा करशील त र तुजवर व गंधर्वाचे नवऱ्यावर आणि गं- धर्व करण्यास मदत करणारे लोकांवर फौ जदारी होईल व कैदीच्या वगैरे शिक्षे तील हें समजून करणें असेल तें करावें कळावें तारीख ५ फेब्रुवारी १८७६ इ-

(सही) सखाराम वलद गोटाजी गुरव

वाघ वस्ती लोणी तालु

के मोर्शी निशाणी खुद्द

नोटिस

राजश्री जानजी वलद नवलाजी पाटी ल वस्ती नायेगाव प्रगणे घाटबोरी तालुके मेहेकर जिल्हे बुलढाणें यांस ठाकुरदास खीमराज मारवाडी दुकान मौजे आलेगा व तालुके बाळापुर जिल्हे अकोलें याजक डून नोटिस देण्यांत येतें कीं तुह्माकडे आमचे खातेबाकीवरून रुपये घेणें ५६० व्याजा सुद्धां आजवर निघाले. ते रुपये आह्मी तुह्मास २१४ वेळा मागितले आप ण देतों देतों ह्मणता पण देत नाहीं ह्म णून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही नोटिस पावल्यापासून ८ दिवसांचे आंत सदर्हू रकम आदा करावी याप्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणी कोर्टांत फि र्याद करून रुपये कोर्टखर्चासुद्धां घेतले जातील व या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावें. तारीख ७ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) ठाकुरदास खीमराज

दस्तुर लछमनदास

नोटिस

बनाम जानासा हिरासा लाड रहाणार मौजे पास्टल प्रगणे पातुर तालुके बाळापु र जिल्हा अकोलें यांस शामलाल ओंकार दास मारवाडी दुकान मौजे आलेगाव ता लुके बाळापुर जिल्हे अकोलें याजकडून देण्यांत येतें कीं तुह्माकडे खातेबाकीवरून घेणें १२० रुपये व्याजासुद्धां आहेत ते आह्मी तुह्मास २।४ वेळ मागितले परंतु आपण देतों देतों ह्मणता पण देत नाहीं. ह्मणून मुद्दाम या नोटिशीनें असें कळवि तों कीं ही नोटिस पावल्यापासून ८ दिव साचे आंत सर्व रुपये आदा करावे या प्रमाणें न केल्यास तुह्मावर दिवाणींत फि र्याद करून कोर्ट खर्चासुद्धां रुपये घेतले जातील व या नोटिशीचा खर्चही तुह्मापा सून घेतला जाईल. कळावें तारीख ७ फे ब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) शामलाल ओंकारदास

दस्तुर मुलतानचंद

नोटिस

एकोबा वलद राघो तेली रहाणार क- सबे नांदुरें तालुके मलकापुर जिल्हे खाम- गाव यास खालीं सही करणार इजकडून नोटिस देण्यांत येते कीं, माझा तुझ्याशीं गंधर्व विवाह झाला त्यास नऊ वर्षे झालीं. त्यांत दीड वर्ष मी तुझे घरीं होतें पण तूं मजकडे पहात ही नव्हता व पुढें मला तूं माझे आई बापाचे घरीं आणून घालविलें स नंतर माझे बापानें दोन च्यार वेळा पंचमार्फत मला घेऊन जाण्यास निरोप पाठविले परंतु पंचांदेखत मला बायको नको तिणें पाहिजे तें करावें असें तूं बोल- लास त्यावरून मी तुला फारकत मागित- ली ती तूं दिली नाहींस सबब ही नोटिस तुला दिली आहे तर नोटिस पोंचल्यापा- सून १५ दिवसांचे आंत मला घेऊन जा- वें व आठ वर्षांचे पोटगी खर्चाबद्दल म- ला कर्ज झालें आहे तें द्यावें नाहीं तर फा रखत द्यावी. जर याप्रमाणें न करशील त र मी दुसरा घरठाव करण्याची कायदेशीर तजवीज करून नोटिशीचा खर्च भरून घेईन कारण मला पोट भरण्याची गैरसो य झाली आहे व आतां कोणी कर्जही दे त नाहीं करितां तुला कळविलें आहे. ही नोटिस लिहून दिली सही तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) सोनाई मर्द एकोबा

तेलीण इचे हातची

निशाणी बांगडी.

दस्तुर गणपतराव खामगावकर

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ४ शके १७९७.

## आमच्या रेसिडेंट साहेबांचें गौरव

हिंदुस्थान सरकारचें गेले आठवड्याचे ग्याझेटांत सर रिचर्ड मीड साहेब यांची हैदराबादचे रेसिडेन्सीवर अॅक्टिंग नेमणूक केली आहे. व ती करतांना त्याजविषयीं यांच्या बडोद्याच्या कामगिरीच्या संबंधानें सरकारास कसें काय वाटलें आहे तेंही सरकारानें प्रसिध्ध केलें आहे आणि त्यावरून त्यांची उत्तम योग्यता स्पष्ट दिसून येते याजकरितां आमच्या प्रांताचे मुख्य सरकार जे सर रिचर्ड मीड साहेब त्यांविषयीं त्यांचे वरिष्ठ सरकार जे लार्ड नार्थब्रूक साहेब त्यांचें मत काय आहे तें आमच्या वाचकांस कळणें अवश्य आहे जाणून आम्ही सदहू हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटाच्या आधारें तो मजकूर सारांशानें खालीं लिहितों:—

गवरनर जनरल इन कौन्सल हे सर रिचर्ड मीड के सी एस आय यांस हैदराबादच्या रेसिडेंटाचे जागेवर आफिशियेटिंग नेमतांना त्यांनीं बडोद्यास एजंट व स्पेशियल कमिशनर असले वेळीं जी उत्तम चाकरी बजाविली तिजविषयीं सरकारचे दप्तरीं दोन शद्ब लिहून ठेवणें अवश्य आहे असें समजतात. बडोद्यास सर लुईस पेली यांजपासून सर रिचर्ड मीड यांणीं तारीख १० माहे एप्रिल सन १८७५ इसवी रोजीं गवरनर जनरलचे एजंट व स्पेशियल कमिशनर या कामाचा चार्ज घेतला, त्या वेळीं महत्वाचीं अशीं पुष्कळ कामें त्यांस करावयाचीं होतीं ह्मणजेः—

१ मल्हाररावाचे जागीं नव्या राजाची निवड करणें व त्याला सुशिक्षण देण्याची तजवीज करणें.

१ बडोदेशायीं राज्याची पुन्हा संस्थापना करणे.

१ रिविन्यु खात्याची, वसुली खात्याची व जमीन बाबेची सुधारणा करणें

१ संस्थानच्या रेग्युलर व इरेग्युलर फौजेची सुव्यवस्था करणें.

१ सरदार व दरकदार यांचे पगार व वतनाचे हक्क याजबद्दलच्या भानगडी.

हीं व या सारखीं दुसरीं मोठमोठीं महत्वाचीं कामें मीड साहेबांच्या कर्तबगारीवर अवलंबून होतीं. पण तीं त्यांनीं आपल्या उत्तम हुशारीनें, धूर्ततेनें व कौशल्यानें आणि सर टी माधवराव दिवाण यांच्या मदतीनें इतकीं चांगलीं केलीं कीं तेणेंकरून हिंदुस्थान सरकार बालंबाल खुष झाले. बडोदें शहरांत व गायकवाडाच्या एकंदर सर्व राज्यांत हल्लीं जी शांतता आहे व जे उदीम व्यवहार सुरळीतपणें सर्वत्र चालू झाले आहेत ते सर्व मीड साहेबांच्या शहाणपणाचे व बेतावाताचे परिणाम होत व या अशा मुत्सद्दगिरीच्या राज्यव्यवस्थेपासून व मीड साहेबांच्या पोक्त सल्लाहगिरीपासुन बडोद्याच्या राज्याला जे फायदे पुढें होतील ते केवळ सामान्य नव्हेत ह्मणून आणि हिंदुस्थान सरकार हे बडोद्याच्या लोकांच्या आणि गायकवाड सरकारच्या हिताविषयीं परमदक्ष आहे ह्मणून त्या सरदाराच्या उत्तम कारागिरीनें व फलद्रुपत्तानें त्या संस्थानचें व त्यांतील लोकांचें परमहित झालें व होत आहे त्या सरदाराची ती फलद्रुपता कबूल करावी व तीकरितां त्यांचे मनापासून आभार मानावे हें हिंदुस्थान सरकारास योग्य वाटतें.

## कलाकौशल्य.

( Communicated. )

( ग्रीक पुराणांतील एक सुंदर गोष्ट. )

आजपर्यंत दोन तीन कलांविषयीं थोडथोडें आम्ही लिहिलें, आतां आज वाद्य, नृत्य, आणि गीत या कलांविषयीं लिहितों.

वाद्य, नृत्य आणि गीत या तीन कलांचा परस्परांशीं फारच निकट संबंध आहे. त्यापैकीं वाद्य आणि गीत यांची तर एक मिठीच आहे, किंवा या दोन्ही कला सख्या बहिणी आहेत, व एकीची ज्यावर कृपा, त्यावर दुसरीची हटकून असायाची; असें ह्मटलें तरी चालेल. या तिन्ही कला फार पुरातन कालापासून लोकांस अवगत आहेत. ह्या तिन्हीही मनुष्याचें रंजन करणाऱ्या असल्यामुळें त्यांचें चित्त ज्योतिशास्त्राचा शोध लावण्याकडे किंवा रसायन शास्त्रांतील पडताळे पहाण्याकडे, त्रिकोनमितीच्या किंवा लागर्थमाच्या अति दूरच्या विषयास हात घालून गहन गणित विषयाकडे, न वळतां करमणूक करणाऱ्या वर सांगितलेल्या तीन कलांची सुधारणा करण्याकडे लागलें असेल यांत फारसें आश्चर्य नाहीं, कारण मनुष्याच्या मनाचा स्वाभाविक-धर्मच तसा आहे. पृथ्वीवरील कोणत्याही राष्ट्राच्या स्थितीविषयीं विचार केला तरी हीच गोष्ट जेथें तेथें दृष्टीस पडेल. या कलांनीं पूर्वीच्या इतिहासांतील बहुतेक जागा व्यापिली आहे असें ह्मणण्यास चिंता नाहीं. आपल्या पुराणांत जिकडे तिकडे गंधर्वांच्या आणि अप्सरांच्या गोष्टी. ग्रीक लोकांचीं पुराणें देखील अशाच गोष्टींनीं भरलीं आहेत. इंग्लिश लोकांचे ग्रंथ जरी फार अलीकडचे आहेत, तरी त्या लोकांत पूर्वीच्या कथा लिहिणाऱ्या मिल्टन प्रभृति कवींनीं स्वर्गांतदेखील या कला पूर्णपणें भरल्या होत्या, व देव आणि देवदूत रात्रंदिवस वाद्य, नृत्य आणि गीत यांत सर्वकाळ गढून गेलेले असत असें जागोजाग ह्मटलें आहे. या संबधानें ग्रीक-लोकांच्या पुराणांतील एक सुंदर गोष्ट लिहिली असतां आमच्या वाचकांना रुचेलसें वाटल्यावरून लिहितों—

ग्रीक लोकांमध्यें फार प्राचीन काळीं आरफोअस नांवाचा एक वाद्य नायक होऊन गेला; कित्येकांचें असें मत आहे कीं तो आपोलो देवतेचा मुलगा असावा. मंगळानें वाद्य कला याला पढविली; व एक सुंदर विणा बक्षीस दिला असें ह्मणतात. यानें इरुडायीस नांवाच्या अतिरूपवती स्त्रीशीं लग्न लाविलें. याची वाद्य प्रवीणता अशी असे कीं, यानें वाद्य वाजविण्यास सुरुवात केली ह्मणजे खळखळ वाहणारे ओढे थांबत. व्याघ्रासारखीं दुष्ट हिंसक जनावरें द्वेष बुद्धि विसरून हरिणीच्या आणि बकरीच्या पोराजवळ येऊन स्वस्थ उभीं रहात; आणि मूढमति पर्वत आपलीं मस्तकें ( शिखरें ) डोलवीत. सर्व वस्तु त्याच्या वाद्य प्रयोगाला लंपट होऊन जात, व अप्सरा आणि देवांगना देखील त्याची मैत्री करण्याची खटपट करीत. इरुडायीस नांवाच्या वर सांगितलेल्या देवांगनेनें मात्र त्याचें मन मोहून टाकिलें, यामुळें यानें तिच्याशीं लग्न लाविलें. हीं नवरा बायको सुखानें फार दिवस एकत्र राहिलीं नाहींत. अरिस्टिअस या नांवाचा एक पुरुष तिच्या रूपाला अगदीं मोहून गेला, व ती वश होईना, ह्मणून तिच्यावर बलात्कार करावा अशा बुद्धीनें तिच्या पाठीमागें लागला. ती या दांडग्या लांडग्याच्या हातून सुटावें ह्मणून पळत असतां, गवतांतून एक प्रचंड सर्प बाहेर आला, व त्यानें तिच्या पायाला कडकडून दंश केला यामुळें ती मरण पावली. आरफीअसानें तर असा निश्चय केला कीं, एक तर तिला जिवंत करायाचें किंवा, आपण तिच्यासाठीं प्राण सोडावा. त्यानें एक वेळ उत्तम रीतीनें आपला विणा लाविला आणि तो वाजवीत वाजवीत नरकाधिपती जो प्ल्युटो याजकडे तो गेला. तो वाद्यध्वनि श्रवण केल्यावरोबर प्ल्युटोनें त्याला नरक लोकांत येऊं दिलें आणि नरक लोकांतून परत जाई तोंपर्यंत मागें पहाणार नाहीं असें वचन देशील तर तुझी स्त्रीही तुला सजीव सदेह परत देतों असें कबूल केलें व त्याप्रमाणें दिली. पुढें नरक लोकाच्या सीमेजवळ तीं दोघें प्राप्त झालीं तेव्हां हा आपलें वचन विसरला आणि मागें पाहूं लागला इतक्यांत इरुडाइस नाहींशी झाली. यामुळें फार पश्चात्ताप पावून एकांतांत रहाण्याचा त्यानें निश्चय केला परंतु थ्रेशिअन जातीच्या कांहीं स्त्रिया त्याच्या फारच नादीं लागल्या पण तो कांहीं केल्या आपलें औदासिन्य सोडून त्यांची मनकामना पुर्ण करीना, यामुळें त्यांना फारच राग आला व यामुळें त्यांनीं आरफीअसास फाडिलें आणि त्याचे तुकडेतुकडे करून हरबअस नावाच्या नदींत फेंकून दिले. ही नदी इजिअन समुद्रास मिळते. या नदीच्या मुखाजवळ इरुडाइस इरुडाइस असा शद्ब अद्याप पावेतों निघतो या वाद्य नायकाचे कांहीं ग्रंथ अद्याप पावेतों ग्रीक लोकांत सांपडतात. याप्रमाणेच आपल्या पुराणांतही अनेक कथा आहेत. कौशिक ऋषींचा तपोभंग करण्याकरितां मेनका नामक अप्सरेस इंद्रानें पाठविलें व तिनें आपलें वाद्य, नृत्य आणि गीत यांहीं इंद्राचें काम बरोबर बजाविलें. तसेंच शुकाकडे रंभेला पाठविलें होतें पण तो वश झाला नाहीं अशा प्रकारच्या कित्येक गोष्टी आहेत.

## संवयी

[ मागील अंकावरून पुढें चालू. ]

तिसरी संवयी तुह्मी लावून घ्या ती अशी कीं दृढ निश्चयाची शक्ति वाढवा.

दृढ निश्चय ह्मणजे एखाद्या कार्य सिद्धीसाठीं योजलेला जो उपाय तो तीं सिद्धी होईपर्यंत पुनःपुनः करणें. असें करणें. एक दिवस दोन अथवा तीन दिवस असें उपयोगाचें नाहीं. तें सततचें पाहिजे. प्रथमतः दूरवर चांगला विच्यार करावा, मग दृढनिश्चय करावा. व असा निश्चय करून झाला ह्मणजे लहान सहान जरी अडचणी आल्या तरी त्यांस न डगतां निश्चित उपाय करण्याच्या मार्गें पूर्णपणें लागावें. जर शहाणपणानें दूरवर विच्यार केला नाहीं तर निश्चय होणें कठीण, झालाच तर डळमळीत राहील व त्याच्या अंगीं दृढता येणार नाहीं. असें झालें ह्मणजे मग धर सोडीचा प्रकार चालू होईल. दुसरें आजचें काम उद्यावर टाकण्याची संवयी फार नाशकारक आहे. आपण ह्मणतों कीं, अं: त्या पत्राचें उत्तर लिहायाचें आहे तें ना उद्यां लिहूं. टिपण वहीत अथवा जमाखर्च वहींत त्या दोन तीन गोष्टी लिहून ठेवायाच्या त्या संध्याकाळीं ठेवूं इत्यादि बोलणें आळसावर काम घालविणाराचें होय. अशा प्रारंभाचा शेवट कोणीकडे होईल हें सांगायास नको. जे लोक आपल्या दृढ निश्चयाच्या योगानें मोठेपणास चढले त्यांच्या गोष्टी ऐकिल्या असतां फार आश्चर्य वाटतें. बाराचार्लस याची अशी एक गोष्ट सांगतात कीं यास चोवीस चोवीस तासपर्यंत एक सारखें घोड्यावर बसण्याची संवय असे, व तो याप्रमाणें आपल्या सर्व राज्यभर फिरे. एके दिवशीं जातां जातां ज्या घोड्यावर तो बसून चालला होता तो घोडा मार्गांत थकून मेला. त्यानें घोड्याचें जीन खोगीर वगैरे सामान काढून तें आपल्या डोक्यावर घेऊन तो चालला. पुढें एक धर्मशाळा लागली तेथें तबेल्यांत एक घोडा बांधलेला होता तो सोडून त्यावर खोगीर घालून तो घेऊन चालला. इतक्यांत तेथील मालक येऊन चौकशी करूं लागला तेव्हां राजानें सांगितलें कीं खोगिराचें ओझें माझ्यानें नेववत नाहीं याकरितां मी हें घोडें घेऊन चाललों. हें उत्तर अर्थातच मालकास रुचलें नाहीं व त्यानें तरवार उपसली. राजाही तरवार उपसून तयार झाला. इतक्यांत तेथील पाहारेकऱ्यानें जवळ जाऊन पाहिलें तो राजा असें त्यानें ओळखिलें, व लागलीच धन्यास जाऊन ह्मणाला कीं आपली तरवार राजावर उचलेली आहे. हा त्या राजाच्या दृढ निश्चयाचा एक मासला झाला, दृढ निश्चय असला ह्मणजे मोठमोठीं कार्यें प्रत्येक मनुष्याच्याने होतील.

## वऱ्हाड.

सर रिचर्ड मीड साहेब यांची हैदराबादच्या रेसिडेन्सीवर अॅक्टिंग नेमणूक केल्याचें गेल्या आठवड्याच्या हिंदुस्थान सरकारच्या ग्याझेटांत प्रसिद्ध झालें आहे.

सर सालरजंग हैदराबादचे दिवाण साहेब यांणीं मि० आलिफंट साहेब यांस आपले प्रायव्हेट सेक्रेटरी नेमिलें. इंदुप्रकाशांत लिहिलें आहे कीं, ही नेमणूक दूरविच्यारानें झाली नाहीं.

प्रिन्स आफ वेल्स आतां परत जाण्याकरितां लवकरच मुंबईकडे जातील तेव्हां तरी त्यांची आणि निजाम सरकारची

मुंबईस किंवा लेणीं पहाण्याचे जागीं भेट व्हावी असा बूट निघाला होता पण उन्हाळ्याचे दिवस आले ह्मणून तो बेत जागच्या जागींच राहिला.

---

गेल्या मंगळवारचे टाइम्स पत्रांत ६वे तारखेचा अलाहाबादचा एक टेलिग्राफ आहे त्यांत कांहीं बातम्या लिहून शेवटास असें लिहित आहे कीं कर्नेल एडवर्ड था मसन मुर्शिदाबाद येथील गवरनर जनरल चे एजंट सुमारे दीड महिन्यांनीं विलायतेस जातील व त्यांचे जागीं मेजर टवुइडी साहेब यांची नेमणूक होईल.

हे टवूइडी साहेब आमचे हैदराबादचे फर्स्ट असिस्टंट रेसिडेंट असावे. कारण त्यांच्या जाग्यावर दुसऱ्या गृहस्थाची नेमणूक केल्याचें मागेंच आपणास कळलें आहे.

---

गेल्या महिन्याचे अखेरीस डिपुटी कमिशनर कचेरींत अकोला जिल्ह्याचे अबकारी हरासाचे लिलाव झाले. त्याच्या रकमा कायम झाल्या त्या—

| | रु. |
|---|---|
| कलाली .... .... .... | २१४४२५ |
| अफू गांजा .... .... .... | ५७६२० |
| विषयुक्त पदार्थ .... .... | ३९४२ |
| इंग्रजी दारू .... .... .... | ५९९० |

---

क्या. मेकंजी साहेब उमरावतीचे डिपुटी कमिशनर तेथील लायब्ररीचे प्रेसिडेंट झाले.

---

खा. ब. नबाब शाबुदीन साहेब उमरावतीचे अद्धाची यांस मे. शेख हिसामुदीन साहेब यांचे ३ महिन्यांचे रजेंत सिंकदराबादेस नेमिलें व त्याप्रमाणें ते या आठवड्यांत तिकडे चालते झाले.

---

मि० इलिएट साहेब वऱ्हाडांतील विद्याखात्यांतील माजी डायरेक्टर बडोद्यास गायकवाड महाराजास शिक्षक ह्मणून गेले आहेत त्यांचें शिक्षण प्रकरणाचे संबंधानें ज्ञानप्रकाशाचे बडोद्याचे बातमीदाराचे पत्रांत थोडासा मजकूर लिहिला आहे तो असा:—

महाराजांचा अभ्यासही चांगला चालला आहे. त्यांची शिकण्याची जागा मोती बागेंत आहे व तेथें जवळच सरकारचे शिक्षक इलियट साहेब रहातात. इलियट साहेब महाराजांना इंग्रजी शिकवीत असतात. व २ मास्तर मराठी शिकविण्यास आहेत. यापैकीं एक मास्तर जेव्हां इलियट साहेब इंग्रजी शिकवितात तेव्हां जवळ उभा राहून इंटरप्रिटरचें काम करण्यास लागतो, कारण इलियट साहेबांस मराठी येत नाहीं व सरकारांना तर इंग्रजी समजत नाहीं. याजकरितां इलियट साहेब काय ह्मणतात हें समजून सांगण्यास कोणी तरी इंग्रजी मराठी जाणणारा मनुष्य लागतोच. जो इंटरप्रिटरचें काम करतो त्यास शिकविण्याचें काम करतां येणार नाहीं काय असें आपणास कदाचित वाटेल व असा द्राविडी प्राणायाम करण्यांत काय दा नाहीं असें आपल्या मनात येईल पण त्याचा कांहीं उपयोग नाहीं कारण व्हाइसराय व दिवाण या दोघांचीही खात्री होऊन गेली आहे कीं, हजार रुपये दरमहावाल्या युरोपियन विद्वानाखेरीज महाराजांना इंग्रजी शिकविण्याचें काम कोणाच्याही हातून होणार नाहीं मग महाराजांनी भाषा समजतें ती जरी त्या युरोपदेशीय विद्वानास नाहीं आली तरी चालेल. इंटरप्रिटर लागला तरी फिकीर नाहीं इंग्रजी शिकतांना नेटिव लोकांना कोणत्या ठिकाणीं अवघड जातें व तेथें कसें समजून द्यावें हें जरी नेटिव विद्वानास, चांगलें समजलें तरी तो अयोग्य व हें युरोपियन विद्वानांस जरी नाहीं समजलें तरी तो शिकविण्यास योग्य अशीच इकडे चाल आहे.

---

मे. अबदुल हक्क साहेब एकस्ट्रा असिस्टंट कमिशनर रजेवर आहेत. त्यांच्या विषयीं अशी एक सुवार्ता आली आहे कीं ते पुन्हा वऱ्हाडांत येत नाहींत. त्यांस निजाम सरकारचे मुलखांत तालुकदारीची जागा मिळाली किंवा मिळणार. याविषयीं आह्मास पुष्कळ लिहावयाचें आहे. पण बातमीचा खरेपणा समजल्यावर अधिक लिहू.

---

रा. रा. गोविंदराज अप्पा मोर्शीचे तहशिलदार येथें आहेत ते पुढील आठवड्यांत आपले कामावर जातील.

---

हैदराबादेस मयत फौउलर साहेब यांचे जागेवर मि. प्रियारो यांचीच नेमणूक कायम व्हावी असें घाटत आहे.

---

अकोल्याचे पोस्ट आफिसांत २ प्रहरचे मुंबई डाकेला शिपाई पाठविला असतां नवीन पोस्ट मास्तर त्यास लखोटे देत नाहींत असा किखेकांचा बोभाट आमचे कानीं आला आहे. याविषयीं त्यांनीं काळजी घ्यावी अशी आमची त्यांस सूचना आहे.

---

मेहेरबान लायल साहेब रजपुत संस्थानांतील गवरनर जनरलचे एजंट कलकत्यास गेले आहेत. थोड्या दिवसांत कलकत्यास ही त्यांची दुसरी खेप होय.

---

परवाचे दिवशीं दोन प्रहरां येथील पलटणीमध्यें आग लागून दोन घरें जळालीं. बाजूचीं आणखी दोन घरें पलटणवाल्यानीं तोडून टाकलीं त्यामुळें पुष्कळ बचाव झाला, नाहींपेक्षां आग भडकली असती.

---

## सिंक्लेर मेमोरियल फंड.

| | वसूल रुपये. |
|---|---|
| रघुनाथ हनमंत आसे. मा. पातुरडा | २० |
| वामन रघुनाथ हे. मा. जळगाव | १० |
| रामचंद्र नारायण फ. असि. जळगाव | ५८८ |
| मार्तंड कृष्ण हेड मा. पातुर्डा | ५ |
| रामचंद्र विनायक हेड मा. पातुर | ५ |
| महमद शरीम हेड मा. मलकापुर | ५ |
| आबू अहमद हेड मा. ताजनापेठ | ५ |
| नारो रघुनाथ मा. ट्रेनिंग कालेज | ४ |
| काशिनाथ विष्णु हेड मा. तेल्हारा | ४ |
| नारायण बल्लाळ असि. मा. जळगाव | ३८८ |
| बळवंत आबाजी हेड मा. आसलगाव | ३ |
| विष्णु कृष्ण हेड मा. वानखेड | ३ |
| वामन गणेश हेड मास्तर सुनगाव | ३ |
| कृष्णाजी मोरेश्वर हेड मा. पिंपळगाव | ३ |
| बापूजी आत्माराम हेड मा. सोनाळें | ३ |
| मार्तंड रंगनाथ हेड मा. जामोद | ३ |
| चिंतामण रामचंद्र हेड मा. दाताळें | ३ |
| नरहर सखाराम हेड मा. धामणगाव | ३ |
| जनार्दन विश्वनाथ हेड मा. चांदुर | ३ |
| शेख कासम हेड मा जळगाव | ३ |
| काशिनाथ परशराम हेड मा. बावनबीर | ३ |
| केशव गोपाळ हेड मा. वरवट | २८८ |
| कृष्णाजी वासुदेव अ. मा. जळगाव | २८८ |
| सखाराम विठ्ठल हेड मा. धरणगाव | २ |
| महमद आलमोदीन अ. मा. मलकापुर | २ |
| रामचंद्र वासुदेव हेड मा नरवेल | २ |
| आबाजी विष्णु हेड. मा. हिंगणें काजी | २ |
| नारायण बल्लाळ हेड मा. देवधाबे | २ |
| राजाराम सदाशिव हेड मा. माकोडी | २ |
| गोविंद हरी हेड मा. पिंपरी गौळी | २ |
| वामन गणेश हेड मा. उकळी | २ |
| गंगाधर गोविंद हेड मा. शेलापुर | २ |
| हरी बाळाजी हेड मा. रोहिलखेड | २ |
| परशराम श्रीधर हेड मा. शेंबे | २ |
| साहिबखा हिमतखा हेड मा. बडनेर भो. | २ |
| विठ्ठल देवराव हेड मा. संग्रामपुर | २ |
| बापुजी पुनाजी हेड मा. जळगाव | २ |
| धोंडो लक्ष्मण हेड मा. वाडसिंगी | २ |
| महमद बिसमिल्ला हिं. शा. मलकापुर | २ |
| त्रिंबक रामचंद्र अ.सि. मा. पातुर | २ |
| दरवेशखान अ. मा. ताजनापेठ | २ |
| सखाराम वामन हेड मा. टुणकी | २ |
| आपाजी गोविंद अ. मा. जळगाव | १८८ |
| महादेव वामन मेड मा. खेर्डे | १८८ |
| गुढण वल्लद अबदुल्ला हे. मा. गाडेगाव खुर्द | १८८ |
| वासुदेव बाबाजी हेड मा. सावरगाव | १८८ |
| देवराव शिवराम अ. मा. एकलारा | १ |
| अबदुल मुजीद हेड मा. मलकापुर | १ |
| महादेव सखाराम अ. मा. दाताळें | १ |
| कृष्णाजी रामचंद्र अ. मा. मलकापुर | १ |
| नारायण बल्लाळ अ. मा. | १ |
| रावजी भावजी अ. मा. धामणगाव | १ |
| शिताराम बळवंत अ. मा. चांदुर | १ |
| महादेव वामन अ. मा. टुणकी | १ |
| नारायण रामचंद्र अ. मा सोनाळ | १ |
| नारायण सदाशिव अ. मा. वडसिंगी | १ |
| नारायण बाळकृष्ण अ. मा. पिंपळगाव | १ |
| लक्ष्मण शिवराम अ. मा. सुनगाव | १ |
| सखाराम गणेश अ. मा. वलखेड | १ |
| गणू केशव अ. मा. पातुर्डे | १ |
| चिमणाजी विक्रम अ. मा. बावनबीर | १ |
| नामदारखा अ. मा. हिं. शा. जळगाव | १ |
| बाळाजी गणेश अ. मा. जामोद | १ |
| गुलामनबीसाहेब हेड. मा. हिं. पातुर | १ |
| गोविंद दिवाकर सेकंड अ. मा. पातुर | ८८ |
| | १६७८८ |
| मागील | ३६६ |
| एकूण | ५३३८८ |

---

### ग्रामाहून आलेली नोटिस

नागो वल्लद टुलाजी तेली राहणार बेलखेड परगणे अडगाव तालुके अकोट यास खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचेकडेस माझे रुपये १०० होते त्याचे फेडीकारितां तुह्मी मौजे बेलखेड येथील सर्वे-नंबर १२८ एकर १७ गुंठे ६ आकार रुपये २९ हें शेत धर्मा वल्लद पुर्णा माळी याचे नावें असून तुमचा निमे हिस्सा आहे तो सदरील रुपयाचे फेडीकरितां तारीख १ माहे जुलाई सन १८७४ रोजीं पटा रुपये १चे स्टांपावर लिहून सन १२८४ तागाईत सन १२८८ पावेतों पाच वर्षांचा लिहून दिला आहे त्याप्रमाणें जमीन माझे ताब्यांत आहे त्यांत तुह्मी लिहून दिलें आहे कीं, पांच वर्षे वाहून कुंधा काडी काढून जमीन द्यावी त्यास कुंधा काढण्याचा असोन तुह्मी बाभळीची झाडें ३० असलेले तोडून देत नाहीं व त्याजवाचून शेत साफ होणें नाहीं. बरेंच शेत झाडांत गुंतलें आहे. जर तुह्मास आपले कुंध्याची जरूर असल्यास सर्व झाडें ही नोटिस पावतांच झाडें तोडून द्यावीं. पांच वर्षे पुरें झाल्यावर कुंधा काढून देणार नाहीं पांच वर्षांत तुह्मी झाडें न तोडून द्याल तर उलटे माझे शेत सदर्हू झाडास गुंतल्यामुळें नुकसान पाच वर्षांचें जें होईल त्याजबद्दल व नोटिस दिल्याबद्दलचा खर्च यासुद्धां तुह्मावर दिवाणींत दावा करण्यांत येईल हें खूप समजावें कळावें तारीख १० फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

(सही) कृष्णाआपा वल्लद गणआपा
रहाणार बेलखेड तालुके
अकोट दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार

रा. ब. कृष्णराव विठ्ठल विंचूरकर सातारचे फ० क्ला० स० जड्ज २१वे तारखेस आपले कामावर रुजू झाले.

मि० श्रीपाद बाबाजी ठाकूर यांस तीन महिन्यांची हक्काची रजा मिळाली.

मि० जे० जी० मूर यांस साताऱ्यास अक० कलेक्टर नेमिलें.

मुंबईस देवीची सांथ पुष्कळ आली आहे.

मुंबईस मिसमेरी कार्पेंटर बाईचे प्रार्थनासमाजांत व्याख्यान झालें.

मुंबईस इंदुप्रकाश आफिसांत काल सकाळीं आठ वाजतां रा. भाऊ अणगरकर यांची कन्या विठाबाई यांचा रा० कृष्णाजी गोविंद पेंडसे याजबरोबर पुनर्विवाह योजला असल्याबद्दल आह्मांस कुंकुमपत्रिका आली आहे. त्याप्रमाणें तो झाला असेल असें समजून आह्मी आनंद मानितों.

सर मिचल वेस्ट्राप मुंबई हायकोर्टाचे चीफ जष्टिस एप्रिल महिन्यांत नोकरीचा राजिनामा देऊन जाणार असें समजतें.

आन० नानाभाई हरीदास मुंबई हायकोर्टांतील जड्ज आन० वेस्ट साहेबाचें बारा महिन्यांचे रजेमध्यें बदली काम पहातील.

मद्रासचे गवरनर १६ वे तारखेस कलकत्याकडे जाणार. ५ दिवस तेथें रहातील.

श्री० मल्हारराव गायकवाड मोहरमाचे ८वे तारखेस मद्रास शहर पहाण्याकरितां बाहेर निघाले होते. बरोबर मि. सिपसन व एक पोलिस आफिसर होते.

मुंबई युनिव्हर्सिटीची चालू सालची एम. ए. ची परीक्षा तारीख १० एप्रिल सोमवारी सुरू होईल.

नगर एथील सिटिस्कूलचे हेड मास्तर मि० केशव विश्वनाथ पटवर्धन यांची नेमणूक तुर्त ठाण्याचे डे० ए० इन्स्पेक्टर यांनीं रजा घेतल्यावरून त्यांचे जागीं झाली व नगरास त्यांचे जागीं धुळे सिटी स्कूलचे हेड मास्तर मि० दातार हे येणार असें ह्मणतात. न्या. सिं.

चमत्कार– दिल्लीच्या मोठ्या मशीदीच्या पायऱ्यांवर एक पांचबारी पिस्तुल भरलेलें सांपडलें. दीपोत्साहाच्या दिवशीं युवराज दीपोत्सव व दारू काम पहावयास गेले नाहींत याचा संबंध पिस्तुल सांपडण्याशी आहे अशी तेथें वदंता आहे. पिस्तुल ज्यानें पाहिलें त्याच्या अंगावर तें अकस्मात उडून तो मरण पावला

ब्रह्मदेशच्या राजाचे वकील थोड्या दिवसांपूर्वी गवरनर जनरलास भेटावयास आले होते तेव्हां त्यांनीं टोपी व बूट काढले नव्हते. भेट घेऊन परत जाते वेळेस गवरनर जनरलांनीं त्यांस सुचविलें कीं तुमच्या दरबारांतील इंग्रजांचा वकील तुमच्या राजास भेटावयास जाईल तेव्हां बूट काढणार नाहीं हें ध्यानांत असूं द्या.

पंढरपुर एथील देवालयांतील पाडापाड करून सुधारणा करण्याची सुरुवात सरकार हुकुमाप्रमाणें बडवे लोकांनीं केली आहे, परंतु याच्या संबंधानें तेथें एक धर्म सभा होऊन होत असलेली सुधारणा न करण्याविषयीं शास्त्राधारानें शास्त्री वगैरे लोक आपल्या सह्यांनिशीं सरकारांत अर्ज पाठविणार आहेत.

रशियाची अगदीं लढाईस तयार अशी फौज आहे तींत २६,२७३ सरदार, ४८,९४२ नान कमिशंड आफिसर आणि ६,९१,३३६ शिपाई आहेत असें समजतें. आतां त्यांनीं वयांत आलेल्या मनुष्यांपैकीं लोकांनीं लष्करी खात्यांत काम करावें असा ठराव केला. त्याप्रमाणें सन १८७४ सालीं त्या देशांत सुमारे सात लक्ष वयांत आले त्यांज पैकीं १,८०,००० गेल्या वर्षी फौजेंत दाखल झाले.

सिंधच्या सरहद्दीवरील लोकांतील भांडणें अधिक पेटूं लागलीं आहेत. खिलातचा कारभार सिंधच्या कमिशनराकडून काढून सरकारानें आपल्याकडे घेतला आहे. तें तेथील खानास लवकरच पदच्युत करून देश आपणाकडे घेईल. खानाविरुद्ध नेहमीं तंटे उपस्थित करणारा नुरुदीन यांस खानाच्या फौजेनें मारिलें. खानाचा वजीर आटा महंमद हा जखमी झाला व त्याचा भाऊ मारला गेला. बलूचिस्थानांत लौकर बंड होईल असें वाटतें.

चीनच्या लढाईची पुनः वदंता– प्रिन्स आफ वेल्स यांच्या बरोबर जाण्याकरितां ह्मणून गेल्या आठवड्यांत येथे कांहीं लढाऊ गलबतें आलीं त्यांस तांबडतोब चीन देशाकडे जाण्याची तयारी करण्याविषयीं हुकूम झाला. मार्गरी साहेबांच्या खुनाविषयीं नीट रीतीनें निकाल होण्याची आशा न दिसल्यामुळें इंग्लंड देशास चीन देशाशीं लढाई करण्याचा प्रसंग येणार अशी वदंता आहे व त्याजमुळें या आरमारास हुकूम झाला असें ह्मणतात. इं. प्र.

मारिशियस नावाचे बेटांत यंदाचे सालीं हवा पाणी फार चांगलें असल्यामुळें उसाचें पीक अति उत्तम आलें आहे व सन १८७६ । ७७ सालीं ह्या पिकाचें जसें उत्पन्न होईल तसें पूर्वी कधींच झालें नव्हतें.

दोन यज्ञ–पुण्यांत सदाशिवपंत कानिटकर वकील यांणीं यज्ञ करण्याचा झपाटा चालविला आहे. गेल्या आठवड्यांत विश्वजित आणि साद्यस्त असे दोन यज्ञ केले. त्याकरितां बाहेरगांवचे ब्राह्मण सुमारें २९ आले होते. त्यांस व येथील वैदिकांस मिळून ९०० रुपये खर्च केला. यज्ञांत ६ पशु पडले. ब्राह्मणभोजनही झालें. त्यापैकीं " साद्यस्त " यज्ञ २४ तासांतच व्हावा असें आहे, त्याप्रमाणें गेल्या शुक्रवारीं केला. त्याबद्दल अवभृत स्नानास बायका, मुलें व पुरुष शेंकडों नदीवर गेले होते असें कळतें.

बडोदें एथील हाय स्कूल बरेंच चाललें आहे. यांत दोन भाग केले आहेत. वरील भागांत चार वर्ग असून त्यांत कालेजची शिकविण्याची रीत ठेविली आहे. मुंबईचे दोन ग्राज्युएट आणविले आहेत व आणखी एक येणार आहे ह्मणून ऐकतों. हाय स्कूलमध्यें दोन्ही भाग मिळून दोनशें अडीचशें मुलें आहेत. पोप साहेब एथील हाय स्कूलचे प्रिन्सिपाल मोठे हुशार व दक्ष आहेत. मुंबईहून आणलेले लोकही मेहेनत घेऊन शिकविणारे आहेत.

मुंबई खात्यावरील विद्याखात्याचे डैरेक्टर यांणीं आज १५ वर्षे शाळापत्रक चालत होतें तें गेल्या जानेवारीपासून बंद केलें.

पुण्यांत आपा बळवंताच्या घराजवळील नाटकगृहाच्या जागेंत टिकिटें देऊन एका हौशानें पोऱ्याचा तमाशा केला. मनुष्यांची गर्दी फार झाली होती. तमासगिराचें उत्पन्न ८५ रुपये झालें असें ऐकतों.

मेहेरबान ब्यारन डी. एच. लापेंट पुण्याचे जडज यांचे जागेवर डब्ल्यू. एच. न्यू हाम एस्कायर यांची नेमणूक झाली आहे. ज्ञा. प्र.

## खरी उपासना.

उपासकाची क्रमाक्रमानें उन्नति होणें हें सद्धर्माचें मुख्य लक्षण. जे विशेष काळजीनें साधन करण्यास प्रवृत्त होतात त्यांची उपासना गंभीर असते व दिवसें दिवस ती अधिक गंभीरभाव धारण करिते. आपण उपासनेस बसतों त्या वेळीं आपल्या सद्भावना समुन्नत होतात; परंतु उपासना आटोपल्यावर जेव्हां आपण नित्य कार्यास लागतों तेव्हां तें कार्य व उपासनाकाळींचा सद्भाव यांस मेळ नसतो. ह्मणजे उपासनाकाळीं जशी आपल्या मनाची निर्मळ स्थिति असते तसें निर्मळ आचरण होत नाहीं. उपासनासमयींचा शांत गंभीरभाव उपासनास्थानींच रहातो, कर्मक्षेत्रीं त्याचा प्रवेश होत नाहीं. आमची उपासना व आमचें जीवन हीं अत्यंत भिन्न होऊन रहातात. उपासना आमच्या जीवनांत स्थिर झाली पाहिजे; तिणें आमचें संपूर्ण जीवन परिव्याप्त करून टाकलें पाहिजे. नाहीं तर ती व्यर्थ व निष्फळ अशी एक मनाची अवस्था मात्र होऊन राहील.

उच्च व गंभीर उपासनेच्या प्रखर तेजानें जीवन उत्तम होणार नाहीं व आत्मोन्नतीस विघ्न करणारे समस्त रिपुगण म्लान व दग्ध होणार नाहींत तर उपासना दग्ध झाली असें समजलें पाहिजे. नित्य उपासनांनीं आमचे जवळ इतका बलसंचय झाला पाहिजे कीं, त्याच्या पुढें रिपुगणाचें बळ अतिअल्प होऊन जाईल. ज्यास उपासनेनें बलसंचय होत नाहीं. व ज्याच्या उपासनेचा भाव उपासनेंतच विलीन होऊन जातो, तो जरी ह्मणाला कीं, माझी उपासना अतिउच्च, मी उपासनासमयीं अतिगंभीर आनंद लाभ पावतों, तरी त्याचें हें ह्मणणें पोकळ समजावें, लोकांस त्याची प्रतीति येत नाहीं; कारण त्याच्या दैनिक चरित्रांत असे दोष बाहेर पडतात कीं त्याच्या या ह्मणण्यावर विश्वास ठेवण्यास संकोच वाटतो व अशी आशंका येते कीं, या प्रकारचें आचरण करणाराकडून अशी उपासना कशी होत असेल ? एक तर तो आमची वंचना करीत आहे किंवा तो आत्मप्रवंचित होत आहे, या दोन गोष्टींतून एक गोष्ट खरी असली पाहिजे.

उपासना जीवनाचे ठायीं परिव्याप्त होण्यास एक अडथळा येतो. ईश्वराची करुणा व मनुष्याचें साधन या दोहोंच्या मध्यें हा अडथळा येऊन उभा रहातो. आम्ही साधनमार्गांत ज्या परिमाणानें पुढें सरकत जातों त्या परिमाणानें ईश्वराची कृपा आमचेकडेस येऊन आह्मास ग्रहण करिते. कधीं कधीं ईश्वराची कृपा न कळत आह्मास उंच सोपानावर घेऊन जाते; आह्माकडून काय अनुष्ठान घडलें हें आह्मास मुळींच समजत नाहीं, परंतु केव्हां केव्हां असें घडतें ह्मणून आह्मास साधनाविषयीं शिथिलत्व धरतां कामा नये न जाणो आह्माकडून जें अनुष्ठेय तें अनुष्ठित न झाल्यामुळें ईश्वराची कृपा येण्याचा मार्ग आह्मी अवरुद्ध करून टाकला असें होईल. गंभीरतर उपासना करूनही आमचें जीवन कां पुढें सरसावत नाहीं? उपासनेचें स्तोत्र सगळा दिवसभर कां वाहत रहात नाहीं? खचित कोठें तरी अडथळा आहे. हा अडथळा कोणता? इंद्रियचांचल्य हा. इंद्रियांचा चंचळपणा खरी उपासना होण्यास अंतराय आणितो. उपासनासमयीं ज्यांच्या मनाची एकाग्रता विषयचांचल्यानें नष्ट होते त्यांस उपासनेनें बलसंचय होण्याचा संभव नाहीं. एकाग्रता साधन करावी ह्मणजे इंद्रियांचें चंचलत्व दूर होईल. उपासनाकाल संपल्यावर अन्यतर समयीं इंद्रियें तुफानी घोड्याप्रमाणें अनावर होऊन सत्कार्यी प्रवृत्त होणार नाहींत, असें न होण्याविषयीं जपून यत्न करावा आणि मग उपासनासमयीं एकाग्रता लाभ होतो कीं नाहीं तो पहावा. एकाग्रता व इंद्रियसंयमन हीं दोन्हीं एकमेकावर अवलंबून आहेत. जे या दोहोंविषयीं शिथिल होतील त्यांच्या जीवनाचा बहुतेक भाग ओसाड रानाप्रमाणें विशोभित होईल, आणि त्यांच्या आचाराची पवित्रतारूप शोभा वर्धन न पावल्यामुळें त्यांचें जीवन कलंकित राहील, मग अर्थात परित्राण होण्यास अंतराय येऊन अनास्था केल्याबद्दल दंड भोगावा लागेल. सु. प्र.

GREAT INDIAN PENINSULA RAILWAY.

ग्रेट इंडियन पेनिनसुला-रेलवे.

NOTICE.

नोटिस.

CONVEYANCE OF GOODS TO AND FROM PORT TRUST SIDINGS BOMBAY.

मुंबईंतील पोर्टट्रस्ट सायडिंगसवर माल नेण्या-आणण्याविषयीं सूचना.

एतद्द्वारें सूचना देण्यांत येते कीं, चालू महिन्याच्या अखेरीनंतर, पिलचर बैरामजी आणि कंपनी याजबरोबर पोर्टट्रस्टीसनीं जो ठराव केला आहे व ज्या ठरावा अन्वयें त्या कंपनीस रेलवेकडून पोर्ट सायडिंगसवर जाणाऱ्या येणाऱ्या मालावर भाडें घेण्याचा हक्क आहे, तो ठराव पुनः सूचना देण्यांत येई तोंपर्यंत येत्या मंगळवारापासून ह्मणजे फेब्रुवारी महिन्याच्या पहिले तारखेपासून तहकूब राहील, रेलवे कंपनीकडून जीं जळाऊ लांकडें पोर्टट्रस्टच्या सायडिंगसवर नेलीं आणलीं जातील त्या लांकडांवर हाजी इब्राहीम हाजी अहमद व हाजी परिमहमद अमीन पोर्टट्रस्टीसच्या अनुमतीनें वेळोवेळीं प्रसिद्ध करितील त्याप्रमाणें रेलवे कंपनीच्या भाड्याखेरीज ज्यास्त भाडें त्या गृहस्थांस द्यावें लागेल.

त्याचप्रमाणें त्याच तारखेपासून पुढें पुनः सूचना देण्यांत येई तोंपर्यंत पोर्टट्रस्टच्या सायडिंगसवर नेण्याआणण्याकरितां रेलवे कंपनीकडेस जो दुसऱ्या सर्व प्रकारचा माल येईल. त्यावर वर लिहिल्या प्रमाणेंच रेलवे कंपनीच्या भाड्याखेरीज धारसी गोकळदास आणि कंपनी यांस पोर्टट्रस्टच्या अनुमतानें वेळोवेळीं जाहीर केल्याप्रमाणें ज्यास्त भाडें भरावें लागेल.

या सायडिंगसवर माल नेण्या आणण्या करितां रेलवे कंपनीनें जे दुसरे ठराव हल्लीं अमलांत आहेत ते दुसरी सूचना देण्यांत येई तोंपर्यंत तसेच राहतील.

हेनरीकांडर.

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० २८ माहे जानेवारी सन १८७६ इसवी.

हे पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकोला, रविवार ता० २० माहे फेब्रुवारी सन १८७६ इ० | अंक ८

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| साल अखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणार लोकांकडून आगाऊ वर्गणी आली ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| बीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## जाहिरात.

GREAT INDIAN PENIN SULA RAILWAY.

### ग्रेट इंडियन पेनिनसुला-रेलवे.

NOTICE.

### नोटिस.

CONVEYANCE OF GOODS TO AND FROM PORT TRUST SIDINGS BOMBAY.

### मुंबईतील पोर्टट्रस्ट सायडिंग्सवर माल नेण्या-आणण्याविषयीं सूचना.

एतद्द्वारें सूचना देण्यांत येते कीं, चालू महिन्याच्या अखेरीनंतर, पिलचर बैरामजी आणि कंपनी याजबरोबर पोर्टट्रस्टीसनीं जो ठराव केला आहे व ज्या ठरावा अन्वयें त्या कंपनीस रेलवेकडून पोर्ट सायडिंगसवर जाणाऱ्या येणाऱ्या मालावर भाडें घेण्याचा हक्क आहे, तो ठराव पुनः सूचना देण्यांत येई तोंपर्यंत येत्या मंगळवारापासून ह्मणजे फेब्रुवारी महिन्याच्या पहिले तारिखेपासून तहकूब राहील, रेलवे कंपनीकडून जीं जळाऊ लाकडें पोर्टट्रस्टच्या सायडिंगसवर नेलीं आणलीं आतील त्या लाकडांवर हाजी इब्राहीम हाजी अहमद व हाजी परिमहमद अमीन पोर्टट्रस्टीसच्या अनुमतीनें वेळोवेळीं प्रसिद्ध करितील त्याप्रमाणें रेलवे कंपनीच्या भाड्याखेरीज ज्यास्त भाडें त्या गृहस्थांस द्यावें लागेल.

त्याचप्रमाणें त्याच तारखेपासून पुढें पुनः सूचना देण्यांत येई तोंपर्यंत पोर्टट्रस्टच्या सायडिंगसवर नेण्याआणण्याकारितां रेलवे कंपनीकडेस जो दुसऱ्या सर्व प्रकारचा माल येईल. त्यावर वर लिहिल्याप्रमाणेंच रेलवे कंपनीच्या भाड्याखेरीज धारसी गोकळदास आणि कंपनी यांस पोर्टट्रस्टच्या अनुमतानें वेळोवेळीं जाहीर केल्याप्रमाणें जास्त भाडें भरावें लागेल.

या सायडिंगसवर माल नेण्या आणण्याकरितां रेलवे कंपनीचे जे दुसरे ठराव हल्लीं अमलांत आहेत ते दुसरी सूचना देण्यांत येई तोंपर्यंत तसेच राहतील-

**हेनरीकांडर.**

जनरल ट्राफिक म्यानेजर

मुंबई ता० २८ माहे जानेवारी सन १८७६ इसवी.

## नोटिस.

अबदुल हुसेन मनवरअली बोहोरा रहाणार अकोट तालुके मजकूर जिल्हा अकोलें यास खालीं सही करणार याजकडून उत्तर देण्यांत येतें कीं मी तुह्मास तारीख १० माहे नोवेंबर सन १८७४ इसवी रोजीं मिठाराम तेली याचें घर दिलें आहे. चव दिवाळीचे ह्मणजे आंतील जागा दिली असोन सार्टीफिकिट मजजवळ नसल्यावरून निंबाचीं दोन झाडें तुह्मास दिलीं गेलीं आहेत. आतां तीं झाडें हरास होऊन तुह्मीच वीसरुपयांस घेतलीं. ( ते दाम मी देण्यास हजर आहो. ) ते रुपये घेऊन पावती द्यावी. वरकड मजकुराशीं संबंध नाहीं.

सदरील घरांतील तेलाचा घाणा तुह्मी हक्क नसतांना विकला तेव्हां मी तुह्मास ह्मटलें कीं, याजवर मजला जप्ती देणें आहे. तेव्हां तुह्मी कांहीं लोकांसमक्ष बोलले कीं, विकला तर गेला परंतु आपण आपसांत मिठाराम तेली यास बोलावून घाण्याची किंमत काय लागेल ती मी तुह्मास देतों असें बोललां सबब मी दरखास्त दिली नाहीं. परंतु ते रुपये मजला आजपावेतों दिले नाहींत सबब ही नोटिस पावल्या दिवसापासून आठ दिवसांचे आंत घाण्याचे रुपये द्यावे नाहीं तर फिर्याद करून रुपये घेतले जातील. कळावें. तारीख १४ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) मोतीराम कुवरसिंग
रहाणार अकोट
दरतुर खुद्द.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

### उमरावती म्युनिसिप्यालिटीच्या पट्टीचा जुलूम.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस

वि. वि. पत्रकर्ते महाराज, इंग्रज सरकारचे अमलांत वऱ्हाडांत जितकें सुख झालें आहे त्याहूनही अधिक आमच्या उमरावती म्युनिसिप्यालिटीचा आह्मावर जुलूम आहे. म्युनिसिप्यालिटीच्या योगानें गांवांत रस्ते चांगले असणें, सफाई असणें व रस्तो रस्तीं दिवे असणें यांच्या नावानें आवळ्या एवढें पूज्य आहे. फक्त कराचा मात्र दिवसानुदिवस ज्यास्त जुलूम होत आहे. दयाळु हिंदुस्थान सरकारच्या ठरावाप्रमाणें या सालीं वऱ्हाडांत सर्व जिल्ह्यांनीं मु. कमिटीची पट्टी फार कमी झाली आहे व तेणेंकरून गरीब लोक त्रासापासून दूर झाले आहेत असें कळतें. आमच्या उमरावतीच्या लोकांचें मात्र नशीब जसेंचें तसेंच काळें राहिलें आहे. उत्पन्नावर दर शेकडा १ रुपया कर बसेल असें एथील लोकांस वाटत होतें, पण तो हिंदुस्थान सरकारचा ठराव कोपऱ्यांत ठेवून एथील म्युनिसिप्यालिटीनें मन मानेल तशा जुलुमानें हल्लीं पट्टीचा ठराव केला आहे. ज्या युरोपियन व्यापाऱ्यांचे कापसाचे मोठमोठे कारखाने चालले आहेत व जे लक्षावधि रुपयांचा कापूस खरेदी करून हजारोंचे हजारों रुपये मिळवितात त्यांच्यावर ३०० रुपये पट्टी व शहरांतील व्यापारी ज्यांचे पराकाष्ठेचें ५००० चे आंत उत्पन्न त्यांना २०० रुपये पट्टी त्याचप्रमाणें तहशिलदार, पोलिस इन्स्पेटर, क्लार्क आफ धि कोर्ट, स्मालकाज कोर्टाचे रजिस्ट्रार, ओव्हरसियर, बी. ए- मास्तर; डे ए इन्स्पेक्टर व आणखी पुष्कळ लोक ज्यांचा १०० पासून २०० रुपये पगार त्यांच्यावर ३पासून६ रुपये पट्टी,व ज्या दुकानदारांची दुकानें चालण्याची पंचाईत त्यांच्यावर, वकील लोकांवर, गरीब बिच्याऱ्या कसबिणी रांडांवर व इतर गरिबावर चाळीस चाळीस वीस वीस रुपये पट्टी तेव्हां आतां जुलुमाचा कळस झाला असें ह्मणण्यास काय हरकत आहे?

सारांश याप्रमाणें आह्मा उमरावतीचे लोकांवर जुलूम आहे. आह्मी व्यापारी लोक पडलो अडाणी व भितेरे तेव्हां हा अन्याय कोणास सांगावा व कोण याची दाद घेईल हें आह्मासबरोबर समजत नाहीं. उमरावतीचा व्यापार बहुतेक सर्व खालीं बसलाच आहे. व या योगानें सर्वस्वी बसेल यांत संशय नाहीं. याप्रमाणें सर्वांना बुडवून म्यु. कमेटी करणार काय तर २०० रुपये पगाराचे सेक्रेटरी ३०।१५।१० रुपये पगाराचे ३ कारकून ७।८ उत्तम पोषाखी जमादार व इतर कांहीं खर्च यांचे संरक्षण करावयाचें. याहून जास्त कांहीं नाहीं.

अस्तु पत्रकर्ते महाराज हा मजकूर आपण सरकारचे कानावर घाला ह्मणजे खचीत आमचीं दुःखें दूर होतील. हा प्रकार दयाळु सरकारास कळल्यावर ठरावाप्रमाणें उत्पन्नावर दर शेकडा एक रुपया कर बसेल ज्यास्त कधींही बसणार नाहीं. हल्लींचे येथील कृपाळु डे. कमिशनर साहेब दवऱ्यावर असल्यामुळें त्याना हा प्रकार अद्याप माहित नाहीं त्याना कळल्यास कांहीं तरी दया करितील अशी आशा आहे. तूर्त पुरे करितो हे विनंती.

एक करानें पीडिलेला व्यापारी.

### विद्या खात्याकडील काटकसर.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. खालील च्यार ओळी कृपा करून प्रसिद्ध कराव्या.

वऱ्हाडांत विद्याखातें थोडे वर्षांमागें जन्म पावलें. परंतु त्याचे जनक मोठे चतुर व उदार दृष्टीचे असल्यामुळें त्यांनीं विपुल खर्च करून अनेक प्रकारच्या पौष्टिक साहित्याची योजना केली. त्यामुळें अल्प काळांतच तें मोठें भव्य व गुणकारी झाले आणि सर्वत्र त्याची वाहवा झाली पण अलीकडे वर्षानुवर्ष काटकसर नावाचा रोग त्यावर झडप घालू पहात आहे त्यामुळें त्याची तनदुरुस्ती कशी काय राहील याची थोडी धास्ती वाटते-

उत्तमलोकवासी डाक्टर सिक्लेर साहेब यांच कारकीर्दींत हलकीही शाळा वीस रुपयां खालीं नव्हती पुढें कांहीं शाळा पंध्राच्या झाल्या व आतां बाराच्याही होण्याचा घाट चालू आहे. आणि पुढें हें मान उतरत उतरत कोठ पर्यंत जाईल याचा नेम करता येत नाहीं. असिस्टंट मास्तरच्या निकृष्ट जागा प्रथम १० रुपयाच्या झाल्या पुढें ८ रुपयांच्या व आतां ६ आणि पांच रुपयांच्या होत आहेत. यवतमाळ जिल्ह्यांत एक असिस्टंट ६ रुपयाचा नेम लाहा गेला ह्मणतात.

मध्यमप्रतीच्या शाळांवर काटकसरची झडप पडण्याचा रंग दिसत आहे. सवाशे रुपयांची शाळा होती ती १०० रुपयांची झाली. दुसरी तशीच होण्याचा निश्चय आहे. तसेंच शंभर, पाऊणशे, पन्नास रुपये पगाराच्या कांहीं कांहीं शाळांचाही छाट जाण्याचे तरंग निघाले आहेत. हायस्कुलाविषयींही काय होते पहावें. मि. म्याकिंटाश साहेब यांची नालायकी ६ महिन्यांच्या मुदतींत स्कूल न सुधारल्यामुळें व म्याट्रिक्युलेशनचे साल मजकुरचें फल त्यांस अनिष्ट असें झाल्यामुळें त्यांस बुका लागून स्वदेशीं जावे लागेल व हायस्कुलावर कमी पगाराचा नेटिव हेडमास्तर नेमतील किंवा एक हायस्कूल अजीबाद बंद करतील कीं काय असा धाक आहे. इन्स्पेक्टरची जागा मागें एक दोन वर्षें न भरून निर्वाह झाला ह्मणून आतांहि कित्येक महिने ती रिकामी ठेविली आहे त्यावरून तिलाही काटकसरबाई गिळून टाकणार कीं काय? कळत नाहीं. व इतका सर्व प्रकारें आंतबट्टा आला आणि नेटिव डायरेक्टर नेमून त्याचा पगारही पंध्राशाचा हजार रुपये केला इत्यादि काटकसरीचे बेत पाहून सर्व लोकांस फार वाईट वाटत आहे.

काहीं काहीं गोष्टींत काटकसर अवश्य आहे पण ती फाजिल झाली ह्मणजे तिचा परिणाम वाईट होतो. तशी विद्याखात्यांत हल्लीं जी काटकसर चालू झाली आहे ती फार कसोशीची आहे ह्मणून काळजी वाटते व इतकी करडी नजर हलके पगाराचे मास्तरांवर नको होती. लोक हल्लीं अगदीं निराधार झाले आहेत व जो तो चाकरी शोधतो यामुळें हल्लींच्या उतरलेल्या स्केलाच्य निमेवरही लोक मिळूं लागतील पण तशानें कामें चांगलीं व गुणावह होणार नाहींत. ह्मणून हल्लींचे नेटिव डायरेक्टर साहेबास माझी अशी प्रार्थना आहे कीं केवळ मुंबई इलाख्यांतल्या मारवाडी दृष्टीनें सरकारचा फायदा करून शेंकडो गरीब लोकांचे तोंडास पानें पुसणें यांत मोठासा पुरुषार्थ आहे असें नाहीं. डाक्टर सिंक्लेर साहेबाच्या उदार दृष्टीनें वाढलेलें हें विद्याखातें केवळ मायपोट समजून शेंकडों कोवळे आलेले व पांच पांच दहा दहा वर्षें या प्रांतीं मोठाले पगार घेऊन राहिलेले लोकांस पगार कमी होण्याची मोठी दहशत उत्पन्न झाली आहे ती डायरेक्टर साहेब दूर करून त्यांस दिलदिलासा देतील व केवळ अयोग्य अशा प्रकारची काटकसर करणार नाहींत तर त्यांचे लोकांवर मोठे उपकार होऊन त्यांची देशांत चिरकाल कीर्ति राहील यांत संशय नाहीं.

कळावें हे विनंती.

एक
हितचिंतक

---

# वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १० शके १७९७.

---

## पोलिस पट्टी.

'एक करानें पीडिलेला व्यापारी' अशा सहीचें पत्र आलेलें पहिले पृष्ठ वर छापलें आहे त्यावरून दिसून येतें कीं उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीचा तेथील लोकांवर फार जुलूम झाला आहे. पण ही गोष्ट खरी किंवा खोटी तें आह्मांस माहित नाहीं. आमचे उमरावतीकर प्रियबंधू तेथील म्यु. त मेंबर आहेत व त्यांच्या पत्रांत तेथें एक रुपया पोलिसपट्टी बसविण्याचा ठराव झालेला लिहिला होता असें आह्मांस स्मरतें. तसेंच ज्या कोणास आपणावर आधिक कर बसला असें वाटेल त्यांनीं एक सबकमिटी नेमिली आहे तिजकडे अर्ज करावे ह्मणजे त्यांचा विच्यार होईल असेंही लिहिलें आहे. तस्मात त्या सब कमिटी पुढें आमच्या आजच्या पत्रांतील गाऱ्हाणेंही आमच्या बंधूनीं ठेवावें अशी आह्मी त्यांस शिफारस करितों.

उमरावतीची म्युनिसिप्यालिटी रांडांपासूनही कर घेते असें सदर्हू पत्रावरून दिसतें तसें असेल तर ती गोष्ट मोठी शरमेची आहे असें आह्मांस वाटतें. अकोल्यास तशा स्त्रियांपासून कर घ्यावा असा विच्यार निघाला होता पण तो सर्वानुमतें रहित झाला. रांडांच्या मेहनतीच्या पैशाबद्दल न्यायाच्या कोर्टांत फिर्याद दखल घेत नाहींत हें उमरावतीच्या म्युनिसिप्यालिटीस ठाऊक असेल.

---

## संवयी.

( मा. अं. पु. चालू )

चवथी संवयी जी तुह्मी संपादणें इष्ट आहे ती वेळवारपणाची होय.

वेळवार होणें प्रत्येक मनुष्यास फार जरूरीचें आहे. वेळवार मनुष्य इतर मनुष्यापेक्षां दुप्पट काम करितो. कित्येक लोक पंचवीस पंचवीस मोठमोठालीं कामें कशीं उरकतात याचें आपणास मोठें नवल वाटतें. पण हा त्यांचा केवळ वेळवारपणा होय. आपण ह्मणतों अंः घटकाभर आज उशिरानें उठलें ह्मणून काय झालें. आजचा दिवस १५ मिनिटें स्नानास अथवा भोजनास उशिर झाला तर झाला. पण हेंच वाईट, व असें होत होत गेलें कीं मग आजचें काम आठ आठ दिवस पडूं लागेल. राज्यकारभाराचीं मोठमोठीं कामें ज्यांकडे असतात त्यांच्या कामांत जर वेळवारपणा नसेल तर त्यांचा हुद्दा त्यांच्यानें आठ दिवससुद्धां निभावणार नाहीं. लार्ड ब्रोहाम ह्मणून इंग्लंडचा एक लार्ड चान्सलर होता. अर्थांत सर्व राज्याचा कारभार मुख्यत्वेंकरून त्याजवर अवलंबून असे. लक्षांत ठेवा, इंग्लंड सारख्या राज्याचा कारभार पण तितका कारभार संभाळून कामन्स सभा व कोर्ट आफ चान्सरी या सभांत अध्यक्षाचें काम करण्यास त्यास वेळ सापडे. प्रतिदिवशीं वकील लोकांकडे काहीं वेळ द्यायला सापडे, व राज्य प्रकरणी चालू विषयावर वर्तमानपत्रांतून टीका लिहिण्यास वेळ सापडे, खेरीज उपयोगी ज्ञानाच्या विषयावर ग्रंथ लिहून त्याचा प्रसार करणाऱ्या दहा मंडळ्या अथवा सभा होत्या त्यांचा तो अध्यक्ष होताच. व त्या सभांस नेहमीं वेळवार जाऊन आपल्या अध्यक्ष स्थानीं सर्वांबरोबर तयार असे. असो याचेंच उदाहरण कशाला पाहिजे, सध्यांचे जे मंत्री व दुसरे मोठमोठाले अधिकारी आहेत त्यांचा हाच क्रम आहे व तो असल्यावांचून त्यांचें चालावयाचें नाहीं. ह्या वेळवारपणाची उणीव जितकी आमच्या देशांत दृष्टोत्पत्तीस येते इतकी इतर देशांची ऐकण्यांतसुद्धां नाहीं. आमच्या लोकांस काहीं थोडा बहुत वेळवारपणा ही आगगाडी शिकवूं लागली आहे, काहीं पोष्टखातें, काहीं न्यायाच्या कचेऱ्या, व काहीं विद्याशाला. तरी जितक्यास तितकें. ही संवयी साधारणतः लोकांमध्यें ह्मणून वाढते काय? विष्णवेनमः भोजनाचे बाबदींतील आमचा वेळवारपणा सर्वविख्यात आहेच. दहा वाजतांचें बोलावणें असलें ह्मणजे बारा वाजल्यावर मग निघण्याचा विचार. याविषयीं अधिक लिहिण्याची जरूरी नाहीं. असो. अमुक वेळेस आज निजून उठायाचें; जेवणाच्या पूर्वीं अमुक उद्योग करायाचें; अमुक वेळेस आज लायब्ररींत अथवा सभेस जायाचें असा मनांत निश्चय झाला ह्मणजे तसें केल्याशिवाय बिलकूल राहूं नये. तसेंच जेव्हां आपणास अशा दोन गोष्टी करायाच्या असतील कीं, त्यांतून एक केलीच पाहिजे व दुसरी करावी असें फक्त आपल्या मनांत आहे. त्या वेळेस जी गोष्ट अवश्यमेव केलीच पाहिजे तो प्रथम करायास लागावें. नाहीं तर जी गोष्ट अवश्यमेव करायास नको आहे ती तुह्मी प्रथम हातीं घ्याल तर तीच करण्यामध्यें गुंतून जाल व अवश्य करणीय गोष्ट राहील. कोणी ह्मणेल यांत काय विशेष सांगितलें; आधीं कोणतें करावें मग कोणतें करावें हें प्रत्येकास समजतेंच आहे. परंतु हा नियम न पाळल्यानें आपलीं अवश्यक कामें किती राहून जातात हें प्रत्येकास त्याच्या त्याच्या अनुभवावरून कळून आलें असेल व येईल. ( पु. चा. )

---

## कलाकौशल्य.

( Communicated. )

गानाब्धेर्वस्तुपरंपारं नेपियायसरस्वती
अतोनिमज्जनभयात्तुर्वींवहतिवक्षसि ?
याकर्षतिनिजयोगादंतर्गत
जीवनानिसरसानां ॥
वाणीसेवगुणवती
घटीवयद्वावधूटीव ॥ २ ॥

हा कौशल्यविषय हातीं धरल्यास आज तारखेस २ महिने झाले कदाचित् वाचकांना कंटाळाहि आला असेल. पण विषय इतका महत्वाचा आहे कीं त्या विषयीं कितीहि लिहिलें तरी संपायाचेंच नाहीं तथापि एकाच विषयाची फार दिवस चर्चा करून काहीं उपयोग नाहीं कारण आह्मास आणखी दुसऱ्या पुष्कळ महत्वाच्या विषयांवर लिहावयाचें आहे, याकरितां होईल तितकें करून आजच्या अंकांत प्रस्तुत विषयाची आह्मी समाप्ति करितों.

मागच्या अंकांत ग्रीक पुराणांतील छापलेली मनोरंजक गोष्ट आमच्या वाचकांच्या ध्यानांत असलच त्या गोष्टीचें तात्पर्य इतकेंच कीं सुस्वर हा फार मोहक असतो. आणि यावरूनच आपणास असा सिद्धांत करितां येईल कीं गाण्यापासून आनंदवृत्ता होण्याला गातां येण्याची अवश्यकता नाहीं. एखादा अतिशय अडाणी कुणबी जरी असला तरी वास्तवीक मधुर स्वरापासून त्याला थोडा बहुत आनंद झाल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं. ज्याप्रमाणें एखादि वस्तु नेत्रांनीं अवलोकिली असतां तिच्यापासून आनंद होतो, त्याप्रमाणें एखाद्या पक्षानें पुरुषानें किंवा स्त्रीनें मधुर स्वर काढिला आणि कानांच्या पडद्यावर जाऊन तो पडला, कीं तो मनुष्याच्या वृत्तीवर थोडा तरी परिणाम केल्याशिवाय रहाणार नाहीं. आतां इतकें खरें कीं ज्यास ती कला अवगत आहे त्याला काहीं विशेष मौज वाटेल, पण ती गोष्ट अलाहिदा. एखाद्या तत्ववेत्त्यानें चंद्राकडे पाहिलें असतां नयनाला आनंदोत्पादक जे त्याचे किरण त्यापासून त्याला एक प्रकारचा आनंद होईल, आणि या खेरीज सूर्यापासून त्याला प्रकाश मिळतो; त्यावर पर्वत आहेत, स्वतःचें काहीं एक तेज त्याला नाहीं, तो पृथ्वीपेक्षां लहान आहे, अशा प्रकारच्या अनंत गोष्टी तत्ववेत्त्याच्या अंतःकरणांत येऊन कधीं कधीं बाह्य आनंदापेक्षांही त्यास दुसरें एखादें ज्ञानापासून होणारें सुख होत असेल तथापि या बाह्य आनंदाचे राजापासून रंकापर्यंत सर्व वाटेकरी आहेत. गायनाप्रमाणेंच वाद्याची गोष्ट आहे. ज्या देशांत गायनाची अभिवृद्धि झाली आहे त्या देशांत वाद्याचीही झालीच असली पाहिजे कारण या २ कलांची अवर्णनीय एकत्र संगती आहे एकीच्या सहाय्याशिवाय दुसरीस गौरव कधींही यावयाचें नाहीं. जेथें या दोहोंचा मिलाफ तेथें काय चमत्कार घडतात हें सांगणें कठीण आहे. यांच्या पायीं मनुष्य भूक तहान विसरेल, अंगीं अनेक व्याधांची पीडा असली, किंवा संसार संबंधी अनेक काळजींनीं त्याचें मन खिन्न झालें असलें तरी गानाब्धिमध्यें निमग्न झालेल्या मनुष्यास घटकाभर त्या सर्वांचें विस्मरण होईल यांत संदेह नाहीं. या वाद्यांच्या सुस्वरांचें आणि गायनाच्या संगतवार जुळलेल्या मुखोच्चारित ध्वनीचें हरिणांना फार वेड आहे असें ह्मणतात, या गोष्टीचा पडताळा आह्मी घेऊन पाहिला नाहीं तथापि आह्मी आपल्या अनुभवावरून सांगतों कीं नागासारखे, सर्पासारखे दुष्ट विषारी प्राणी सतार, सारंगी आदिकरून मधुर वाद्यांचा ध्वनि ऐकून मोहित होतात. आणि आनंदांत निमग्न होऊन फणी वर करून डोलतांनाहीं आह्मी कित्येक वेळा पाहिलें आहे.

आमच्या मतें इतर कलांप्रमाणें याही कलांचा ऱ्हास होत चालला आहे. आणि या सर्वांचे कारण फक्त एक राजाश्रय नाहीं. आमच्या हिंदु लोकांत गाणें कमी असें ह्मणण्यास काहीं हरकत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील काहीं लोकास या कलेचा नाद आहे, पण तेवढ्यावरून देशांत ती कला भरभराटींत आहे, असें आह्मास बिलकूल ह्मणतां येत नाहीं. जी काहीं थोडी बहुत गायनकला आहे. ती यवनांच्या स्वाधीन आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आपल्या देशांतील मांडलिक राजांच्या संस्थानांत, शिंदे होळकरासारख्या बड्यांच्या पदरीं कित्येक गाणाऱ्या यवनी स्त्रिया आहेत. व त्यांना आमचे हिंदू लोक कळवांताण किंवा नायकिणी अशी संज्ञा देतात. इतकें खरें आहे कीं, स्त्रियांच्या स्वरांत स्वभावतः मार्दव फार आहे तेव्हां त्याना ही कला चांगली साधते. आणि या कलेची प्रवीणता पुरुषास प्राप्त करून घेतां येणार नाहीं. कोणत्याही देशाचे स्थितीचा विचार केला तरी असें ध्यानांत येईल कीं, गाण्याच्या कामांत श्रेष्ठता स्त्रियांची. स्वरमाधुर्य ही त्यांना ईश्वरी देणगी आहे, तेव्हां अर्थांतच त्यांचा पगडा अधिक.

आमच्या देशांतील गाण्याच्या अनास्थे सारखी अनास्था कोठेंच नसेल. सुधारणा ह्मणून ती कशी करावी हें लोकांना बहु

शा ठाऊक नाहीं. आतां या लेखामुळें कित्येकांस राग येईल, त्यास उपाय नाहीं; गायन एक शास्त्र आहे, त्यावर अनेक ग्रंथ आहेत, त्याचा अभ्यास सुलभ रीतीनें होण्याजोगीं साधनें आहेत, असें पुष्कळांस बिलकुल ठाऊक नाहीं. कांहींची गोष्ट राहूं द्या, पण सध्याचे देशांतील गवयी ह्मणाल तर मौला बक्षा सारखे काय पांच च्यार असतील ते खेरीज करून बाकी तमाशेवाले नाचे पोरे, नाटकी मंडळी, कित्येक टाकभाडो हरिदास, लावण्या ह्मणणारे शाहिर व इतर फक्कड लोक हे पुरुषांतील गायक आहेत. आमच्या हिंदु स्त्रियांत तर गायनाच्या नांवानें पूज्य ह्मटल्यास थोडेच अतिशयोक्ति होईल. "क्वचित् काणा भवेत् साधु, क्वचित् गानी पतिव्रता" असा ज्या लोकांच्या मनाचा कल त्या लोकांमध्यें गानप्रवीण स्त्रिया थोड्याच निपजतील देवादिकांचीं गाणीं, धावे, काहण्या आणि फारच झालें तर कांहीं पदें ही काय ती हिंदु स्त्रियांची गायन पुंजी यांच्या पलीकडे त्यांस सर्व अंधार. नृत्याच्या संबंधानें तर आह्मीं बरेंचमागें आहों. कळवांतिणीचा थोडा बहुत नाच खेरीजकरून नाटकांत, तमाशांत किंवा इतर ठिकाणीं जो कारवा नाच करितात, तो किंवा रासक्रीडेचा खेळ या शिवाय दुसऱ्या कोणत्याही तऱ्हेचें नृत्य आह्मांमध्यें आहे असें कोणासही वाटल्यास कांहीं एक आधार नाहीं. नाटकांतील सरस्वतीच्या किंवा गलेलठ्ठ राक्षसांच्या ओबड धोबड उड्यास नृत्य हें नांव देण्यास आमचें मन घेत नाहीं. या संबंधानें युरोपियन खाचित स्तुत्य आहेत. आमच्या वाचकांपैकीं ज्या कोणी युरोपियन लोकांचा बाल ( नाच ) पाहिला असेल त्यांत त्यांची पूर्ण खात्री झाली असेल. मडमा दिसण्यांत इतक्या मद आणि नाटयतर दिसतात खऱ्या, परंतु नाचामध्यें त्यांची चलाखी आणि अंगलवणें पाहून, व नाचतां नाचतां तोंडांनीं गाऊन बिनचूक न गडबडतां धिमेपणानें चाललेला त्यांचा खेळ पाहून आनंद व आश्चर्य वाटल्यावांचून राहत नाहीं. आमच्या स्त्रियांचा नाच ह्मटला ह्मणजे फुगड्या किंवा महालक्ष्मीच्यादिवशीं घागरी फुंकणें याशिवाय दुसरें कांहीं नाहीं अशा नाचास नृत्य ह्मणतां येईल काय? अस्तु विषय तर उत्तम आहे परंतु सध्या स्थलसंकोचामुळें आह्मांस अधिक लिहितां येत नाहीं ह्मणून पुढें एकादे वेळां "या ऱ्हास पावणाऱ्या हिंदुकलांचे पुनरुज्जीवन करण्यास काय उपाय करावे" या विषयावर लिहिण्याचें वचन देऊन हा विषय आज समाप्त करतों.

## वऱ्हाड.

आह्मांस लिहिण्यास संतोष वाटतो कीं उत्तम लोकवासी डा. सिंक्लर साहेब यांचे मुलांस कांहीं मदत व्हावी याकरितां मुंबईस खटपट चालली आहे तीविषयां पुढील अंकांत आह्मी अधिक लिहूं.

---

खामगावचे नायब तहशिलदार रा. गणेश गोपाळ याविषयीं असें ऐकण्यांत आलें कीं त्यांस हिशेबी कामाचें चांगलेंसें ज्ञान नाहीं सबब त्यांस मागें आणण्याचा विच्यार आहे.

---

बुलढाणें. येथें १९ वे तारखेस अबकारीचे हरास झाले. त्याच्या रकमा येणेंप्रमाणें—

| | रुपये. |
|---|---|
| कलाली ................ | ९९४६९ |
| अफूगांजा ................ | २००२९ |
| शिंदी ................ | २००९ |

ही रकम गुदस्त सालापेक्षां सुमार २२००० रुपयांनीं अधिक झाली. यावरून दिवसानुदिवस हरासाचें मान वाढत चाललें आहे असें दिसतें.

या वर्षीं एथें विषयुक्त पदार्थांचें हरास झाले नाहीं त्याविषयीं शोध करितां असें समजलें कीं, तें हरास करण्याविषयीं सरकारचा ठराव नाहीं ह्मणून डिपुटी कमिशनर मे० हडल्स्टन साहेब यांणीं कमिशनर साहेबांकडून अधिक खुलासा आणवून मुद्दाम विषयुक्त पदार्थांचें हरास केले नाहीं. असें जर असेल तर दुसऱ्या जिल्ह्यांतूनही या जिनसांच्या हरासाविषयीं बंदी कां होऊं नये?

मेहकर व चिखली या दोन्ही तालुक्यांचीं दिवाणी कामें रा. रा. श्रीकृष्ण नरहर एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांजकडे चालतात व मुलकी कामही त्यांकडे आहे ह्मणून ते बाहेर फिरावयास गेले आहेत व बहुतेक वकीलही त्यांच्याच स्वारींत आहेत.

रा. रा. नारायण बल्लाळ जोशी इंजिनियर कालेजांतील डिग्री मिळविलेले तरुण व हुशार गृहस्थ इकडे लोकलफंड इंजिनियर आहेत व ते आपल्या कामांत चांगले वाकबगार असून मोठे मेहनती व स्वभावानें फार नामी आहेत. यांचा मुक्काम हल्लीं मलकापुरास आहे तेथें एक धर्मशाळा व तालुक्यांत कांहीं विद्याशाळा बांधण्याचीं कामें चालू आहेत. त्याकरितां ते त्या तालुक्यांत आणखी कांहीं दिवस रहातील.

एथील डिपुटी इन्स्पेक्टर रा. रा. वामन गणेश परांजपे यांचे येथें १४ वे तारखेस मुलाची मुंज झाली तीकरितां अकोल्याहून व इतर गावांहून पुष्कळ मंडळी रजा घेऊन आली होती. २।३ दिवस समारंभ चांगला झाला.

एथें एक व मलकापुरास एक अशीं २ पुणेंकर हिंदु नाटकें आलीं आहेत व त्यांचे खेळ चालू आहेत.

एथील हवा फार चांगली आहे. पण त्याच मानानें पाण्याचें दुर्भिक्ष्य अधिक आहे आमचे दयाळु डिपुटी कमिशनर गांव व पेंठ यांचे दरम्यान किंवा अजूबाजूस एक मोठी बारव बांधण्याविषयीं सरकारांतून मांगशन आणवून तेवढें लोकसोईचें काम करून ठेवितील तर त्यांची एथें अक्षय कीर्ति राहील आतां उन्हाळा अधिक होईल तसतसा लोकांत पाण्याचा ताप अधिक होईल. थोर लोकांचे घरीं पाण्याकरितां गाडी बैल व एक मनुष्य याचें अक्षय मांगशन असतें पण असे थोर लोक फार थोडे असल्यामुळें गावांतील बहुत लोकांस फार लांबचे पाणी स्वतां व घरच्या मनुष्यांकडून आणवावें लागतें. व हें हमेशा दुःख आहेच सबब या गोष्टीचा कमिशनर साहेब व रेसिडेंट साहेबही दयाळूपणानें विच्यार करून पाण्याचें कामीं कांहीं हजार रुपये खर्च करून लोकांचे ताप दूर करतील तर फार चांगलें होईल.

---

वाशिम हा भाग आजपर्यंत स्वतंत्र जिल्हा केला नव्हता. व तेथील मुख्याधिकाऱ्यास 'असिस्टंट कमिशनर इनचार्ज वाशिम' असें ह्मणत होते. व अलीकडे पुष्कळ दिवस तो स्वतंत्र जिल्हा करावा असा विच्यार चालला होता. तो हिंदुस्थान सरकारास मान्य होऊन त्यांनीं वाशिम जिल्हा स्वतंत्र केल्याचा जाहिरनामा गेले आठवड्याचे सरकारी ग्याझेटांत छापून प्रसिद्ध केला आहे. आतां तेथील असि० कमिशनरास डिपुटी कमिशनर ह्मणत जातील.

व्यवहारांत व घडामोडींत पुष्कळ वर्षें वाशिम हा स्वतंत्र जिल्हा समजत होते. फक्त हुद्यांत व त्यासंबंधानें पगारांत कमताई होती ती यायोगें पूर्ण झाली. व असिस्टंट कमिशनर यांस बढतीसाठीं एक अधिक जागा झाली. हा जिल्हा केल्याच्या संबधानें नवीन नेमणुका झाल्या त्या अशा—

क्या० के जे एल मेकंजी असिस्टंट कमिशनर व आफिसियेटिंग डिपुटी कमिशनर होते ते कायमचे थर्ड क्लास डिपुटी कमिशनर झाले. क्या० सी टी ओ मेन सेकंड क्लास असिस्टंट कमिशनर होते ते फर्स्ट क्लास असिस्टंट क. झाले. क्या० एफ डब्ल्यु ग्रांट थर्ड क्लास असि. क. व आफिशियेटिंग सेकंड क्लास हे सेकंड क्लास असिस्टं कमिशनर झाले. व मि० ए जे डनलप थर्ड क्लास आफिशियेटिंग असि० होते ते कायम झाले.

---

खालीं लिहिलेल्या वऱ्हाडांतील अधिकाऱ्यांनां त्या त्या ठिकाणीं कायम केलें असें ९ वे तारखेच्या रे० आ०त लिहिलें आहे.

मि० ए. इलियट असिस्टंट कमिशनर यांस यवतमाळ जिल्ह्यांत ठेविलें.

मि० आत्माराम भिकाजी एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर तूर्त कारंजास आहेत. त्यांची उमरावती जिल्ह्यांत कायमची नेमणूक केली.

मि० सयद अबदुल हक्क एक्स्ट्रा असिस्टंट कमिशनर यांस उमरावती जिल्ह्यांतून काढून अकोला जिल्ह्यांत नेमिलें.

---

मेळघाटांतील गवळी लोक रानांतून आपलीं गुरें चारीत असतांना मोठ मोठाले बांबु काढून नेतात व दुसरेही कित्येक चांगले प्रकारचे वृक्ष तोडितात तेणेंकरून फारेस्ट खात्याचें नुकसान होतें व अशी अप्रतिबंध वहिवाट चालू ठेविणें बरोबर नाहीं असें रेसिडेंट साहेबांचे लक्ष्यांत आल्यावरून त्यांनीं ठराव केला आहे कीं यापुढें अशीं झाडें तोडणें गुन्हा समजून तो करणारास वारंटा वाचून धरलें जाईल.

---

विद्याखात्यांतील काटकसरीच्या संबंधानें आज एक पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यांतील गोष्टी आह्मांस संमत नाहींत. आह्मांस वाटतें कीं रा. सा. नारायण भाई डायरेक्टर हे अपमुकत्यारीनें या काटकसरी करीत नसावेत सबब त्यांस दिलेला दोषही बरोबर नसावा. नवीन डायरेक्टर अयोग्य रीतीनें कोणास कमी पगारावर नेमित नाहींत. एखादि शाळा कमी दरजाची करावी असें त्यांस दिसून आलें असतां तेथील मास्तराची दुसरे ठिकाणीं नेमणूक झाल्यावर त्याची जागा भरतांना ती कमी पगाराची करितात. तसेंच अगदीं हलक्या पगारावर जे मास्तर व असिस्टंट मास्तर नेमितात ते लोक इकडचेच असून त्यांचा विद्याभ्यासही इकडील ट्रेनिंग कालजांत झालेला असतो ह्मणून बाहेरचे मास्तर येत होते तेव्हां त्यांस अधिक मोल लागत होतें, आणि आतां ते एथेंच तयार होतात तेव्हां त्यांचा दर उतरत चालला आहे तो सहाजिकच होय. आणि ही वहिवाट मि० क्यांडी साहेब व मि० इलियट साहेब यांच्या वेळेपासूनच चालू आहे. सबब नारायण भाईस त्याबद्दल दोष देणें उक्त नाहीं.

## वर्तमानसार

मद्रास इलाख्यांतील विशाखा पट्टण जिल्ह्यांतील बाभळी गावची जमीदारिण श्री लक्ष्मी चिलय्या इला सरकारानें राणी असा किताब दिला.

जाहिलम नदीचा पूल वाहून गेला. आतां बोटीमधून उतारकरू जातात येतात.

ड्यूक आफ एडिंबरो यांची पत्नी डचेस आफ एडिंबरो या तूर्त लंडनांत राहून मग रशियास माहेरी जाणार आहेत असें समजतें.

नवीन वैसराय— लार्ड लिटन हे पुढच्या महिन्याच्या पहिल्या तारखेस विलायतेहून इकडे येण्याकरितां निघणार असें लं. च्या तारेवरून कळतें.

रा. ब. कृष्णाजी लक्ष्मण नूलकर कच्छचे माजी दिवाण यांस कच्छ सरकाराकडून दरमहा चारशें रु० पेन्शन मिळालें असें समजतें.

कामधंदा करणारे व कारखानदार यांस सूचना— आलीकडे अमेरिकन व इंग्लिश मजूरदार वगैरे कामगारांच्या सामर्थ्याविषयीं व स्थितीविषयीं शोध झाला त्याजवरून अमेरिकन कारागिरांची अधिक योग्यता आहे असें समजलें. इंग्रज लोक दहा तासांत जें काम करतात तें अमेरिकन नऊ तासांत करतात. कारखान्यांतील वगैरे मोठ्या श्रमांच्या कामांत एका आठवड्यांत एक हजार इंग्रज लोक जितकें काम करतात तितकें काम त्या वेळेंत नऊशें अमेरिकन लोक करतात अमेरिकनच्या वर्चस्वाचीं दोन कारणें दिली आहेत. एक; कामधंदे करणारे शिक्षणाच्या योगानें अधिक शिकलेले व हुशार असतात व दुसरें, त्यांजमध्यें मद्यपानाचा प्रकार इंग्रज लोकापेक्षा फार कमी आहे. हे प्रकार मनांत आणून आमच्या कारखानदारानीं आपल्या कारखान्यांत चांगल्या शिकलेल्या व अंमल न करणाऱ्या लोकांचा विशेष समावेश करण्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

डयूक आफ एडिंबरो यांनीं सुलतान या जहाजाच्या अधिकाऱ्याचें काम पतकरलें असें समजतें.

पीनांग येथून ता० १८ जानेवारी रोजीं सरकारी तार आली तिजवरून असें कळतें कीं, पेरक येथील सुलतान इस्माएल व बर्चसाहेब यांचा खून करणारे लोक यांस धरून देण्याबद्दल बक्षिसांचा जाहीरनामा गवर्नर साहेबांनीं लाविल्यावरून सुलतान इस्माएल व त्यांची मंडळी अमुक ठिकाणीं आहे अशी बातमी कोणी येऊन कळविली. त्याजवरून मि. हेविक हे पोलिसचे निवडक लोक घेऊन त्यांस धरण्याकरितां ह्मणून गेले; परंतु मंडळी सांपडली नाहीं. तथापि बर्च साहेबांचा वास्तवीक खून करणारा पांडा इंदत यांस ठार मारलें व १७ हत्ती धरून आणिले. इं.प्र.

प्रिन्स हे मद्रास इलाख्यांत होते त्या वेळेस ग्याझेट छापखान्यांतील एका टाइप जुळणारानें संधी पाहून डयूक आफ सदरलंड यांची गाठ घेतली व मोठ्या नम्रतेनें सांगितलें कीं माझा बाप गरीब असून आपल्या कुटुंबाजवळ चाकरी आहे. व मलाही छापखान्यांत टाइप जुळण्याची चाकरी आहे. परंतु पगार थोडा असल्यामुळें मी फार दुःखांत आहे. त्यावरून डयूक यांस दया येऊन त्यांनीं त्यास विचारलें कीं पुढें काय करावें. तेव्हां तो मनुष्य ह्मणाला कीं मला डेप्युटी. सुपरिंटेंडेंटची अथवा ओव्हरसिअरची छापखान्यांत जागा द्यावी, व पगारही मोठा असावा. तेव्हां डयूक यांनीं छापखान्याच्या सुपरिंटेंडेंटाजवळ चवकशी केली परंतु तशा प्रकारची जागा तेथें मुळींच नसल्यामुळें त्या टाइप जुळणाऱ्याकरतां सामानाची देखरेख करणारा अशी एक नवीन जागा करून ७० रुपये पगार केला व तो १०० रुपये पर्यंत वाढेल. अशा रीतीचा बंदोबस्त सरकाराकडून करविला. व सरकारानेंही ती गोष्ट मंजूर केली! राजा बोले दळ हाले!

दिल्ली येथें जी लटकी लढाई प्रिन्स यांच्या वेळेस झाली तेव्हां ६०९ आफीसर्स, २३,६४० सैन्य, २७,२७८ इतर लोक जमले होते व सरकारि आणि खासगी मिळून ११,४९२ घोडीं २१९ हत्ती ९,८०३ उंट, व २,९८९ बैल मिळून २०,०९९ जनावरें आलीं होतीं.

फ्रान्स देशांत कोळशांच्या खाणीस आग लागून १७० मनुष्यें मरण पावलीं.

हिंदुस्थान सरकारानीं वर्षास अडीच लाख रुपये घेण्याचें कबूल करून ब्रह्मदेशाची कांहीं हद्द वाढविण्याचें ठरविलें आहे.

बंगाल्यांतील एका नेटिव कोष्ट्यानें कपडे शिवण्याचा नवीन माग शोधून काढला आहे. व तो त्या मागानें अंगरखे, बिजारी वगैरे पाहिजे ते कपडे शिवतो. प्रथम तो कपडे बेतून कापून मग मागांत घालतो. कळ दाबल्यावर ते शिवून तयार होतात. शिवण इतकी बारीक व सफाईदार असते कीं ती दुरून मुळींच दिसत नाहीं. कपडे शिवण्याच्या यंत्रापेक्षां या मागानें काम लवकर होऊन सफाईदारही होतें.

अ. द.

कानडा जिल्ह्यांतील एका खेड्यांत रहाणारे लोकांपैकीं १२ असामींनीं जिवंत मूल पुरलें असा त्यांजवर आरोप आल्यावरून त्यांची कारवारचे सेशन जज्जापुढें चौकशी झाली. चौकशीचे वेळीं २ कैदी खेरीजकरून बाकीचे सर्व कैदी अपराध केल्याबद्दल कबूल झाले त्यावरून सेशन जज्जानें त्यां पैकीं एकास सात वर्षेपर्यंत सक्त मजुरीची कैद, ५००० रुपये दंड व दंड न दिल्यास आणखी एक वर्ष पर्यंत कैद व बाकी ११ असामींस चार चार वर्षें सक्तमजुरीची कैद याप्रमाणें शिक्षा दिल्या. कैदींनीं येथील हायकोर्टास अपील केलें त्यांत हायकोर्टानें नाकबूल असलेले दोन्ही कैदीस दिलेली शिक्षा रद्द करून सोडून दिलें व बाकीचे १० असामींस चार चार वर्षांची शिक्षा दिली होती ती दोन दोन वर्षांची केली.

नूरदीन मेंगल याचा भाऊ इभ्राईमखान यानें अजमासें १८००० लोक जमविले असून तो मीर येथें खिलातचे खानावर हल्ला करणार आहे.

सातारा— पुष्कळ दिवसांपासून श्री० आबासाहेब महाराज यांस दुसरीकडे रहाण्यास त्यांचे सोईप्रमाणें जागा तयार करून वगैरे देऊन पूर्वीच्या महाराज यांच्या जुन्या नव्या वाड्यासुद्धां दुसऱ्याही कित्येक पूर्वीं जहालेल्या यादीप्रमाणें इमले सरकार आपले कबजांत घेणार असें जें ऐकत होतों त्याप्रमाणें करावयाचें असें नेक नामदार गवरनर साहेब यांचे बोलण्यांत येऊन श्रीमंत आबासाहेब महाराज यांस अदालतीचा वाडा व रंगमहाल सोईकर देण्याबद्दल नामदार साहेबांनीं समक्ष सुचविलें असें एथील लोकांचे ऐकण्यांत आलें त्यावरून बहुतेक लोकांस फार दुःख होत आहे.

ने. ओ.

---

## वैरण नीट ठेवण्याची युक्ति.

साधारणतः सर्व प्रकारची वैरण आमच्या देशांत पुष्कळ होते. चारा, बाजरी अथवा गव्हांचें भूस व कडबा इत्यादि प्रकारची वैरण होते. दिपवाळीचे शुमारास पुष्कळ शेतकरी अथवा दुसरे लोक डोंगरांतील अथवा पडित शेतांतील गवत कापून गंज्या लावून ठेवितात त्यामुळें उन्हाळ्याचे अखेरीस व पावसाळ्याचे आरंभीं त्यांस वैरणीची फारशी तूट येत नाहीं. भूस कणग्यांत अथवा घरांत सांठवून ठेवण्याची चाल असल्या कारणानें तें चांगलें रहातें. कित्येक लोक भुसाप्रमाणेंच गवत कापल्यावर तें घरांत सांठवून ठेवतात व तसें केल्यानें उन्हांत गंजी लावून ठेवल्यापेक्षां तें चांगलें रहातें. कारण गवत हें साधारणतः नाजुक असल्या कारणानें उन्हांत ठेवलें असतां चैत्र वैशाखांतील उन्हाच्या कडाक्यानें त्याचे आंगची आर्द्रता कपून जाऊन तें निकस होतें. छायेंत अथवा घरांत सांठवून ठेवल्यास तें वायुच्या योगानें वाळतें खरें परंतु त्याचे आंगचा रस त्याचेच अंगीं मुरतो. आमच्या इकडील लोक इतरप्रकारच्या वैरणीप्रमाणें कडब्याची अगदींच काळजी घेत नाहींत. ज्वारीची कणसें काढून घेतल्यानंतर कडब्याची गंजी उन्हांत लावून ठेवतात त्यामुळें कडब्याचें आंगची आर्द्रता व गोडी सर्व नाहींशी होऊन तो लांकडाप्रमाणें होतो. अगदीं सुकून गेल्यामुळें निकस झालेला कडबा गुरें बहुधा खात नाहींत, फक्त त्याची पालवी मात्र खातात. कडब्याच्या आंगीं खारटपणा असल्यास जनावरें खातात असा अनुभव आहे व त्याकरितां आमच्या इकडील कित्येक लोक त्यावर गोमूत्र वगैरे क्षार टाकतात. युरोपखंडांतील काहीं देशांत कडबा ठेयण्याची एक फार चांगली रीत आहे ती आह्मीं खालीं देतों. ज्या लोकांस वैरण सांठवून ठेवण्याचें सामर्थ्य नसतें त्यांनीं व्यर्थ जाणाऱ्या कडब्याची पुढें लिहिल्याप्रमाणें काळजी घेतली असता त्यांस अखेरीच्या दिवसांत अडचण पडणार नाहीं. इंडियन अग्रिकलचरिस्ट पत्रांत याविषयीं लेख आहे तो असा:—

युरोपांतील कांहीं शेतकरी लोक सुमोर सत्तर फूट लांब, सहा फूट खोल व सहा फूट रुंदीचे खाडे करून त्याच्या बाजू बांधतात. तद्देशी ज्वारी अथवा मकेचीं कणसें तोडल्यानंतर लागलीच कडबा कापून त्याचे लहान लहान तुकडे करतात व त्यांस एक दोनदां ऊन देऊन ते तुकडे खाड्यांत रचतात व रचतेवेळीं कडब्याचा सहा इंचांचा थर झाला ह्मणजे वर मीठ पसरतात व पुनः त्यावर कडबा रचतात. याप्रमाणें वर सांगितलेल्या लांबी रुंदीच्या प्रत्येक खाड्यांत जितका कडबा राहील तितक्यास सुमोर पक्के ३० शेर मीठ लागतें. कडबा रचणें झाल्यावर वर माती घालून खाड्याचें तोंड दाबून टाकतात याप्रमाणें कडबा ठेविला असतां वर्ष २ वर्षें रहातो. शिवाय उन्हांत ठेवल्यापासून त्याच्या आंगची गोडी व रस मुळींच नाहींसा होतो तसें न होतां कडबा दमदार राहून मिठाचे योगानें त्याचे आंगीं गोडी येते व कडबा सुकून जात नाहीं. याप्रकारचा ठेवलेला कडबा दर २४ गुरांस सुमोरे ४५० शेर प्रत्यहीं बस होतो असा अनुभव आहे. आमच्या इकडील कडब्याची एक मोठी पेंडी १० शेर वजनाची धरल्यास सुमोर ४५ पेंड्या ४५० शेर भरतील ४५ स पेंड्यांत २४ गुरांचा निर्वाह ह्मणजे एका गुरांस सुमोरे २ पेंड्या लागतात व एवढ्यांत त्यांचें भरदम पोट भरतें असें सदर्हू पत्रांत लिहिलें आहे. आमच्या इकडील लोक या रीतीप्रमाणें कडबा ठेवूं लागल्यास त्यांचा कडबा हल्लींप्रमाणें निरर्थक न जातां त्यापासून पुष्कळ उपयोग होईल व उन्हाळ्यांत कित्येकांस कर्ज काढून गवत विकत घ्यावें लागतें तें घ्यावें लागणार नाहीं.

---

## उपासना व साधुजीवन.

ज्या उपासकाच्या उपासनेंत प्रेम व भक्ति व उत्साह हीं असतात त्याचें जीवन जर भक्तीच्या उंच शिडीवर दिवसेंदिवस अधिकाधिक चढत जाणार नाहीं आणि संसारबंधनापासून मुक्त होऊन सदाकाल साधुत्वांत राहणार नाहीं, तर मग ईश्वराचें शास्त्र मिथ्या ठरलें असें होईल. ज्या ठिकाणीं या प्रकारची विपरीत अवस्था आढळेल त्या ठिकाणीं खरोखर उपासना होत नाहीं आणि जर होत असली तर जिची उपासना होते ती जागृत देवता नाहीं असें खास समजलें पाहिजे. उपयुक्त कारणाचा योगायोग झाला तर कार्याची उत्पत्ति होईलच होईल. कारण झालें आणि कार्य नाहीं असें कधीं होणार नाहीं. उपासना संबधानेंही हाच नियम लागू पडतो.

जे केवळ उपासना करूं इच्छितात आणि उन्नतीची कांहीं आशा व भरंवसा बाळगित नाहींत, त्यांत याविषयीं कांहीं विचार करण्याची आवश्यकता नाहीं. परंतु जे उपासना, साधन व भजन हे उन्नतीचे उपाय आहेत असें ह्मणून विश्वास धरतात त्यांस याविषयीं निश्चित राहणें अगदी उचित नाहीं. यथार्थ ईश्वराची यथार्थ उपासना विधिपूर्वक होत आहे कीं नाहीं हें त्यांहीं लौकर तपासून पाहिलें पाहिजे. नाहीं तर उन्नतीचा मार्ग स्वीकारून उदासीन भावानें साधन केलें ह्मणजे लोकांस महाकपटाचें उदाहरण दाखविलें असें होईल इतकेंच नाहीं, तर साधकास निष्फळ यत्न पाहून अनेक लोक अविश्वासी होतील. सद्धर्म उन्नतिशील व मुक्तिप्रद आहे याचें प्रत्यक्ष प्रमाण साधकाच्या जीवनांत दिसून येणें आवश्यक आहे. समान भावानें दिवस जाऊं लागले तर प्रार्थना ही आत्मप्रतरणा होय असें मनास वाटून शेवटीं पुष्कळ लोक तिचा त्याग करितात. धर्माचें जीवन मंगल, तें प्राप्त झालें नाहीं, तर मतामताच्या विवादांतच आयुष्य निघून जाईल. जीवन जर भक्ति. प्रेम व उत्साह इहींकरून दिवसेंदिवस पुष्ट झालें नाहीं तर धर्मज्ञान व धर्मसाधन यांचा उपयोग काय? अतएव साधुभाव प्राप्त होण्यास जें कांहीं करणें आवश्य आहे तें विलंब न लावितां केलें पाहिजे. उपासना, नियमपालन व ज्ञानशिक्षा हीं जर न होतील, तर लौकरच धर्मसाधनाची गणना संसाराच्या निकृष्ट क्रियांमध्यें होईल हें सांगावयास नको. शेंकडो लोक धर्मसाधन करितात परंतु त्यांचे जीवन दिवसेंदिवस पवित्र व उन्नत होत नाहीं आणि मग अर्थात त्यांचा उपासनेवरील विश्वास उडून जातो याचें कारण त्याची उपासना खरोखर होत नसते. आत्म्याच्या परित्राणार्थ धर्मसाधन हा स्वर्गांतील अग्नि आहे. या अग्नीनें आत्म्यांतील मलिनता दग्ध व्हावयाचीच. धर्मसाधन मात्र प्रकृत रूपानें झालें पाहिजे. उपासनेचा भाव जर समस्त जीवनांत परिव्याप्त होऊन त्यास वर्धित व पुष्ट करील तरच स्वतांचें व जगताचें मंगल होईल. बहु दिवसांचें पाप नष्ट होणार नाहीं तर उपासनेचा काय उपयोग? ईश्वरावर विश्वास ठेवून भक्तीचें साधन केलें असतां जीव जीवन्मुक्त होतो आणि आनंद व उन्नतीच्या मार्गास लागतो याची प्रचीत जेव्हां उपासक आपल्या जीवनांत दाखवितील तेव्हांच धर्माचें गौरव होईल.

सु. प.

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.

REGISTERED NO. 7, 1876

# वऱ्हाडसमाचार.

पुस्तक १० | अकोला, रविवार ता० २७ माहे फेब्रुवारी सन १८७६ इ० | अंक ९

## वऱ्हाडसमाचाराचीकिंमत

| | |
|---|---|
| वर्षाचे अगाऊ | ६ |
| सालअखेर | ७ |
| फुटकळ अंकास | ०४ |
| डांकहाशील | |
| वर्षाचे अगाऊ | १०८ |
| " अखेर | २ |

☞ नवीन वर्गणीदार होऊ इच्छिणारे लोकांकडून आगाऊ वर्गणी आली ह्मणजे पत्र सुरू केलें जाईल.

## नोटिसीबद्दल.

| | |
|---|---|
| मराठी, दर ओळीस | ०१०६ |
| तीच नोटिस दुसरे खेपेस | ०१ |
| इंग्लिश लिपींत दर ओळीस | ०४ |
| ,, दुसरे खेपेस | ०२ |

## नोटिसा.

राजश्री टिकाराम व गंगादीन वलद धनेदीन कलाल रहाणार बार्शी टाकळी तालुके अकोलें यांस मिशरीलाल दालचंद मक्तेदार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं, तुह्मी बार्शी टाकळीचे कलाली व सिंदीचा मक्ता आह्मापासून सन १२८६ सालाचा २२२९ रुपयांस केला त्याचे चौथाई पेशगीचे रुपये देण्याचा करार गुजरल्यावर दोन वार शिपाई पाठविला; परंतु रुपये दिले नाहींत सबब कळवितो कीं, चौथाई पेशगीचे रुपये तारीख २९ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी रोजीं १० वाजतां आमचे दुकानीं पटवून रशीद मिळवावी. नाहीं तर सदर्हू मक्ता फेरलिलाव करून दुसऱ्यास देऊ. व नुकसान येईल तें नोटिशीचे खर्चासुद्धां भरून घेऊ. कळावें. तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) मिशरीलाल दालचंद
मक्तेदार अकोलें
दस्तुर खुद्द.

---

नोटिस

गणू वलद परशराम दाभाडे रहाणार सोनाळे तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस खालीं सही करणार सदासुक अमोलकचंद वहिवाटदार छोगमल पुनमचंद दुकान सोनाळे याजकडून—तुकाजी वल्लद जानजी दाभाडे याचे नावचा सर्वे नंबर १२३ ३१ एकर २ गुंठे आकार रुपये ४९ चा तुमचे हिशाची जोडी १ चा पोटभागीनीचा हिस्सा संवत १९२८ त आह्मास दिला. पण त्या प्रमाणें सरकारांत जाऊन आमचे नावे सदर्हू शेतांत पोटभागीण शरीक करून देत नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर ही पावल्यापासून एक महिन्याचे आंत सदरी नंबरांत तिजाई हिस्सा आमचे नावे पोटभागीन करून द्यावा नाहीं तर कायद्याप्रमाणें फिर्याद करून तजवीज करावी लागेल कळवि तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) सदासुक अमोलचंद वहिवाटदार छोगमल पुनमचंद
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

गंगाराम वलद रामसिंग रजपुत रहाणार कसबे अकोट जिल्हा अकोले यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुमचे इकडे खातेबाकी रुपये २०० हिशेब मिती वैशाख शुद्ध १ संवत १९३२ मारू रोजीं केला परंतु त्याजवर टिकिट लाऊन सही करून दिली नाहीं सबब आतां आह्मांस पुर्जा करून द्यावा अगर पुर्जा न करून दिल्यास टिकिट लाऊन हिशेबावर सही करून द्यावी. ही नोटिस पावल्यापासून ९ दिवसाचे आंत दोहोंतून एक करावें तसें न केल्यास कायद्याप्रमाणें तजवीज करण्यांत येईल. कळावें तारीख २२ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) स्नेहीराम रामदत्त मारवाडी
दुकान अकोट
दस्तुर खुद्द

---

नोटिस.

श्रावण वलद पुंजबरठी रहाणार हिंगणघाट इलाखा नागपुर यांस काशी मर्द श्रावण बरठी हल्लीं वस्ती कसबे वणी तालुके मजकूर इलाखा वऱ्हाड इजकडून १२८९ फसली कारणें नोटिस देण्यांत येते कीं तूं माझा नवरा असून मजला अन्न वस्त्र देत नाहींस सबब मी एक वर्षापासून अन्न पाण्यावाचून उपाशी मरत आहे व सदर्हू बद्दल तुजला दोन वेळ टपालमार्फत नोटिस दिली असतां त्याजबद्दल कांहींच विच्यार केला नाहींस ह्मणून मी आतां आपले जाती धर्माप्रमाणें पाट लावून दुसरा नवरा करणार आहे. सबब वर्तमानपत्र द्वारे सर्वांस जाहिर व्हावें ह्मणून ही नोटिस दिली आहे तरी नोटिशीचे तारखेपासून पंध्रा दिवसांचे आंत माझी अन्न वस्त्राची तजवीज केली असतां लोकांत चांगलेपणा तुजला व मजला येईल जर मुदतीप्रमाणें तजवीज तूं केली नाहींस तर मजवर अथवा मी पाटाचा नवरा करीन त्याजवर तुझा कोणतेही प्रकारें दावा चालणार नाहीं कळावें तारीख १८ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) काशी मर्द श्रावण
बरठी वस्ती वणी
निशाणी इचे
हातची बांगडी.

## पत्रव्यवहार

या सदराखालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

---

### फाटकी तुटकी आगगाडी.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस—

वि. वि. रेलवेच्या अधिकाऱ्यांचे लक्ष्य पोंचण्याकरितां खालीं लिहिलेली अडचण आपणास कळवितों.

भुसावळेपासून नागपुरापर्यंत जी रेलवेची शाखा आहे तिजवर चालणारी ट्रेन आज जाते तीच उद्या परत येते ह्मणजे तिच्या गाड्या फारशा बदलत नाहींत असें दिसतें. तिला मुख्य रेलवेप्रमाणें सर्व प्रकारच्या पुरेशा गाड्या नसतात त्यामुळें उतारू लोकांस फार त्रास होतो. तिसरे प्रतीचा डबा एक किंवा अर्धा असतो त्यांत उतारू दाटीनें कोंबून भरतात त्यामुळें त्यांची फार वेधा होते. व कधीं कधीं अधिक उतारू झाल्यास चवथ्या क्लासांतही त्यांस दडपतात.

सेकंड क्लासांतून जाणारा येणारास सौख्य विशेष असतें असें ऐकल्यावरून एक दोन वेळां मी त्या क्लासांतून गेलों तों काय चमत्कार पाहिला ह्मणाल तर फाटका व तुटका डबा. एका गाडीला चांगले २ डबे होते त्यांत युरोपियन लोक बसले आणि माझे वाट्यास पोस्टाच्या शेजारचा डबा आला. त्यांत बसावयास गेलों तों त्याचे बाकाची विणकर बहुतेक फाटली होती त्यामुळें बसण्यास गैरसोय ह्मणून त्याच्या लगतच्या दुसऱ्या डब्यांत गेलों तर तो त्याहून अधिक ह्मणजे त्याची विणकर फाटलेली असून कित्येक दिवस तो कोणी झाडलेला नव्हता. फाटका तुटका डबा ह्मणून त्यांत कोणी बसत नसतील अशा समजुतीनें कंपनीचे नोकरही तो झाडीत नसतील असें वाटतें. रेलवे कंपनीकडील जरा वरिष्ठ अधिकाऱ्यांचें याविषयीं दुरुस्ती करण्याचें काम असेल त्यांनीं इकडे अवश्य लक्ष्य द्यावें व लोकांचे पैशाचा उपयोग होऊं द्यावा. कळावें. तारीख १७ माहे फेब्रुवारी १८७६ इसवी

एक
प्यासेंजर.

---

देऊळगाव राजा ता० ८ फे० सन १८७६

रा. रा. वऱ्हाडसमाचारकर्ते यांस —

वि. विशेष हें गाव मोठें आहे पण " नाव सोनुबाई आणि पायीं कथलाचा वाळा " यासारखें आहे. एथें तरतरी पाहिजे तशी नाहीं किंबहुना मुळींच नाहीं ह्मटलें तरी चालेल. गावांतील इमारती अवाढव्य आहित पण त्यांवर तरतरीचे किरण मुळींचे पडत नाहीं. आंतील राहणारीं माणसें मात्र आह्मीं सतेज आहों अशी कल्पना करून गावांमध्यें गुंग झालीं आहित असें दिसतें. विद्या, कलाकौशल्य व धन यांनीं तर एथून पळ काढला. आतां सर्व कारभार मत्सरसाहेबांचे हातीं आहे. याणें आपलें काम उत्तम चालावें ह्मणून बरीच खटपट चालविली आहे पण कितपत यश मिळेल समजत नाहीं.

एथें इमामजयंतीचे उत्साहामध्यें दंगा हाऊं देऊं नये ह्मणून पोलिस इन्स्पेक्टर रा. रा. बलदेवसिंह हे आले होते. यांच्या धाकामुळें वर लिहिलेल्या मत्सरानें मनांत आणलेल्या सर्व गोष्टी फलद्रूप झाल्या नाहींत तरी त्यानें एक चमत्कार करून दाखविला तो असा:—कोणी मुसलमान लोक व्याजबट्ट्याचा धंदा करीत असतील तर त्यांस वाईट वाटावें व त्यांचा उपमर्द करावा ह्या हेतूनें एक चिंध्यांचा मल्ला मोठा पुतळा करून तो तेलांत भिजवून तो अखेरच्या रात्रीस भर रस्त्यावर भाजून टाकला ( अर्थात ठार मारला ) हा पुतळा भिजवण्यास निदान तीस शेर तेल लागलें असेल. पुतळ्याला कैदी करून पूर्वी दोन तीन दिवस पिंजऱ्यांत घालून सर्व गाव फिरविलें व देहांत प्रायःश्चित्त देण्याची वेळ आली तेव्हां सुनावणीदारानें सर्वांस मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं सदर्हू कैदीनें व्याज फार खाल्लें व यास अनेक वेळा समज दिली पण याणें आपली खोड सोडली नाहीं ह्मणून यास आतां फांसीं देऊन तेल घालून जाळून मारण्याची शिक्षा दिली आहे. तमासगीर लोक वारंवार असल्या ललकाऱ्या मारीत होते.

कुराणांत व्याज खाऊं नये ह्मणून सांगितलें आहे खरें पण आणखीं शेंकडों गोष्टीस कुराणांत निषेध असून त्यांकडे हजारों मुसलमानांचें दुर्लक्ष आहे व या गावांत कुराणाप्रमाणें चालणारा खरा मुसलमान एकही सांपडणें विरळा. असें असून एखाद्यानें दोन पैसे मिळवून लौकीक संपादन केला तर तो लोकांस सहन होऊं नये हें फार वाईट आहे.

एकंदर दहा बारा ताजे झाले होते. गावचे मानानें काम थोडें बहुत सुरेख होतें पण रोशनाईला आमंत्रण नसल्यामुळें ती बिच्यारी अगांतुकी करावयास कशाला येईल? तरी हा कमतरपणा पुतळ्याचे प्रकाशानें दिसूं दिला नाहीं.

रा. रा. बलदेवसिंह इ० व रा. गोविंदराव चीफ कानेस्टबल या उभय अंमलदारांचा स्वभाव चांगला असून त्यांनीं बंदोबस्त यथायोग्य ठेविला होता. इन्स्पेक्टर साहेबांचें लक्ष्य लोकांचे सुखाकडे फार आहे. यांस विनाकारण गरिबांस त्रास देणें किंवा दंडेबाजी करणें अगदीं आवडत नाहीं. असा सुस्वभाव पोलिस अंमलदारास भूषणकारक व रयतेस सुखकारक आहे कळावें ही विनंती.

आपला मित्र
क्ष.

## सूचना

उत्तम लोकवासी डाक्टर सिंक्लेर साहेब सन १८६९ सालीं बिलायतेस रजेवर गेले त्या वेळीं शाळाखात्यांतील कांहीं प्रमुख मंडळी अकोल्यास जमून त्यांनीं साहेबांचें कांहीं स्मारककृत्य करण्याविषयीं आपली इच्छा दर्शविली तेव्हां साहेब बहादुरानीं सांगितलें कीं मीं जोंपर्यंत वऱ्हाडांत शाळाखात्यावर अधिकारी आहे तोंपर्यंत स्मारककृत्य व्हावें अशी माझी इच्छा नाहीं. त्या वेळेस जें भाषण झालें त्यावरून डा० सिंक्लेर साहेबानीं मुंबई युनिव्हर्सिटींत पुष्कळ दिवस काम केलें तेव्हां तेथें कांहीं तरी आपलें नांव राहील तर आपली खुषी होईल असें साहेबांचे बोलण्यांत आलें. त्यावरून साहेब मयत झाल्यानंतर गेल्या आगष्ट महिन्यांत जी शाळाखात्यांतील लोकांची सभा अकोल्यांत झाली त्या वेळेस साहेबांचे इच्छेप्रमाणें आपले शब्दानुसार स्मारककृत्य करावें असें ठरलें. पुढें कांहीं बाहेरचे लोकांचें ह्मणणें पडलें कीं जमलेला पैसा साहेबाचे मुलांकारितां विलायतेस पाठवून द्यावा त्या वेळेस पुन्हा विच्यार होऊन मेहेरबान सिंक्लेर साहेबाचे मित्र अशा कांहीं साहेब लोकांचा अभिप्राय घेतला तेव्हां असें ठरलें कीं शाळाखात्यांत जे थोडे रुपये जमणार ते पाठवून साहेबाचे मुलांस फार दिवस उपयोग होईल असें नाहीं ह्याकरितां पूर्वीं ठरल्याप्रमाणें स्मारककृत्याचा बेत सिद्धीस न्यावा.

अलीकडे थोडे दिवसापूर्वीं टाइम्स आफ इंडिया पत्रांत एक पत्र प्रसिद्ध झालें आहे त्यावरून साहेबाचे मुलांची स्थिति फारच वाईट आहे व तीं अगदी दारिद्रावस्थेंत आहेत असें समजलें. आणि मुंबईचे, वऱ्हाडचे व इतर कांहीं ठिकाणचे साहेब लोकामध्यें वर्गणी जमा होत आहे असें समजतें तेव्हां कितिएकास असें वाटलें कीं, हा जो पैसा जमत आहे त्यांत शाळाखात्यांतील लोकांचे वर्गणीची भर घातली तर साहेबांचे मुलांस पुष्कळ उपयोग होईल. आणि पूर्वीं ज्या युरोपियन गृहस्थांनीं स्मारककृत्यास अनुमत दिलें. त्यांनींच आतां पैसा विलायतेस पाठवावा हेंच अशा प्रसंगीं योग्य आहे असें मत दिलें तेव्हां एकंदरींत हाच विच्यार बरा दिसतो. परंतु ज्या लोकांपासून वर्गणी जमा झाली आहे त्यांचें अनुमत घेतल्या खेरीज कांहीं करतां येत नाहीं. यास्तव वर्गणी देणारे सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं, तारीख १ एप्रिल सन १८७६ इसवीचे पूर्वीं ज्यांचें मत विलयतेस पैसा पाठवूं नये असें असेल त्यांनीं कळवावें. विलायतेस पैसा पाठवावा असेंच जर मत असेल तर लिहून कळविण्यास नको. ज्याजकडून कांहां लिहून न येईल त्याचें विलायतेस साहेबाचे मुलाकडे पैसा पाठवावा असें मत आहे असें समजलें जाईल.

अत्यंत परोपकारी जे डाक्टर सिंक्लेर साहेब त्यांचे मुलांवर असा दुर्घट प्रसंग आला आहे याकारितां पैसा जितका लवकर पाठविला जाईल तितकें बरें आहे याकरितां सर्वांस विनयपूर्वक प्रार्थना करण्यांत येत आहे कीं जितका अधिक पैसा जमेल तितका जमवून खालीं सही करणाराकडे पाठवावा. सर्वांकडून पैसा तारीख १ एप्रिलचे आंत येईल तर सदर्हू तारखेस एथून मुंबईस रवाना केला जाईल. अर्थात बहुमतानें जें ठरेल तें करून काय केलें तें सर्वांस कळविलें जाईल. कळावें ता. २५ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

वामन बाळाजी ओझरकर
सिंक्लेर मेमोरियल फंडाचे सेक्रेटरी

---

# वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुध्ध २ शके १७९७

## अडगाव कोर्टांतील दिवाणी काम.

हें कोर्ट स्थापन होऊन आज १० वर्षांहून अधिक दिवस झाले. आज आह्मास इतक्या दिवसानंतर या कोर्टांतील दिवाणी कामाचे संबंधानें आपले विचार वाचकांपुढें ठेवण्याची ही बहुधा पहिलीच संधी आहे.

सर्व वऱ्हाडांत अधिक दिवाणी काम काय तें ह्याच कोर्टांत आहे. यास्तव या कोर्टांतील व्यवस्था आणि ह्या कोर्टांविषयीं तूर्त लोकांचा झालेला ग्रह आह्मी आपले वाचकांस कळविल्यास आमचे लिहिणें गैर जरूरीचें किंवा अप्रसंगिक आहे असा दोष आह्मास प्रिय वाचक देणार नाहींत असें आह्मी समजतों.

हें कोर्ट सुरू झाल्यापासून आजपावेतों रा. रा. आत्माराम भिकाजी, रामराव गोविंद, श्रीकृष्ण नरहर, गोविंदराज अप्पा आणि पुरुषोत्तमराव नारायण असे न्यायाधीश ह्या कोर्टाचें काम पहात आले व त्यांपैकीं हल्लीं आमचे मित्र पुरुषोत्तमराव हे काम पहात आहेत. आह्मी जें कांहीं आज लिहिणार आहों तें कोणत्याही प्रकारें वाढवून किंवा द्वेषबुद्धीनें एकाद्याचे मनास दुखवावें अशा हेतूनें लिहित नाहीं व कोणी त्या लिहिण्याचा तसा अर्थ घेऊं नये अशी आमची मनःपूर्वक इच्छा आहे.

अडगावास कोर्ट सुरू झाल्या दिवसापासून आजपावेतों ह्या कोर्टांत काम कमी झाल्याची गाऱ्हाणीं कधींही आमचे ऐकण्यांत आलीं नव्हतीं. अलीकडेस मात्र आह्मी ऐकिलें कीं ह्या कोर्टांत दिवसेंदिवस फिर्यादी कमी होऊं लागल्या आहेत. जर हें खरें असेल तर असें होण्याचें कारण काय असावें हें समजणें अवश्य आहे.

आह्मी परस्परें तपास करतां असें कळतें कीं सन १८७६ सालाचे सुरवातीपासून अलीकडेस ३०० फिर्यादीहून अधिक फिर्यादी कोर्टांत आल्या नाहींत. व कोर्टांत शिलक १५० हून अधिक खटले नाहींत. हें प्रमाण एकंदरींत कमी कामाचें आहे असें जरी आमच्यानें ह्मणवत नाहीं तरी अडगाव कोर्टांतील कामाच्या प्रमाणानें ही संख्या बरीच कमी आहे, असें लोक ह्मणतात.

आतां असें होण्याचें कारण काय असावें हें वास्तवीक रीतीनें जरी आह्मास माहित होण्याचें कांहीं साधन नाहीं तरी त्या कोर्टांशी ज्यांचा संबंध आहे असे लोकांचे तर्कया बाबदींत विच्यार करतांना सर्वथैव गाळाऊ होणार नाहींत ह्मणून लोक काय ह्मणतात तें आपण प्रथम पाहू.

कित्येक लोक ह्मणतात कीं पुरुषोत्तमराव काम कमी करण्याविषयीं फार झटतात. ह्मणजे विनाकारण सालबंद्या करतात. दाव्याचे खर्च वुडवितात, इमानावर तंटे तोडितात, लोकांस फौजदारी करण्याची दहशत देतात, व साधेल तर खटलाही करितात. आणि वकील लोकांस तुह्मालोकांची संख्या कमी करणें आहे असें ह्मणतात; आणि दुसऱ्यापक्षी कित्येक लोक असेंही ह्मणतात कीं, ह्या सालीं जमीनीपासून कुणबी लोकांस चांगलें उत्पन्न झालें नाहीं ह्मणून दिवाणी काम कमी झालें आहे.

आह्मास निश्चयानें सांगतां येत नाहीं कीं, पहिल्या प्रकारचें ह्मणणें खरें आहे किंवा दुसऱ्या प्रकारचें खरें आहे, परंतु अडगाव कोर्ट सुरू झाल्यापासून आजपावेतों कित्येक वर्षांत अशा प्रकारें कुणबी लोकांस तूट आली होती तरी कोर्टाचें काम कमी झालें नाहीं असें जें आमच्या ऐकण्यांत आलें आहे त्यावरून पहिल्या प्रकारचें ह्मणण्यांत अंशतः तरी तथ्य असावें असें अनुमान सहज निघत आहे. तरी आह्मास पुरुषोत्तमरावाविषयीं चांगली माहिती आहे. ते विद्वान आहेत. त्यांना मराठी व इंग्रजी भाषेचें व्यवहारिक ज्ञान चांगलें आहे, ते निःपक्षपाती आहेत, ते उध्धत नाहींत. मोठ्या घराण्यांतील आहेत व यामुळें त्यांचा स्वभाव फार सौम्य व गंभीर आहे. तेव्हां त्यांच्या कर्तींत न्यायाधिशास सर्वथैव त्याज्य असे जे दोष कित्येक लोक बोलतात तसे बहुधा नसावेत अशी अमची कल्पना आहे. तथापि पुरुषोत्तमराव वारंवार बऱ्याच लोकांवर खटले करतात यामुळें लोक फिर्यादी देण्यास मागें पुढें पहातात. व वकील लोकांस आपली संख्या कमी करण्याचा अधिकाऱ्यांचा हेतु कळल्यामुळें ते मोकळ्या मनानें काम घेत नाहींत यामुळें कोर्टांस काम कमी झालें अशी जी समज आहे ती सर्वथैव निराधार आहे असें आह्मास आज ह्मणतां येत नाहीं. कारण पुरुषोत्तमरावाकडून अलीकडेस जे कांहीं फौजदारी खटले एथें येतात त्यांपैकीं कित्येक इतके क्षुल्लक कारणावरून उत्पन्न झालेले असतात कीं, त्या संबधांतील लोकांचे दुर्दैवाकडे व भोगलेल्या कष्टाकडे पाहून कोणाही विच्यारी मनुष्याचें मन कळवळल्यावाचून रहाणार नाहीं. त्याच प्रमाणें त्या कोर्टांतील कित्येक वकील लोकांच्या वर्तणुकींतील कांहीं कांहीं अगदी क्षुल्लक गोष्टीविषयींसुद्धां पुरुषोत्तमरावांनीं जाब जबाब घेऊन ठेविले आहेत व ते एकंदर वरिष्ठाकडेस पाठविण्याचा आपला हेतु असल्याचें ते बोलून दाखवितात असेंही आम्ही ऐकतों.

जे जे खटले पुरुषोत्तमरावानीं करून पाठविले ते ते सर्व कायदेशीर होते किंवा गैरकायदेशीर होते हें आह्मांस सांगण्याची गरज नाहीं. व येथील न्यायाधिशानें जे खटले व्यर्थ आहेत असें ह्मटलें ते खरोखरच व्यर्थ होते कीं नाहीं हें प्रतिपादन करण्याचीही आमची इच्छा नाहीं त्याच प्रमाणें वकील लोकांविषयीं जें जें लिहून ठेविलें असेल तें कायदेशीर आहे कीं नाहीं हेंही आह्मांस पहाण्याचें कारण नाहीं परंतु जगांतील साधारण व्यवहाराची रहाटी व देशांतील लोकांच्या समजुती ह्यांस अनुलक्षून सर्वकाल विचारी मनुष्यानें आपलें वर्तन ठेविलें पाहिजे असा एक नियम आहे. व हा नियम इतका उत्तम आहे कीं कोणतेही देशांतील प्राचीन किंवा अर्वाचीन कालचे कायद्याशी तो विरुद्ध नाहीं. प्रत्येक मनुष्य चुकीस पात्र आहे व केवळ चूक हा कधींही गुन्हा होत नाहीं हें पुरुषोत्तमरावास सांगावयास नको आहे. आह्मांस लिहिण्यास वास्तविकच दुःख वाटतें कीं आमचे मित्र पुरुषोत्तमराव सर्व प्रकारच्या भूषणांनीं लोकप्रिय होण्यास पात्र असतां त्यांच्या विषयीं लोकांत खोटी (कदाचित) समज होत चालली आहे. यास्तव आह्मी त्यांस सूचना करितों कीं त्यांनीं वऱ्हाडच्या आपल्या ताब्यांतील बिचाऱ्या अडाणी प्रजेवर आपल्या कायद्या संबंधी विलक्षण सूक्ष्म ज्ञानाचें शस्त्र धरूं नये. त्यांच्या मताप्रमाणें जरी ह्या देशाचे लोक असावे तसे शहाणे किंवा कायदेबाज नाहींत तरी अशा प्रकारें खटले करणें चालू ठेवल्यानें ते लागलीच तसे बनतील असें त्यांनीं समजूं नये. न्यायाधिशास कुंठित करणारी प्रजा ह्या वऱ्हाडांत उत्पन्न होईल ह्यांत कांहीं संशय नाहीं परंतु त्यास कांहीं अवधि आहे इतकेंच आमचें ह्मणणें आहे.

न्याय कसा करावा व न्यायाधीश कसा असावा हें आह्मी आज सांगत नाहीं परंतु "न्याय करणें तो दयेशी सहवर्तमान करावा" असें जें एक जुनें वाक्य मोठ्या कायदेपंडिताचें आहे तिकडेस आमचे रावसाहेब लक्ष पुरवितील व त्या योगानें लोकप्रिय होऊन दहशतीमुळें लोक न्यायाचा मार्ग सोडून देऊन आपलें नुकसान करीत असल्यास तसें होऊं देणार नाहींत अशी आशा आहे.

ह्या कोर्टाचेच दिवाणी कामाचे संबंधानें आह्माकडेस बरींच पत्रें आलीं आहेत परंतु तें स्वतंत्र छापण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें समजून ही आह्मी प्रथमची सूचना केली आहे. व ही केवळ सार्वजनिक हितासाठीं आहे असें पुन्हा एकवार ह्मणून आज हा विषय संपवितों. लोकांची समज दूर करण्याचे उपाय आह्मांस सांगावयाचे आहेत ते पुढें सवडीप्रमाणें सांगू.

---

## संवयी.

(मा. अं. पु. चालू)

९ लवकर उठण्याची सवयी ठेवा.

ही सवई पुष्कळ प्रकारे हितकारक आ-

हे. पहाटेस उठण्याच्या संवयीपासून विलक्षण उद्योग होईल इतकेंच नाहीं परंतु ही संवयी शरिराचें आरोग्यही राखण्यास पुष्कळ कारणीभूत होईल. डीन स्वुइफ्र्याणें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, "प्रात:काळच्या वेळीं बिछान्यांत झोंप घेत रहाणारा असा मनुष्य वैभवास अथवा मोठ्या योग्यतेस चढलेला मी कधीहीं ऐकला नाहीं" आपल्या धर्मशास्त्र कर्त्यांचीही मोठ्या पहाटेस उठण्याविषयीं सक्त ताकीद आहे. पांच घटका रात्रीस उठून प्रात:स्मरण करून प्रात:कालचे विधि आटपून सूर्योदयीं सूर्याला अर्घ्य देण्यास तयार असलें पाहिजे अशी त्यांची आज्ञा आहे. व याप्रमाणें क्षेत्रांतून व इतर ठिकाणींही धर्मशील मनुष्यांचा हा क्रम नियमश: चालू आहे हें आपणास ठाऊक आहेच. आतां त्यांच्या हातून आपण ज्यांची अपेक्षा करूं अशा प्रकारचे जरी उद्योग झाले नाहींत तरी दुसऱ्या प्रकारचे उद्योग फार होतात. आमचे इकडे पहाटेस उठणें हें भिकारीपणाचें लक्षण आहे असा बराच समज आहेसा दिसतो. कारण श्रीमान असून लवकर उठणारे असे फारच क्वचित्. व जे असतात त्यांच्या कपाळीं. लक्ष्मीचा उपभोग घेणें नाहीं असें त्यांचे इतर बंधु समजतात. सकाळीं चार पांच वाजतां उठणें व सात वाजतां उठणें यांत फरक किती आहे हें डॉड्रिज ग्रंथकारानें एके ठिकाणीं सांगितलें आहे. ह्या विद्वान गृहस्थानें न्यू टेस्टमेंट अथवा नवीन करार ह्यावर जें भाष्य लिहिलें तसेच दुसरे कित्येक ग्रंथ केले ते तो ह्मणतो, सकाळीं पांच वाजतां उठणें व सात वाजतां उठणें ह्यांत जो फरक आहे ह्मणजे २ तास ह्या अवकाशामध्यें झाले आहेत. व पुढें तो असें ह्मणतो कीं असा क्रम चाळीस वर्षेंपर्यंत चालू ठेविला असतां एकंदर अयुष्यास दहा वर्षांची वृद्धि झाल्याप्रमाणें होईल. असो. लवकर उठायाचें ह्मटलें ह्मणजे लवकर निजलेंही पाहिजे; व रात्रीं लवकर आपण निजावें असा सृष्टिनियम असावा असेंही दिसतें. डाक्तर डवाईट साहेब आपल्या विद्यार्थ्यांस असा उपदेश करीत कीं पूर्व रात्रीं एक तास निजणें व उत्तर रात्रीं दोन तास निजणें यांची योग्यता सारखीच आहे.

आतां या ज्या सदरीं पांच गोष्टी सांगितल्या त्या प्रत्येक पाहूं गेलें असतां हे मोठ मोठाले स्वतंत्र विषयच आहेत. व याविषयीं जितकें लिहावें तितकें थोडेंच परंतु ह्या गोष्टींची संवयी जोडल्यापासून हरएक मनुष्याचे अनेक फायदे होतील यांत संशय नाहीं. ह्या अथवा कोणत्याही चांगल्या संवयी केवळ लहानांनींच लावून घ्याव्या असें नाहीं तर मोठ्यांनींही त्या जोडाव्या हें योग्य आहे. लहानांस कोणत्याच संवयी प्रबल अशा लागलेल्या नसतात त्याअर्थीं त्यांनीं अशा संवयी जोडण्याचा यत्न केला असतां त्यांस सुलभ जाईल. व ज्यांस कित्येक दृढतर झालेल्या अशा संवयी पूर्वींच लागलेल्या आहेत अशा वयस्क लोकांस नवीन संवयी जोडण्याचें बरेंच कठीण पडेल हेंही खरें आहे. परंतु त्यांची इच्छा असल्यास व त्यांनीं मनावर घेतलें असतां त्या जडतील यांत किमपि संदेह नाहीं. तसेंच पूर्वीं लागलेल्या किती जरी वाईट संवयी असल्या तथापि वर एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें मनाचा निश्चय व दृढोद्योग हे असल्यापासूनही मुक्त होता येईल.

---

## कित्येक नेटिवांची इंग्लिशांविषयीं खोटी द्वेषबुद्धी.

( लिहून आलेला मजकूर )

या विषयावर मागें एका अंकांत कांहीं मजकूर लिहिला आहे तो आमचे वाचकांच्या ध्यानांत असेलच. आज त्या विषयावर आणखी दोन शब्द लिहितों:—

मागें आधारभूत असें सिद्ध करून दाखविलें कीं जवळच्या आप्तावर अधिक ममता करणें हा मनुष्याचा स्वाभाविक मनोधर्म आहे. फार दूर जाण्यास नको, आपल्याच लोकांविषयीं विच्यार करूं, ज्यांना हिंदुस्थानची थोडी बहुत माहिती आहे, शिवाजी कोणाचा कोण, त्यानें काय पराक्रम केले, त्याच्या पाठीमागून त्याच्या गादीवर कोण बसला, तो कसा होता, पेशवे हे कोण, त्यांचा अधिकार काय, राज्यकारभार करण्याची त्यांची शैली कशी काय होती, न्याय करण्याची त्यांची रीत कशी असे, वगैरे गोष्टी इतिहासावरून माहित असण्याचा संभव आहे व ज्यांनीं इतिहासाचा थोडाबहुत अभ्यास केला आहे त्यांनाच आमचा असा प्रश्न आहे कीं महाराष्ट्र देशांत पेशव्यांचा अंमल होता त्या वेळेस तरी नीट न्याय होत होता काय ? जातिभेदामुळें लोकांमध्यें तंटे किंवा दुफळी होत नसत काय ? सर्व गुणवान लोकांची नीट संभावना होत असे काय ? व आतां पेशवाई नाहींशी होऊन इंग्रजी झाली आहे ह्मणून सर्वांनाच ही गोष्ट आवडत नाहीं किंवा ही गोष्ट झाली ही अनिष्ट आहे असें कोणी आधारसिद्ध करून दाखवील काय? या प्रश्नाला होकार देणें कठिण आहे. सत्याला परांङमुख झाल्याशिवाय, न्यायास अन्याय ह्मटल्याशिवाय, सुखास दु:ख ह्मटल्याशिवाय कोणत्याही विच्यारी आणि समंजस मनुष्याला वरील प्रश्नास होकार देतां येणार नाहीं. आह्मी शेकडों गोष्टी अशा दाखवूं कीं ज्या आह्माला आतां इंग्रज सरकारापासून प्राप्त झाल्या आहेत, ज्या आह्माला फार इष्ट आहेत, ज्यांची वृद्धि व्हावी आणि ज्या आह्मांला निरंतर असाव्यात ह्मणून आह्मी सरकाराशीं भांडतों, त्या गोष्टींचा आमच्या पेशवाईंत संसर्ग देखील नव्हता व त्या गोष्टींची कल्पना देखील आमच्या पैकीं कोणाच्या अंत:करणांत आली नाहीं आणि अनुभवावरून असें ह्मणतां येईल कीं आणखी पांचशें वर्षें पेशव्यांचा अंमल असता तरी त्या गोष्टींची कल्पना आमच्या अंत:करणांत आली नसती. असें लिहिण्यानें आपल्या लोकांची निंदा करावी आणि राज्यकर्त्यांची स्तुती करावी, किंवा ते जी जी गोष्ट करितात ती ती अगदीं बरोबर असते असें आमचें ह्मणणें मुळींच नाहीं, व तसें कोणास वाटेल तर आमचा कांहीं उपाय नाहीं तथापि सध्या सर्व महाराष्ट्र देशांत ह्मणजे बेळगावापासून गुजराथपर्यंत, नागपुरापासून मुंबईपर्यंत व्याप्रमाणें कांहीं अंशीं बंगाल प्रांतांत आणि इतर ठिकाणीं सरकारास दोष देण्याचा झपाटा लोकांनीं चालविला आहे तो केवळ निराधार आहे. एखाद्यास चांगलें किंवा वाईट ह्मणण्यापूर्वीं आपण त्याच्या जागीं आहों अशी कल्पना करून आपण वर्तन कसें केलें असतें याचा विच्यार करावा आणि मग जें काय मत देणें तें द्यावें. असें केल्यानें जें मत पडेल तें नेहमीं न्यायाला आणि सत्याला अनुसरून असेल. आतां कोणी असें ह्मणतील कीं केवळ वरवर विच्यार करून व बहिरील छानछुकीस भुलून साहेब लोकांचें राज्य चांगलें ह्मणणें नीट नाहीं.

कोणत्याही गोष्टीविषयीं आम्ही आपलें मत घाईनें कधींही देणार नाहीं. आम्ही जो विषय हातीं धरिला आहे त्यांतील एकूणएक गोष्टीचा विचार केल्याखेरीज आम्ही एका पक्षास चांगलें आणि दुसऱ्या पक्षास वाईट असें ह्मणणार नाहीं. असतु. क्षणभर पुन्हा पेशवाईकडे वळूं या. आणि त्या वेळेस देशाची स्थिति कशी कय होती हें पाहूं. राज्यव्यवस्था नीट रहण्यास काय काय गोष्टी पाहिजेत व त्या पेशवाईंत कितपत होत्या हेंही पाहूं. आम्ही इतेहासावरून असें सांगतों कीं, कोणत्याहि देशाचा राज्यकारभार उत्तम रीतीनें चालून लोक सुखी असण्यास तो देश लोकसत्तात्मक राज्याखालीं असून उपयोग नाहीं, राजसत्तात्मक असून उपयोग नाहीं किंवा राज्यांतील बड्या बड्या लोकांच्या सत्तेंत असून उपयोग नाहीं; कारण या सत्तेंपैकीं कोणत्याही सत्तेचें देशांत प्राबल्य झालें कीं देशांत घडामोडी होऊं लागून सरशेवटीं तंटे व लढाया होतात. ग्रीस देशांत पूर्वीं लोकसत्तात्मक राज्य असे. कोणत्याहि मनुष्यास देहांत शिक्षा देणें, किंवा मोठा दंड करणें किंवा परदेशाशी लढाई करणें किंवा तह करणें वगैरे गोष्टी सर्व लोकच्या सम्मतीशिवाय घडत नसत. आतां प्रत्येक गोष्टीचा निकाल अशा रीतीनें करणें हें किती अशक्य आहे याचा आमच्या वाचकांनीं विच्यार करावा. सर्व लोक एके ठिकाणीं आणणें हें शक्य आहे काय ? वं फार परिश्रम करून ९० हजार लोकांन एका मोठ्या दिवाणखान्यांत आणलें तरी सर्वांचें मत एकसारखें पडण्याचा संभव आहे काय ? हेंही असूं द्या. रोमन लोकांचें राज्य श्रीमंत लोकांचे सत्तेंत होतें त्याचही परिणाम काय झाला तो सर्वांना माहित आहे. श्रीमंत लोकांनीं सर्व शक्ति. अधिकार आणि संपत्ती बळकाविली, गरीब लोकांच व शेतकऱ्यांचा ते द्वेष करूं लागलें, आणि ऐश्वर्यांध होऊन न्याय अन्याय पाहेनासे झाले. गरीब लोकांना फार त्रास होऊं लागला तेव्हां ते अर्थांतच श्रीमंतावर उलटले आणि देशामध्यें लढाया सुरू झल्या. त्याप्रमाणें कोणत्याही देशांत केवळ राजाची सत्ता उन्नत असून उपयोग नहीं. कारण एकटा राजा काय करूं शकणार आहे ! कोणत्याही राजाचा विच्यार केला तरी असें दिसून येतें कीं त्याची एक छोटी संमत देणारी मंडळी असतेच. केवळ राजसत्तात्मक राज्य असल्या कारणानें देशांवर कसे घोरप्रसंग येतात याचीं उदाहरणें पाहिजे तितकीं दाखवितां येतील. आस्त्रिया देशाचें किंवा तुर्क देशाचें किंवा हिंदुस्थानांतील बादशाहीचें उदाहरण घ्या ह्मणजे सर्व स्थिति ध्यानांत येईल. व या खर्चावरून इतकें सिद्ध करितां येईल कीं कोणत्याही देशाचें सुरळीत राज्य चालण्यास त्यांत तिन्ही सत्ता देशांमध्यें वर्तत असल्या पाहिजेत. या तिन्ही सत्तांचें मिश्रण असल्या खेरीज लोकांना सुख होणार नाहीं. पेशवाईमध्यें या सत्तेपैकीं कोणत्या सत्तेचें प्राबल्य होतें बरें? राजसत्तेचें. केवळ राजसत्तेपासून सुख होणार नाहीं हें आह्मी दाखविलेंच आहे. इंग्लिश लोकांची राज्य करण्याची शैली फारच चमत्कारिक आहे. वर सांगितल्या तिन्ही सत्तांच्या मिश्रणानें त्यांचें राज्य चाललें आहे. व त्यावरून राज्य सुरळीत चालण्यास किती सोंप पडतें हें थोडक्यांत दाखवावें असा आमचा विचार आहे.

(पुढें चालू)

---

## वऱ्हाड.

एथील सरकारी डेपोंत चोरी झाल्याची बातमी आज सकाळीं समजली. या विषयीं पुढील खेपेस कळवूं.

---

खामगावचे नायब तहशिलदारीवर अकोला तहशिली पैकीं २५ रु०चे कारकून रा. व्यंकटराव मल्हार एदलाबादकर यांस नेमिलें. हे सन १८५३ सालचे नोकर असून २५ रुपयांवर आज दहा वर्षें आहेत व यांच्या बरोबरीचे कित्येक लोक एकस्ट्रा असिस्टंट व तहशिलदारही झाले आहेत तेव्हां अशा सांदींत पडलेल्या मनुष्यावर डिपुटी कमिशनर साहेबांची कृपेची नजर पुरली हें पाहून आह्मांस संतोष होतो. व्यंकटराव मुलकी कामांत हुशार आहेत याजकरितां ते नायब तहशिलदारही चांगले होतील अशी उमेद आहे.

रा. गणेश गोपाळ यांचे १५ रुपये कमी करून व्यंकटराव यांचे जागेवर त्यांस नेमिलें. बिच्याऱ्याच्या गरिबीवर नजर पुरून चांगली शाल्योदनाची योजना झाली होती पण त्यांचे जठरांत मांद्य ह्मणून त्यांस तें न पचतां अजीर्ण झालें. तेथें कोणाचा काय उपाय!

---

मेजर मिलेट साहेब इन्स्पेक्टर जनरल पोलिस वराड हे विलायतेस रजेवर गेले होते ते मुंबईस परत आले. तारीख २९चे सुमारास उमरावतीस जाऊन आपले कामाचा चार्ज घेतील. उ. अ.

मि. मोफिट साहेब डी. सुपरिंटेंडेन्ट पोलिस बुलढाणा हे येत्या आठवड्यांत रजेवरून परत येतील. उ. अ.

---

## वर्तमानसार

मार्चाचे १३ वे तारखेस मुंबईस सबार्डिनेट जडजाची परीक्षा होणार तिजकरितां कमिटी— आन० मि० जे० पिन्ही साहेब, मि० फारन बारिस्टर, मि० वाट रेजिस्टर, आणि मि० पांडुरंग बळिभद्र वकील.

हिंदुस्थानांतील सर्व सरकारी खजिन्यांत गेल्या डिसेंबर अखेर १२,६३,७४,६०२ रु० शिलक होते.

प्रिन्स आफ वेल्स यांची पत्नी प्रिन्सेस आलेकडांड्रा ह्या कोपनहेगन येथून लंडनास परत आल्या असें लं. च्या ता. ७ च्या तारेवरून कळतें.

लार्ड नार्थ ब्रूक गवर्नर जनरल यांचे नाव आतां अर्ल बेरिंग असें चालणार.

एप्रिलचे ९वे तारखेस लार्ड नार्थ ब्रुक कलकत्याहून जलमार्गानें जाणार. मुंबई मार्गे जाण्याचा बेत रहित झाला.

इंदूर स्टेट रेलवेचा रस्ता चोरळ पासून महूपर्यंत तयार झाला आहे त्याचे दरम्यान एक बोगदा होता त्याचा वरचा भाग एकाएकी पडला व त्याखालीं कित्येक मजूर लोक दडपून मेले. एक इंजिनियरही साडपला होता. परंतु तो मोठे बशर्थीनें वाचला.

शिंदे स्टेट रेलवे आग्र्यापासून ग्वालेर पर्यंत ७९ मैल बांधण्याचे कामाचा मक्ता मुंबईचे मेसर्स ग्लोव्हर आणि कंपनी यांस हिंदुस्थान सरकारानें दिला. आतां मुंबईहून एक दोन दिवसांत आग्र्यास जाऊन एकदम काम सुरू करतील.

युवराजांच्या आगमनाच्या प्रसंगीं काश्मीरच्या महाराजांनीं ११३ कैदी बंधमुक्त केले.

गुलामाच्या व्यापारासंबंधी चौकशीसाठीं रायल कमिशन नेमण्यांत आलें.

युवराजांस मिळालेल्या देणग्यांची किंमत अर्धा कोट रुपये होईल असें ह्मणतात.

मि. कृष्णाजी गोपाळ कानिटकर यांस ठाण्याच्या ऐवजी पुणें जिल्ह्यांत वकिली करण्याची सनद हायकोर्टानें दिली.

चालू महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत एडन येथें एकसारखा पर्जन्य पडून तळीं भरून गेलीं. इं. प्र.

काबुलाकडे इतकी थंडी पडली आहे कीं पेशावराहून काबुलास लोक येत असतां थंडीच्या कडाक्यानें ६ माणसें मरण पावलीं.

मागील आठवड्यांत लखनी येथील पोस्ट हाफिसांतून ६ रजिस्टर पत्रें चोरीस गेलीं, त्यांचा पोलिसांनीं पुष्कळ शोध केला परंतु कांहीं पत्ता लागला नाहीं. नंतर थोडक्याच दिवसांनी तीं पत्रें बंगी पार्सल आफिसांत फोडलेलीं सांपडलीं त्यांत नोटा नसल्यामुळें जशीचीं तशींच होतीं पोस्टांतील लोकांची केव्हडी दगलबाजी हो!

अ. द.

---

## ईश्वर एक जीवन्त व्यक्ति.

आमची उपास्य देवता अतींद्रिय, निराकार, अनंत व सर्वव्यापी आहे, इतकेंच मात्र बोलून आम्हीं निश्चित रहातां कामा नये. उपासनाकाळीं क्षणएक नेत्र झाकून मानसपटीं संसाराच्या प्रतिछायेचें संदर्शन करीत बसून अथवा शून्य अधिकारांत किंचित् काल इकडे तिकडे परिभ्रमण करीत राहून उपयोग नाहीं. ईश्वर निराकार अदृश्य पदार्थ असूनही भाविक साधकांच्या हृदयास मुग्ध करितो व जीवनास पुण्यबळेंकरून बलवान करितो. ईश्वर आत्मस्वरूप प्रगट करून प्रत्यक्ष व्यक्तीप्रमाणें मानवात्म्यानें अभ्यंतर सानंदाश्चर्ययुक्त करितो. असें जर न होतें तर इतके कष्ट करून ईश्वराचें योगसाधन व पूजा अर्चा कोण करिता; रूप रस गंध हीन परमात्म्याच्या हृदयानंदकर आविर्भावाची जेव्हां साधकास प्रत्यक्ष रूपानें उपलब्धि होये, तेव्हां तो आणिक कांहीं साकार वस्तु पाहूं इच्छित नाहीं. अशा निराकार ब्रह्मदर्शनानें साधकाच्या चित्तांत असा उल्हास उत्पन्न होतो कीं, त्यास साकार मूर्तिदर्शनाची मुळींच इच्छा होत नाहीं. विनय, विश्वास व व्याकुळता ईहीकरून प्राणाराम परमेश्वरास एक जीवंत व्यक्तिरूपानें जवळ पाहिल्यावर साधक इतका मोहित होऊन जातो कीं, ब्रह्माच्या मधुर सत्तासागरीं एककालीं बुडून गेलों आहे असा त्यास भास होतो. अल्पविश्वासी व चंचल चित्त अशा जनांस जड पदार्थनिर्मित व इंद्रियग्राह्य अशी वस्तु पहाण्याची अवश्यकता आहे. परंतु वास्तवीक चक्षु, कर्ण, मुख, नासिका हस्तपाद यांहीं विशिष्ट नुस्ती एकादि मूर्ति पहाण्यांत कांहीं नाहीं. जड मूर्तीचें प्रत्येक अंग व उपांग यांची जेव्हां आम्ही स्वतंत्र भावना करूं, तेव्हां तेणेंकरून कांहीं आनंद पावूं. असें जर न होईल तर अंग प्रत्यंग समष्टी जी पुतलिका तिचें जर दर्शन झालें, तर काय होणार आहे? केवळ कल्पनावृत्तीची उत्तेजना मात्र होते. बाकीं वस्तुतः प्रत्येक दर्शनजनित आराम त्यापासून लब्ध होत नाहीं निराकार ब्रह्मोपासक होऊनही अंधकार व शून्यता यांची पूजा केली तर त्यांत कहीं अर्थ नाहीं. निराकार चैतन्यमय "परम" पुरुष एकजण निकटस्थव्यक्ति आहे अशी जेव्हां आमची श्रद्धा होईल, तेव्हां आमच्या बाहेरील व अंतःकरणांतील शून्यता नाहींशी होईल. अशा अवस्थेंत जो माधुर्यता आहे ती वाणीनें प्रकाशित करतं येत नाहीं. इतकें मात्र सांगतां येतें कीं त्या वेळीं कशाचीही कमताई वाटत नाहीं. प्रार्थना करीत असतां भूल पडते. काय मागावें काय प्रार्थावें याचें भान रहात नाहीं. व तन्निमित्त इच्छाही होत नाहीं. परम प्रार्थनीय व चिरवांच्छनीय अशी आतमय परम वस्तु जेव्हां स्वयं उपस्थित हो, तेव्हां मनुष्याच्यानें कशाची प्रार्थना करवते? दुःखी दीन हीन मानवाच्या कुटीरीं जेव्हां सम्राट प्रभूचें अकस्मात आगमन होतें, तेव्हां तो हतबुद्धि होऊन त्यास काय करावें हें समजत नाहींसें होतें. दीनात्म तृषितचित्त साधकास याप्रमाणें ईश्वरदर्शन होतें. सम्राटाचे दर्शनसमयीं आपल्यास पुनः दरिद्र कष्ट भोगावे लागतील हें त्याच्या ध्यानीं येत नाहीं. एक निमेष मात्र दर्शनेंकरून तो इतका मुग्ध होतो कीं याचे सर्व अभाव पूर्ण होऊन जातात व सकल कामनांची परिसमाप्ति होते. परं याप्रमाणें थोड्यांत संतुष्ट होणें उचित नाहीं. जोंपर्यंत ईश्वरासंगे आपला चिरस्थायी संबंध घडून येणार नाहीं तोंपर्यंत आपल्यास निश्चित रहातां कामा नये. सम्राट दर्शनोत्तर पुनर्वार निश्चयें जेव्हां दुर्भिक्ष येईल तेव्हां आपणास असा खेद होईल कीं अरेरे! त्या वेळीं आपण त्याच्याजवळ अमरत्वाच्या वराची याचना कां केली नाहीं? घोर तमसाच्छन्न या असार भूमंडळीं मुहूर्तमात्र ज्योतिर्मय पवित्र ब्रह्माचा प्रत्यक्ष व्यक्तीप्रमाणें अनुभव येतो! ही किती सुखाची अवस्था! त्याच्या प्रत्यक्ष अनुभूतीचे भिन्न भिन्न संबंध आहेत. त्याच्या संगें आमचे अनेक संपर्क आहेत. विशेष विशेष मधुर संबंध धरून त्याचें दर्शन घेतां येतें. त्याची विद्यमानता इतकी स्पष्ट रूपानें अनुभूत होते कीं. जणो काय एकजण आपल्या जवळ बसला आहे असा भास होतो. कधीं प्रभू भृत्य, कधीं गुरु शिष्य, कधीं पिता पुत्र, तसेंच कधीं तो प्रेमास्पद बंधु कधीं स्नेहमयी जननी कधीं विचार पतिराजा, कधीं द्वारपाळ रक्षक एक प्रकारें नानाविध संबंधसूत्रांहीं आह्मी त्याच्याशीं ग्रथित आहों. भिन्न भिन्न अवस्थांत भिन्न भिन्न संपर्कांहीं तो हृदयाचे ठायीं आविर्भूत होतो. एक एक संबंधाच्या मधुरतेनें तो साधकाचें चित्त हरण करितो. हृदयाच्या अति गुप्तस्थानीं निर्जनीं, व अव्यवहित सन्निधानीं जाऊन त्यास सर्व रूपांहीं पहाण्यास यत्न करावा, व परमानंदलाभ पावून कृतार्थ व्हावें. त्याच्या पुण्यज्योतीच्या संस्पर्शें चित्ताची सकल मलिनता धुवून जाईल. ही प्रत्यक्षानुभूतीच साधकाचें चिरंतन धन, दुःखविपत्तीस परिहारक सामुग्री, अनंत जीवनाचें उपभोग्य व आवलंबन होय.

सु. प.

---

## नोटिस.

शिवराम वल्लद गणाजी पाटील, रुंजाजी वल्लद रत्नाजी पाटील, शिवाजी वल्लद रामाजी पाटिल, नटवाजी वल्लद फकिरजी माहाली, विठू वल्लद पुंजाजी माहाली आणि गंगाराम कलाल रहाणार नानखेड तालुके बाळापुर यांस खालीं सही करणार याजकडून नोटिस देण्यांत येते कीं तुह्मी माझी पड जमीन गुरें चारण्याकरितां घेऊन चराई दर गुरास आठ आणे प्रमाणें देण्याचें कबूल केलें होतें जितकीं गुरें चारू तितक्या वरूळया घालून देऊं असा करार केला होता. त्याप्रमाणें आजपर्यंत मागणी केली असतां पैशाची आदाई केली नाहीं व वरूळया घालून दिल्या नाहींत. करितां ही नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत ज्यांणीं त्यांणीं आप आपले गुराच्या चारणीचे पैसे आमचेकडेस दाखल करावे व वरूळया घालून द्याव्या. याप्रमाणें न केल्यास तुमचेवर गुराचें चारणीचे आणि वरूळया घालण्यास लागणारे खर्चाचे रकमे साहित एकंदर रकमेचा दिवाणींत दावा केला जाईल. व या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावे तारीख २३ माहे फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

[ सही ] सोनाजी वल्लद बाबूजी
पाटिल रहाणार वरखेड
तालुके अकोलें
निशाणी हातची.

---

### नोटिस

इयांगोजी वल्लद काळूजी पाटील मौजे आसेगाव व महादाजी वल्लद कृष्णाजी पाटील मौजे कवठें तालुके अकोट जिल्हे अकोलें यांस गिरधारीमल हरलाल मारवाडी दुकान मौजे कारलें तालुके दर्यापुर जिल्हे इलिचपुर याजकडून, देण्यांत येतें कीं तुमशी आमशी कापसाचा सवदा तारीख ४ फेब्रुवारी, १८७६ शुक्रवारीं रोजी ४० खंडीचा दर ३४ रुपयेप्रमाणें झाला त्या वेळेस आह्मी असें बोलणें केलें होतें कीं ३९ खंडी कापुस मजजवळ तयार आहे व ९ खंडी बाहेरून येणें आहे करितां हा ३९ खंडी मोजून घ्यावा व रुपये द्यावे ९ खंडी कापुस मागाहून येईल तसा मोजून देईन या करारास अनुसरून तुह्मी १२ मण कापूस मोजून नेला व ३० रुपये आह्मास दिले. दुसरे दिवशीं तुह्मी ९ खाचर घेऊन आले त्या वेळेस माझ्या ९ खंडी कापसांपैकीं १। खंडी कापसाचे गाडें माझे येथें आले होते व भावही थोडा मंदावला होता ह्मणून तुह्मी तक्रार काढून माप न घेता गाडे घेऊन परत गेला त्या वेळेस खुशाल पाटील मापारी यानेंही तुह्मास समज दिली कीं, हा कापूस आतां आलेला अलग ठेवा व गंजीचें माप घ्या, पण गाडे रिकामे नेऊ नका तेव्हां तेही तुह्मी ऐकिलें नाहीं व तेव्हापांसून आपण कापुस नेण्याकरितां आले नाहीं ह्मणून ही मुद्दाम नोटिस दिली आहे तर नोटिस पावल्यापासून ९ दिवसाचे आंत कापुस मोजून घ्यावा व रुपये द्यावे याप्रमाणें न केल्यास २०० रुपये नुकसानी व शिवाय व्याज याबद्दल दावा करून रुपये घेतले जातील व या नोटिशीचा खर्चही तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख २१ फेब्रुवारी सन १८७६ इसवी-

( सही ) गिरधारीमल हरलाल मारवाडी दुकान कारलें तालुके दर्यापुर दस्तुर खुद्द

---

### नोटिस

रा. मगनलाल डडा रहाणार कजबा फलोदी तालुका जोतपुर जिल्हा मारवाड इसकु सदासुक अमोलकचंद वहिवाटदार छोकमल पुनमचंद दुकान सोनाळे तालुके जळगाव जिल्हे अकोले इनकेतरफसे लिखा जाता हये के सिताराम डुंगरसी दुकान तेल्हारा ओ दुकानपर तुम मुनीम संवत १९२३।२४ के साल थे तब तुमनें १०१ रुपया लिन होते सो ये नोटिस पहोंचबाद २ महिनामे १०१ रुपया दरमहा दरशेकडा १२ आणे प्रमाणें व्याज समेत भेज देना. दो महिनाके पेटमे रुपये नही भेजे तो सरकारमे फिर्याद करके रुपये लिये जायेंगे मालूम होय तारीख २३ फेब्रुवारी सन १८७६ इसवी.

( सही ) सदासुक अमोलकचंद
वहिवाटदार छोकमल पुन
मचंद दुकान सोनाळे
दस्तुर खुद्द

---

हें पत्र अकोलें एथें खंडेराव बाळाजी फडके यांचे वऱ्हाडसमाचार छा.छा. प्र.